जानेवारी २०२६

# सुवार्ता

श्रद्धेच्या प्रकाशात
संपन्न जीवनासाठी



BASSEIN CATHOLIC CO-OPERATIVE BANK LTD
ESTD.1918
(SCHEDULED BANK)

EMPOWER DREAMS WITH YOUR GOLD

Withdraw only what you need, Pay Interest only on what you use.



## COMMERCIAL OVERDRAFT AGAINST GOLD - COD

-: Salient Features :-

- Rate of Interest : 7.95% p.a.*
- Tenure : 12 months (Renewable)
- Pay Interest only on Utilized Amount
- No Prepayment Charges
- Safe & Secure : Safe Under High Vault Protection
- Only for Commercial Use
- Limit : upto Rs. 75 Lacs

## PERSONAL OVERDRAFT AGAINST GOLD - POD

-: Salient Features :-

- Rate of Interest : 7.95% p.a.*
- Tenure : 12 months (Renewable)
- Pay Interest only on Utilized Amount
- No Prepayment Charges
- Safe & Secure : Safe Under High Vault Protection
- Ideal for Emergencies, Education & Personal Expenses
- Limit : Min Amt : Rs. 10,000/- , Max. Amt : Rs. 25,00,000/-

*T&C Apply

Helpline no: 08069420000 | www.bccb.bank.in | For more details visit our

# सुवार्ता ८४६

## जानेवारी २०२६

**वर्ष ७१ / अंक ६ / मूल्य रु. २०/-**

**संपादक : फा. (डॉ.) जोएल डिकुना**

**उपसंपादक : फा. रॉबर्ट गोन्साल्वीस**

**संपादक मंडळ :** फा. रॉबर्ट डिसोजा
फा. जॉन फर्गोज, फा. सॉलोमन रॉड्रिग्ज

**सहकार्य :** जॉन गोन्सालविस,
नाझरेथ अथाईत, संदीप राऊत

**मुखपृष्ठ रचना :** सुमित परेरा
**रेखाचित्रे :** रॉबर्ट परेरा

**अक्षरजुळणी :** रिटा डाबरे
**कार्यालयीन सहकार्य :** रेजीना अथाईत



**'सुवार्ता' कार्यालय**
जीवन दर्शन केंद्र, गिरीज
वसई - ४०१ २०१.

**-: मोबाईल नंबर्स :-**

**'सुवार्ता' कार्यालय : 9702090231**
**जीवन दर्शन केंद्र : 9702090232**

**वेळ** : सकाळी ९.३० ते दुपारी १२.३०
दुपारी २.३० ते संध्या. ५.३०

**रविवार बंद**

E-mail : suvartavasai@gmail.com
Web. : www.suvarta.org


# अ नु क्र म


| | | |
|---|---|---|
| • | : अंतर्नाद | ३ |
| • बिशप थॉमस डिसोजा | : अधिकृत : मार्गदर्शक, दिशादर्शक, प्रेरणादायी कुटुंब | ४ |
| • फा. राजेश लोपीस | : संयोजन : मिशन संडे दान (२०२५) | ६ |
| • संपादक | : संपादकीय : केवळ ज्ञानवंत नव्हे, प्रज्ञावंत सुद्धा व्हावे | ७ |
| • फा. रॉबर्ट गोन्साल्वीस | : उपसंपादकीय : सोहळ्यात हरवलेली साक्रामेंते | ८ |
| • अ.भा.म.सा. महामंडळ | : अखिल भारतीय ९९वे मराठी साहित्य संमेलन | १० |
| • मराठी ख्रिस्ती सा. संघ | : २७ वे मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलन | ११ |
| • संकलन | : संपादकांस पत्रे | १२ |
| • लेख :- | | |
| फा. किरण लोपीस | : नवीन वर्ष आणि मानसिक स्वास्थ्य | १३ |
| फा. विल्सन रिबेलो | : मागी लोक कोण? | १७ |
| अनिल एल. गोन्सालवीस | : बीजरूप पाप : 'राग' व चौथा राजा, हेरोद...! | १९ |
| 'सुवार्ता' परिवार | : श्रद्धांजली : डॉक्टर बाबा आढाव | २१ |
| जॉन गोन्सालविस | : वाचकांचा प्रतिसाद : लेखकांची संजीवनी! | २३ |
| प्रा. डॉ. अविनाश कोल्हे | : गोव्याच्या चर्चमध्ये हिंदी भाषेत सामूहिक प्रार्थना | २५ |
| जॉन लुईस परेरा | : आधुनिक विवाह सोहळा | २७ |
| लिला परेरा | : आनंदी रहा, निरोगी रहा | २९ |
| थॉमस ब्रिटो | : रुग्णांना जीवदान देणारा कॅथलॅब विभाग | ४७ |
| नीता डिमेलो | : रोझरी - एक आध्यात्मिक शस्त्र | ४९ |
| फ्रान्सिस डिसोजा | : संतपदाचे मानकरी : फा. पाद्रे पिओ | ५१ |
| लुकस परेरा | : संयमी व कुशल युवा नेतृत्व | ५३ |
| अनभिज्ञ | : नाती जपा; माणुसकी रुजवा | ५४ |
| सिओना गॉडफ्री कोरिया | : रेड कॉरिडॉरमध्ये आरोग्य सेवा (अनुवाद: जॉन कोलासो) | ७१ |
| स्वाती सुभाष वळवी | : जीवनाचे शिक्षण देणारी 'ज्ञानमाता' | ७७ |
| नॉर्मा डिसिल्वा | : मुलांचे धर्मगुरू (बालमेवा) | ८१ |
| सलोमी सुरेश मार्टीन | : दृढीकरण साक्रामेंतामुळे माझा आध्यात्मिक प्रवास | ८३ |
| मिल्का डिसिल्वा | : दृढीकरण साक्रामेंतामुळे पवित्र त्रैक्याची ओळख | ८३ |
| विजय रॉड्रीग्ज | : निसर्गरम्य बीद | ८५ |
| विल्यम गोन्सालविस | : ह्यावर विचार व्हावा | ८७ |
| डॅरल परेरा, रॉबर्ट फर्नांडीस | : कविता | ८८ |
| संकलन | : साद-प्रतिसाद : स्मरणीय व्यक्ती किंवा घटना | ८९ |
| फा. मायकल रोझारिओ | : पुस्तक परिचय | ९१ |
| झेविअर डिमेलो | : विशाल विश्वात | ९२ |
| संकलन | : वृत्तविहार | ९३ |
| अनिल घोन्साल्वीस | : 'सुवार्ता' शब्दकोडे - ५ | ९६ |
| फा. जोएल डिकुना | : मनन-चिंतन-मंथन : नवी दृष्टी, सृष्टी व दूरदृष्टी | ९७ |
| नाझरेथ अथाईत | : उपासना वर्ष दिनदर्शिका : जानेवारी २०२६ | ९८ |


## अंर्तनाद

### पोपमहोदयांचा जानेवारी महिन्यातील प्रार्थना हेतू




परमेश्वरी वचन आपल्या जीवनाचे पोषण आणि आपल्या समाजात आशेचा स्रोत बनावे तसेच बंधुभाव वाढविणे आणि मिशनरी चर्च घडविण्यासाठी देवशब्दाची मदत व्हावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

''कोणी दुसऱ्याचे कपडे चोरतो तेव्हा आपण त्याला 'चोर' म्हणतो. नग्न माणसाला कपडे घालू शकतो आणि घालू शकत नाही त्यांना आपण सारखेच नाव देऊ शकतो काय?

तुमच्या कपाटातील भाकरी भुकेल्यांची आहे; तुमच्या कपाटात न वापरलेला कोट हा गरजवंतांचा आहे; तुमच्या कपाटात कुजणारे शूज हे ज्याच्याकडे शूज नाहीत त्यांच्या मालकीचे आहेत;

तुम्ही पैसे गोळा करता ते गरिबांचे आहेत...''



**- संत बॅझिल** (३२९-३७९)



## अधिकृत - १

# मार्गदर्शक, दिशादर्शक, प्रेरणादायी कुटुंब

२०२६ ह्या नवीन वर्षाच्या सर्वांना कृपापूर्ण हार्दिक शुभेच्छा! वसई धर्मप्रांत आणि पश्चिम विभागासह सर्व धर्मप्रांतांनी नवीन २०२६ वर्षामध्ये **'कुटुंब, श्रद्धा शिक्षण आणि सृष्टीची काळजी'** ह्या विषयांवर विशेष लक्ष केंद्रित करून मनन-चिंतन करण्यासाठी आपणांस आमंत्रित केले आहे. ह्या नवीन वर्षात, आपल्याला आपल्या घरांकडे अंतर्मुख होऊन पाहण्यास आणि आपल्या सामायिक घराकडे, ह्या पृथ्वीवर, बाहेरून पाहण्यास आवाहन केले आहे. ह्या दोहोंच्या केंद्रस्थानी कुटुंब आहे. कुटुंब हा केवळ समाजाचाच नव्हे; तर चर्चचाही पाया आहे. कुटुंब हे देवाच्या योजनेतील एक पवित्र पाचारण आहे. कुटुंब ही फक्त एक सामाजिक रचना नसून, जीवन, प्रेम, श्रद्धा आणि जबाबदारी जोपासण्यासाठी देवाने निवडलेली एक दैवी संस्था आहे. म्हणून संत दुसरे जॉन पॉल म्हणतात, **''जगाचे आणि चर्चचे भविष्य कुटुंबातूनच घडते.''**

आजच्या जगात नैतिक अनिश्चितता, झपाट्याने बदलणारी जीवनशैली, डिजिटल संकटे, पर्यावरणाची आव्हाने आणि दुर्बल होत चाललेले नातेसंबंध अशा समस्यांच्या पार्श्वभूमीत, श्रद्धा बांधणी आणि सृष्टीच्या काळजीद्वारे मजबूत कुटुंबे घडविण्याचे आवाहन, आज अधिकच तातडीचे आव्हान झाले आहे; एक पवित्र मिशन बनले आहे. संत जॉन पॉल दुसरे सांगतात, ''कुटुंब हा चर्चचा मार्ग आहे.'' - कुटुंबे मजबूत, श्रद्धेने भरलेली आणि सृष्टीच्या काळजीसाठी कटिबद्ध असतात तेव्हा चर्च आणि समाज फुलतो, बहरतो.

### कुटुंब : मानवजातीस देवाची पहिली देणगी

कुटुंब ही मानवजातीसाठी देवाची पहिली व सर्वांत सुंदर रचना आहे. आरंभीपासूनच देवाने जीवन, नियम आणि प्रेम कुटुंबाच्या हाती सोपवले. चर्च कुटुंबाला 'घरगुती ख्रिस्तसभा' (Domestic Church) असे संबोधते, कारण घरामध्येच श्रद्धा प्रथम जगली जाते, अनुभवली जाते व साक्ष बनते. ''घर भिंतींनी उभारते, पण घरपण प्रेम आणि स्वप्नांनी घडते,'' अशी म्हण आहे. घरातच आपण प्रथम प्रार्थना करायला, वाटून घ्यायला व प्रेम करायला शिकतो. पोप फ्रान्सिस हे सत्य अधोरेखित करत म्हणतात, ''कुटुंब हे प्रेम शिकण्याचे स्थान आहे; मानवी जीवनाचे नैसर्गिक केंद्र आहे.''

वसई धर्मप्रांतातील कुटुंबे श्रद्धेसाठी परिचित आहेत. खोलवर रुजलेली श्रद्धा, खंबीर सांस्कृतिक मूल्ये आणि समुदाय भावना ह्यांचे ती आधारस्तंभ आहेत. मात्र आधुनिक आव्हाने - व्यस्त वेळापत्रके, बदलती जीवनशैली, डिजिटल व्यत्यय, तरुणांचे स्थलांतर, आर्थिक ताणतणाव व वाढती व्यक्तिकेंद्रित मानसिकता - कुटुंबातील नाते कमकुवत करतात. अशा वेळी संत मदर तेरेजांचे ठळक शब्द : ''जग बदलायचे असेल, तर घरी जा आणि आपल्या कुटुंबावर प्रेम करा.'' त्यामुळे कौटुंबिक नातेसंबंध जोपासणे अधिक आवश्यक ठरते. समाजाचे नूतनीकरण घरापासूनच - प्रेम, संयम व निष्ठेच्या दैनंदिन कृतींमधून - सुरू होते. कुटुंबे दिशादर्शक आहेत; ती महान उंची गाठण्याची प्रेरणा देतात. त्यांची भूमिका अपरिहार्य आहे.

### श्रद्धा शिक्षण : पालक हे पहिले शिक्षक

श्रद्धा शिक्षणाची सुरुवात संस्थांमध्ये नव्हे; तर कुटुंबाच्या हृदयात होते. श्रद्धा शिक्षण केवळ वर्गात नव्हे; तर घरातच सुरू होते. पालक हे श्रद्धेचे पहिले व महत्त्वाचे शिक्षक आहेत. संत जॉन ख्रिजोस्टम ह्यांनी पालकांना सांगितले, ''तुमचे घर चर्च बनवा, कारण तुमच्या मुलांच्या तारणासाठी तुम्हाला जबाबदार धरले जाईल.'' श्रद्धा शिकवण्यापेक्षा ती पाहून आत्मसात केली जाते. एकत्र प्रार्थना करणे, कुटुंबासह मिस्सामध्ये सहभागी होणे, बायबल वाचन, श्रद्धेचे अनुभव वाटून घेणे आणि धार्मिक सण एकत्र साजरे करणे ह्या साध्या कृती श्रद्धा आणि ऐक्य दृढ करतात. त्या आयुष्यभर वाढणारी बीजे पेरतात.

पोप सोळावे बेनेडिक्ट म्हणतात, ''श्रद्धेचे हस्तांतरण हे केवळ बौद्धिक कार्य नसून, कुटुंबातील प्रेम आणि साक्षीद्वारे पुढे दिला जाणारा जिवंत अनुभव आहे.'' अनेक घरांमध्ये कौटुंबिक प्रार्थनेचे पुनरुज्जीवन केल्याने परिवर्तन घडले आहे. २०२६च्या पूर्वसंध्येला, मी कुटुंबांना एकत्र येण्याचे, २०२५बद्दल देवाचे आभार मानण्याचे व भविष्य त्याच्या हाती सोपवण्याचे आवाहन




करतो. असे क्षण देवावरचा विश्वास दृढ करतात व श्रद्धा हा एक सामुदायिक प्रवास बनवतात. आजच्या गुंतागुंतीच्या जगात, श्रद्धाबांधणी मुलांना व तरुणांना ख्रिस्ती मूल्यांनुसार जगण्याचे दर्शन घडवते. पालकांनी आपल्याला ज्या पद्धतीने वाढवले तसेच मुलांना वाढवू नये; ते ज्या जगात जगत आहेत त्यासाठी त्यांना तयार करावे, ख्रिस्तामध्ये व त्याच्या शिकवणीत त्यांना दृढपणे रोवावे. श्रद्धाच कुटुंबांना आशा आणि विश्वासाने अनिश्चिततेला सामोरे जाण्याची शक्ती देते.

**सृष्टीची काळजी : नैतिक आणि आध्यात्मिक जबाबदारी**

सृष्टीची काळजी ही ख्रिस्ती श्रद्धेची अनिवार्य अभिव्यक्ती आहे. *'Laudato Si'* मध्ये पोप फ्रान्सिस सांगतात, ''पृथ्वी हे आपले सामायिक घर आहे व भविष्यातील पिढ्यांप्रति आपली जबाबदारी ओळखण्याचे आवाहन मानवजातीला करते. पृथ्वी आपल्या मालकीची नाही, आपण पृथ्वीचे आहोत.'' निसर्गाबद्दलचा दृष्टिकोन व शाश्वततेची जाणीव घडवण्यात कुटुंबांची महत्त्वाची भूमिका आहे. घरातील वातावरण पाहून मुले सृष्टीचा आदर करायला शिकतात. पर्यावरणाचे संरक्षक, संत फ्रान्सिस असिसीकर म्हणतात, ''संपूर्ण सृष्टी एकमेकांशी जोडलेली आहे; म्हणून प्रत्येक घटकाची प्रेम व आदराने काळजी घेतली पाहिजे.''


वसई धर्मप्रांत निसर्गरम्य हिरवळ आणि किनारी भागांनी समृद्ध आहे. 'हरित वसई'च्या नावाने हिरव्या पट्ट्याचे रक्षण करण्यासाठी आंदोलनेही झाली आहेत. आज कुटुंबांना देवाच्या देणग्यांचे जबाबदार संरक्षक बनण्याचे आव्हान आहे. कचरा कमी करणे व पुनर्वापर करणे, पाणी-वीज वाचवणे, झाडे लावणे, परिसर स्वच्छ ठेवणे, बावखले (तळी) सुशोभित करणे आणि प्लास्टिक टाळणे आदी साध्या कृती श्रद्धेची साक्ष बनतात. पोप सोळावे बेनेडिक्ट स्पष्टपणे सांगतात, ''पर्यावरण ही देवाची सर्वांसाठी देणगी आहे आणि त्याचा वापर करताना गरीब, भविष्यातील पिढ्या आणि संपूर्ण मानवजातीप्रति आपली जबाबदारी आहे. आपण पृथ्वी आपल्या पूर्वजांकडून वारशाने घेतलेली नाही; ती आपण आपल्या मुलांकडून उधार घेतली आहे.'' कुटुंबात आपण मुलांना सृष्टीची काळजी घ्यायला शिकवतो, तेव्हा आपण त्यांना जीवनाचा आदर करायला शिकवत असतो. ''सृष्टीची काळजी घरापासून सुरू होते'' आणि प्रत्येक लहान कृती महत्त्वाची ठरते.

**आशेने भरलेले नवीन वर्ष २०२६**

वसई धर्मप्रांतातील सहभागाची ख्रिस्तसभा (सिनडल चर्च) कुटुंबांसोबतचा प्रवास पुढे चालू ठेवत आहे; धर्मगुरू, व्रतस्थ आणि प्रापंचिक ह्यांच्यातील सहकार्याला प्रोत्साहन देत आहे. नवीन वर्ष २०२६ ची पूर्वसंध्या ही कृपेची, कृतज्ञतेची आणि भविष्यासाठी नव्या बांधिलकीची पवित्र वेळ आहे. आव्हाने असूनही, ख्रिस्ती कुटुंबांना आशेने पुढे चालण्याचे आवाहन आहे. श्रद्धा, प्रेम आणि जबाबदारीने नवीन वर्षाची सुरुवात करण्यासाठी कुटुंबांना आमंत्रित केले जाते. पोप फ्रान्सिस आपल्याला आश्वस्त करतात, ''आपण आपली पावले नव्याने वळवू शकतो, अशा आशा ओळखायला आपल्याला मदत करते.''

२०२६ ह्या नवीन वर्षात वसई धर्मप्रांतातील कुटुंबे प्रार्थनेत रुजलेली, श्रद्धेने बळकट झालेली, प्रेमात एकत्र आलेली आणि सृष्टीच्या काळजीसाठी कटिबद्ध अशी घडवू या. आपली घरे प्रार्थना, शांती आणि संरक्षणाची स्थाने बनोत. आपली घरे खऱ्या अर्थाने 'घरगुती चर्च' बनून जगात देवाचे प्रेम पसरवोत. संत दुसरे जॉन पॉल ह्यांनी कुटुंबांना दिलेल्या प्रोत्साहनाप्रमाणे, ''कुटुंबा, तू जे आहेस ते बन.'' नूतन वर्ष वसई धर्मप्रांतातील कुटुंबांसाठी श्रद्धेत अधिक बळकट, प्रेमात अधिक सखोल आणि एकमेकांशी व आपल्या सामायिक घराची काळजी घेण्याच्या ध्येयाशी अधिक निष्ठावान ठरो; समाजात श्रद्धा आणि आशेची साक्ष देणारी बनोत. ''मजबूत कुटुंबे, मजबूत समाज घडवतात आणि मजबूत समाज आशावादी भविष्य घडवतात.''

आपणां सर्वांना नवीन वर्षाच्या आशीर्वादित व सुखदायी शुभेच्छा!



**+ बिशप थॉमस डिसोजा**

***घणघण घंटानाद जाहले; गतवर्ष हे सरले***
***नूतन वर्ष (२०२६) हे उगवले; चला स्वागता सामोरे***
***जगू या आनंदी, श्रद्धामय संपन्न जीवनी***
***साकारू या मानवतेचा अभ्युदय!***
***नूतन वर्षाच्या (२०२६) हार्दिक शुभेच्छा!***

**- सुवार्ता परिवार**

# Mission Sunday Collection In the Diocese of Vasai For The Year - 2025

| Sr. No. | Place | Name of the Parish | *Total Population | Contribution for 2024 in Rupees | Contribution Per Person in Rupees for 2024 | **Total Population | Contribution for 2025 in Rupees | Contribution Per Person in Rupees for 2025 | # % Year on Year Growth (YoY) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **Barampur** | St. Gonsalo Garcia Church | 4,068 | 11,29,529 | 277.66 | 3,980 | 11,65,477 | **293** | 3% |
| 2 | **Sandor** | Roman Catholic Church of St. Thomas | 6,419 | 16,00,280 | 249.30 | 5,741 | 14,42,249 | **251** | -10% |
| 3 | **Papdy** | Our Lady of Grace Cathedral | 6,201 | 16,16,340 | 260.66 | 6,308 | 14,40,086 | **228** | -11% |
| 4 | **Dahanu** | Our Lady of Dolours Church | 425 | 1,30,557 | 307.19 | 440 | 97,941 | **223** | -25% |
| 5 | **Remedy** | Church of Our Lady of Remedies | 3,874 | 8,75,036 | 225.87 | 4,581 | 8,01,977 | **175** | -8% |
| 6 | **Chulne** | Our Lady of Fatima Church | 2,281 | 3,11,420 | 136.53 | 2,270 | 3,86,910 | **170** | 24% |
| 7 | **Palle** | Mother of God Church | 4,610 | 9,93,900 | 215.60 | 4,551 | 7,34,745 | **161** | -26% |
| 8 | **Umela** | Our Lady of Immaculate Conception | 242 | 38,422 | 158.77 | 237 | 37,860 | **160** | -1% |
| 9 | **Gokhivare** | St. Roque Church | 1,989 | 2,26,660 | 113.96 | 1,508 | 2,32,651 | **154** | 3% |
| 10 | **Mulgaon** | St. Mary Magdalene Church | 2,166 | 3,33,072 | 153.77 | 2,022 | 3,06,885 | **152** | -8% |
| 11 | **Evershine** | Infant Jesus Church | 3,365 | 4,88,247 | 145.10 | 3,477 | 5,26,617 | **151** | 8% |
| 12 | **Virar (W)** | Blessed Mother Teresa Church | 1,240 | 2,26,920 | 183.00 | 1,795 | 2,60,334 | **145** | 15% |
| 13 | **Merces** | Our Lady of Mercy Church | 3,547 | 4,91,775 | 138.65 | 3,800 | 5,30,055 | **139** | 8% |
| 14 | **Nalasopara (W)** | St. John Paul II Church | 1,546 | 1,94,120 | 125.56 | 1,346 | 1,84,090 | **137** | -5% |
| 15 | **Mann-Boisar** | Our Lady of Health Church | 480 | 76,414 | 159.20 | 462 | 62,415 | **135** | -18% |
| 16 | **Manickpur** | St. Michael Church | 6,593 | 10,30,590 | 156.32 | 7,500 | 9,91,840 | **132** | -4% |
| 17 | **Girij** | St. Francis Xavier Church | 3,442 | 4,98,858 | 144.93 | 3,438 | 4,51,300 | **131** | -10% |
| 18 | **Bolinj** | Christ the King Church | 1,215 | 1,65,187 | 135.96 | 1,310 | 1,65,064 | **126** | 0% |
| 19 | **Shirlaiwadi** | Our Lady of Lourdes Church | 2,099 | 2,06,104 | 98.19 | 2,064 | 2,48,015 | **120** | 20% |
| 20 | **Palghar** | Nativity of Our Lady Church | 461 | 60,231 | 130.65 | 526 | 61,770 | **117** | 3% |
| 21 | **Gass** | St. Gonsalo Garcia Church | 4,078 | 3,92,505 | 96.25 | 4,078 | 4,76,742 | **117** | 21% |
| 22 | **Nandakhal** | Holy Ghost (Spirit) Church | 7,339 | 9,15,210 | 124.71 | 8,300 | 9,61,291 | **116** | 5% |
| 23 | **Rajodi** | Our Lady of Health Church | 527 | 62,229 | 118.08 | 560 | 63,430 | **113** | 2% |
| 24 | **Agashi** | St. James Church | 3,503 | 3,86,282 | 110.27 | 3,551 | 3,90,391 | **110** | 1% |
| 25 | **Ambadi** | St. Ignatius Loyola Church | 3,924 | 3,23,010 | 82.32 | 3,240 | 3,18,920 | **98** | -1% |
| 26 | **Nirmal** | Holy Cross Church | 1,765 | 1,46,356 | 82.92 | 1,801 | 1,57,909 | **88** | 8% |
| 27 | **Gomesali** | Holy Trinity Church | 1,362 | 1,11,860 | 82.13 | 1,345 | 1,17,441 | **87** | 5% |
| 28 | **Naigaon** | Mary Help of Christians Church | 2,570 | 2,42,088 | 94.20 | 2,573 | 2,19,414 | **85** | -9% |
| 29 | **Merdes** | Our Lady of Velankanni Church | 1,825 | 1,25,395 | 68.71 | 1,852 | 1,47,660 | **80** | 18% |
| 30 | **Koliwada** | St. Peter Church | 6,856 | 5,61,577 | 81.91 | 7,241 | 5,61,303 | **78** | 0% |
| 31 | **Nanbhat** | St. Paul Church | 2,906 | 2,15,850 | 74.28 | 2,898 | 2,21,855 | **77** | 3% |
| 32 | **Bhuigaon** | Holy Family Church | 3,150 | 2,09,772 | 66.59 | 3,257 | 2,09,354 | **64** | 0% |
| 33 | **Jyoti** | Our Lady of Light Church | 662 | 34,330 | 51.86 | 680 | 41,200 | **61** | 20% |
| 34 | **Umralla** | St. Joseph Church | 2,323 | 95,750 | 41.22 | 2,100 | 1,20,345 | **57** | 26% |
| 35 | **Arnala** | St. Peter Church | 3,592 | 2,02,802 | 56.46 | 3,622 | 1,83,000 | **51** | -10% |
| 36 | **Nalasopara(E)** | St. Francis De Sales Church | 2,860 | 38,270 | 13.38 | 950 | 43,808 | **46** | 14% |
| 37 | **Bhiwandi** | Divine Mercy Church | 545 | 23,190 | 42.55 | 350 | 13,430 | **38** | -42% |
| 38 | **Virar (E)** | Resurrection Church | 2,625 | 47,493 | 18.09 | 2,280 | 51,699 | **23** | 9% |
| | | | | | | | | | |
| **Sr. No.** | **Place** | **Mission Parishes / Centres** | **Population** | **Contribution for 2024 in Rupees** | **Contribution Per Person in Rupees for 2024** | ***Total Population (as on 2025)** | **Contribution for 2025 in Rupees** | **Contribution Per Person in Rupees for 2025** | **# % Year on Year Growth (YoY)** |
| 1 | **Assangaon** | Sanjivini Ashram | 154 | 27,917 | 181.28 | 80 | 14,620 | **183** | -48% |
| 2 | **Mokhada** | Suryodaya Ashram | 4 | Nill | Nill | 28 | 2,400 | **86** | N/A |
| 3 | **Wada** | Our Lady of Rosary Church | 369 | 3,210 | 8.70 | 374 | 24,180 | **65** | 653% |
| 4 | **Walive** | Our Lady of Pilar Mass Centre | 210 | 14,750 | 70.24 | 208 | 11,825 | **57** | -20% |
| 5 | **Varkhanda** | Sacred Heart Church | 2,403 | 1,29,528 | 53.90 | 3,153 | 1,65,496 | **52** | 28% |
| 6 | **Jankipada** | Carmel Mata Prathan Centre | 496 | 20,883 | 42.10 | 552 | 18,535 | **34** | -11% |
| 7 | **Bahare** | Our Lady of Lourdes | 489 | 13,452 | 27.51 | 488 | 13,494 | **28** | 0% |
| 8 | **Ashagad** | Our Lady of the Forsaken Church | 640 | 26,165 | 40.88 | 1,373 | 29,950 | **22** | 14% |
| 9 | **Manor** | St. Gonsalo Garcia Church | 480 | Nill | Nill | 148 | 3,000 | **20** | N/A |
| 10 | **Gangangaon** | Param Peeta Church | 2,500 | 54,337 | 21.73 | 3,199 | 63,434 | **20** | 17% |
| 11 | **Talasari** | Our Lady of Perpetual Succour Church | 4,525 | 1,75,049 | 38.68 | 9,654 | 78,000 | **8** | -55% |
| | | | | | | | | | |
| | | **Total** | **1,20,945** | **1,52,92,922** | **126.45** | **1,27,291** | **1,48,52,407** | **117** | -3% |

Notes

1. * Population figures are taken from the Diocesan Directory 2023.
2. ** Population figures for 2025 are taken from the latest Diocesan Directory 2025.
3. Parishes are arranged in descending order based on the per-person contribution for the year 2025.
4. # YoY denotes the percentage increase or decrease in the total contribution of each parish in 2025 as compared to 2024.
5. 25 parishes have shown positive growth in Mission Sunday collections for the year 2025.
6. 17 parishes have recorded a decline of 5% or more in their Mission Sunday collection for 2025 as compared to 2024.
7. Compared to last year, the Vasai diocesan contribution has decreased by Rs. 4,40,515/- ( reduction of 3 %)
8. The per capita contribution of the Diocese of Vasai has decreased from ₹126.45 in 2024 to ₹117 in 2025.
9. A total amount of ₹1,48,65,717 (Rupees One Crore Forty-Eight Lakhs Sixty-Five Thousand Seven Hundred and Seventeen) has been remitted to the Pontifical Mission Organisation of the Vatican.
   (This includes ₹13,310 received late last year, which has been added to this year's total)

**Fr. Rajesh Lopez**
**(Financial Administrator)**




संपादकीय

# केवळ ज्ञानवंत नव्हे, प्रज्ञावंत सुद्धा व्हावे

येशूच्या जन्मानंतर त्या अद्‌भुत नि दिव्य घटनेचे साक्षीदार विविध थरातील होते : मरिया व योसेफ (येशूचे माता-पिता), देवदूत (दिव्यत्वाची घोषणा करणारे), मेंढपाळ (जागरण करणारे गरीब लोक) आणि दूरवरून आलेले 'मागी' लोक.

ग्रीक शब्द 'मागी'चे मराठीत चार अर्थ आहेत :

(१) पर्शियातील याजकांचा एक समुदाय (२) गूढ किंवा अज्ञेय ज्ञान व शक्तीचे भोक्ते (३) जादूगार / हात चलाखी करणारे (४) कूट चिकित्सक किंवा चलाख माणसे. पवित्र बायबलमधील मत्तय २:१-१२ प्रमाणे 'मागी' लोक खगोलशास्त्रज्ञ होते आणि बेथलेहमच्या 'पूर्वेकडील' म्हणजे बाबिलोनिया, इराक येथील असावेत. (ते तीनच होते असा उल्लेख नाही)


संबंधित ख्रिस्तजन्मकथा प्रामुख्याने ईशज्ञानीय संदर्भाने ओतप्रोत भरली आहे :

१) येशू हा राजा व मसिहा / तारणारा असता त्याने मानवी जन्म घेतला (मीखा ५:१-३).

२) स्वर्गातून देवदूत पृथ्वीवर अवतरले, त्यांनी येशूजन्माची बातमी दिली (मत्तय २:१-१२).

३) गरीब / कमी प्रतीच्या समजल्या जाणाऱ्या मेंढपाळांनी येशूला प्रथम भेट दिली व वंदन केले (लूक २:८-१७).

४) येशूजन्माचा निदर्शक तारा जेकबच्या ताऱ्याशी निगडित आहे असे ध्वनित होते (गणना २४:१७).



५) यथावकास कास्पर, मेल्किओर, बाल्थाझार हे तीन खगोलशास्त्रज्ञ 'तीन राजे' गणले जातात (स्तोत्र ७२:१०; यशया ६०:६). ते विविध देशातील व अन्य धर्मीय लोक होते.

६) मागी लोकांच्या तीन भेटवस्तू प्रातिनिधिक व प्रतीकात्मक आहेत : सोने हे येशूची राजेशाही वंशावळ व पृथ्वीचा राजा दर्शविते; इन्सेंस / धूप हे येशूच्या महायाजकत्वाचे चिन्ह होय. ऊद हे जीवनाच्या अंतिम क्षणावेळी उपयुक्त तेल होय (संदर्भ, यशया ४९:२३).

७) येशूजन्मानंतर उगवलेला 'तारा' हे अप्रतिम चिन्ह व खगोलशास्त्राच्या संशोधनाचा विषय होय. म्हणून तिघे मागी निघाले, विचारपूस करीत हेरोद राजाकडे आले. त्यांनी येशूचे दर्शन घेतले आणि बाळ येशूला तीन भेटवस्तू सादर केल्या. मागी लोक येशूच्या प्रकटीकरणाचे साक्षीदार बनले; परमेश्वरावरील श्रद्धेला प्रतिसाद म्हणजे प्रकटीकरण होय. सर्वसमर्थ, सर्वज्ञ व सर्वव्यापी परमेश्वर त्याची शक्ती व सामर्थ्य, त्याचे शहाणपण व प्रज्ञा तसेच त्याची उपस्थिती व वास्तव्य विविध व्यक्ती, घटना व देवशब्दांद्वारे उघड करतो.



प्रभू येशूचे दिव्यत्व अनुभवून मागी लोक बदलले : ज्ञानवंत होते, येशूच्या दर्शनाने ते प्रज्ञावंत झाले. शहाणे झाले. त्यामुळे त्यांनी परतीचा मार्ग बदलला आणि स्वदेशी पोहोचले. मात्र मागी लोकांनी परत येऊन आपल्याला कळवले नाही म्हणून हेरोद राजा खवळला आणि त्याने येशूला ठार करण्याच्या हेतूने दोन वर्षांखालील बालकांची कत्तल केली पण त्याआधी येशूच्या माता-पित्यानी येशूला इजिप्त देशात सुखरूप नेले होते (मत्तय २:१६-१८).

येशूच्या प्रकटीकरणाची घटना बोलकी आहे :

- मागी लोकांना ताऱ्याद्वारे तारणारा सापडला. आपल्या जीवनाचा तारा / ध्येय आपल्याला सापडले आहे का? ते मला स्पष्ट आहे का? ते गाठण्यासाठी मी इतरांची मदत घेतो का?
- प्रभू येशूच्या दर्शनाने महान लोक लहान बाळ, येशूकडे आले आणि त्यांना दिव्यत्वाचा साक्षात्कार झाला. मी इतरांना भेट देतो का?
- शहाणा माणूस बदलतो, बदला घेत नाही. तो ऐकतो, केवळ कानाने नव्हे; तर हृदयाच्या कानानेसुद्धा. मला शांततेत शांतीचा आवाज ऐकू येतो का?
- अंतर्वाणीचा आवाज ऐकल्यावर तो प्रत्यक्षात आणण्यासाठी मागी लोक मागे वळत नाहीत, पुढे जातात, पुरोगामी बनतात, प्रतिगामी नव्हते, सर्वांसाठी.
- शहाणा माणूस हिंसा करीत नसतो, कुणाला मारीत नसतो. शहाणा माणूस द्रष्टा, दूरदृष्टीचा, दिशादर्शक बनतो. तो नवी वाट तयार करतो; यथावकाश त्याचे रूपांतर रस्ता, मार्ग व महामार्गातसुद्धा होते. अभिनव, अभिजात, अद्वितीय मार्ग कृपेमुळे शक्य व संभवनीय असतात.

केवळ ज्ञान + कौशल्य म्हणजे 'प्रज्ञा' नव्हे; तर ज्ञान + कौशल्य + परमेश्वराशी साथसंगत (परमेश्वरी बळप्राप्ती, परमेश्वरी योजनेला होकार व परमेश्वरी सहवास) म्हणजे 'प्रज्ञा' होय, त्याद्वारे परमेश्वर, मानवी समाज व पर्यावरणाची काळजी घेतली जाते. अशी सर्वसमावेशक प्रज्ञा आपणां सर्वांना ह्या नववर्षात लाभो हीच सदिच्छा!

**- फा. जोएल डिकुना**

उपसंपादकीय

# सोहळ्यात हरवलेली साक्रामेंते

## (साक्रामेंतांपेक्षा सोहळेबाजीला ऊत का आला आहे?)

**-फा. रॉबर्ट गोन्साल्वीस**



ख्रिस्ती साक्रामेंते हा श्रद्धेचा उत्सव आहे. बाप्तिस्मा, प्रायश्चित्त, ख्रिस्तशरीर, मिस्सा, दृढीकरण, रुग्णाभिषेक, गुरुदीक्षा आणि विवाह अशा सप्त-साक्रामेंतांतून मानवी जीवनाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर विविध परमेश्वरी कृपेची दालने श्रद्धावंतांसाठी खुली होत असतात.

सर्वसाधारणपणे बालवयात बाप्तिस्मा, किशोरवयात ख्रिस्तशरीर व प्रायश्चित्त, पौगंडावस्थेत दृढीकरण, तारुण्यात विवाह वा गुरुदीक्षा व गंभीर आजारपणात रुग्णाभिषेक असे ख्रिस्तसभेतील प्रत्येक साक्रामेंत श्रद्धावंताला त्याच्या जीवनाच्या विविध अवस्थांतून देवत्वाच्या अधिकाधिक जवळ नेण्यास साहाय्यभूत ठरते. मानव-देहधारी देव, मर्त्य मनुष्याला ह्या साक्रामेंतांद्वारे कृपेची कवचकुंडले बहाल करून परमेश्वराठायी अमरत्वाचे जीवन जगण्यास आमंत्रण देत असतो. तेव्हा, ख्रिस्ती साक्रामेंते म्हणजे जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर उत्तरोत्तर त्याच्या देवत्वात सहभागी होऊन शाश्वत जीवनात प्रवेश करण्याची ही प्रमाणित प्रक्रिया असते. पापपंकजी रुतलेल्या सुरवंटरूपी पामराचे परमेश्वराप्रीत्यर्थ चित्तवेधक फुलपाखरू होण्याचा हा आध्यात्मिक प्रवास भाविक भक्तासाठी निश्चितच उत्साहवर्धक व आनंददायी असतो आणि तो तसा साजरा केला जातो ह्यात काही गैर नाही. तथापि, आज साक्रामेंतापेक्षा समारंभाला, पावित्र्यापेक्षा प्रदर्शनाला व साजरे करण्यापेक्षा सोहळेबाजीला अधिक ऊत आल्याचे सर्रास दिसून येते हे दुर्दैव!

वास्तविक, साक्रामेंते ही श्रद्धा, आत्मिक परिवर्तन आणि देवाशी नाते दृढ करणारी साधने आहेत; परंतु त्यांचा खरा अर्थ बाजूला ठेवून भव्य देखावा, खर्चिक समारंभ! अनावश्यक भोजनावळी, संसाधनांची नासाडी, वारेमाप उधळपट्टी, बहुरूप्यांची अंगविक्षेपी कृती, नावीन्याच्या नावाखाली मूळ संस्कृतीबाह्य गोष्टींचा अनावश्यक सोस, फोटो-व्हिडिओ आणि सामाजिक प्रतिष्ठा ह्यांनाच अधिक महत्त्व दिले जात असल्याचे दिसून येते. साक्रामेंतांकडे दुर्लक्ष करून हे सोहळे कुटुंबीयांच्या व्यवसाय-वृद्धीचे उपक्रम (business promotion events) म्हणूनच साजरे केले जातात की काय अशी कुणाला शंका येऊ लागली तर ती चूक ठरू नये.

अलीकडे वसईत विवाहपूर्व भोजन-समारंभाची नवी पद्धत रुजू झाली आहे त्याविषयी. समारंभासाठी मंडप वा मंगल-कार्यस्थळांची वाणवा किंवा अनुपलब्धता हे त्यासाठी एक कारण दिले जाते. आमंत्रितांची संख्या हा विषय सोडला तर बाळजन्मोत्सव, वाढदिवस, बढती, निवृत्ती अशा अनेक सोहळ्या-निमित्ताने साजरे होणारे स्वागत-समारंभासाठीही तीच अडचण येऊ शकते. मग त्याच कारणासाठी हे सर्व समारंभही जन्म-वाढदिवस-निवृत्तीचा तो विवक्षित दिवस येण्यापूर्वीच आटोपून घ्यावेत का?

कोणत्याही सोहळ्याप्रसंगी कुणी किती मेजवान्या व भोजनावळी द्याव्यात हा ज्याच्या त्याच्या आर्थिक कुवतीचा भाग आहे. तथापि, ज्या निमित्ताने समारंभाचे प्रयोजन आहे तेच, देव न करो, पण काही अघटित घडून रद्द करायची पाळी आली तर! (अशा घटना अनेकदा घडल्या आहेत). मग भोजनावर आधीच ताव मारून गेलेले वऱ्हाडी कोणत्या प्रसंगाचा आनंद व्यक्त करण्यासाठी ती मेजवानी होती, ह्याचे उत्तर काय देऊ शकतील?.

खरं म्हणजे, ख्रिस्ती साक्रामेंत रविवारी घेणे परंपरेनुसार अधिक प्रचलित व ती त्यांची विशेष ओळख असताना, आज साक्रामेंते सप्ताहभरात कोणत्याही दिवशी साजरे करण्यासाठी लागलेली स्पर्धा व त्यासाठी होत असलेला आग्रह नक्की काय दर्शविते? हा गंभीर चिंतनाचा विषय आहे, तो सप्ताहातील रविवार व्यतिरिक्त इतर कोणत्याही दिवसाचा दु:स्वास करण्याचा हा विषय नाही. तसेही, साक्रामेंते इतर दिवशी साजरे करणे धर्मकायद्यानुसार निषिद्धही नाही. अर्थात, असे असले तरी पूर्वीपासून केवळ अपवादात्मक परिस्थिती वगळता साक्रामेंत रविवारी साजरे करण्याचा आग्रह धरण्यामागे एक खास भूमिका व विचार आहे. तो म्हणजे, रविवारला असलेला प्रभू येशू ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाचा संदर्भ! 'रविवार (शब्बाथ) पवित्र पाळ'

म्हणून असलेली शिकवण व परपरा. त्या दृष्टीने रविवार हा आनंदाचा, विजयाचा व नवजीवनाचाही दिवस मानला जातो. तसेच, रविवार हा सामुदायिक उपासनेचा सार्वत्रिक दिवस असून, जगभरातील ख्रिस्तसभेशी आपल्याला जोडणारी, आपल्यातील एकतेची भावना जोपासणारी, ख्रिस्तेतर सर्वांसाठी ती आपली वैश्विक ओळख आहे. मग साक्रामेंतांच्या तुलनेत सोहळेबाजीच्या फुटकळ कारणांसाठी आपल्या वैश्विक अस्मितेला तिलांजली देऊन आपण नक्की काय साधत आहोत?

तसेही, साक्रामेंते ही आपल्या नेहमीच्या स्थानिक समुदायासोबत साजरी करण्याची बाब आहे. त्या दैवी आनंदाच्या क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी पाहुणे-मंडळी, दूरचे नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रपरिवार, सहकारी ह्यांना आमंत्रित करणे केव्हाही उचित. मात्र, केवळ त्यांची सोय व उपलब्धता पाहून दर रविरारी सामुदायिक प्रार्थनेसाठी आपल्यासमवेत एकत्र जमणाऱ्या आपल्या नेहमीच्या समुदायाला डावलून दुय्यम लेखण्याचे समर्थन कसे करता येईल? केवळ पै-पाहुण्यांच्या सोयीसाठी इतर दिवस निवडण्याचा आग्रह धरणाऱ्यांनी मयतादी दुःखद घटनांवेळी स्थानिक समुदायाकडून सहकार्याची अपेक्षा ठेवणे मग दुटप्पीपणाचे ठरणार नाही का?

कारण काहीही असो, पण आज श्रद्धेपेक्षा सोहळा आणि भक्तीपेक्षा प्रदर्शन साक्रामेंतांच्या केंद्रस्थानी व आपल्या श्रद्धेच्या मुळाशी येत आहे हे श्रद्धावंत म्हणून चिंताजनक आहे. ह्यामुळे साक्रामेंतांचा मूळ आध्यात्मिक उद्देश दुर्लक्षित होत असून आत्मपरीक्षणाची गरज निर्माण झाली आहे. म्हणूनच, आपण पुन्हा एकदा साक्रामेंतांचा खरा अर्थ समजून घेतला, तर श्रद्धा आणि साधेपणा ह्यांचे महत्त्व नव्याने अधोरेखित होईल. तसेच, सोहळ्यांपेक्षा श्रद्धेला, बाह्य सजावटीपेक्षा अंत:करणाच्या शुद्धतेला आणि प्रदर्शनापेक्षा प्रार्थनेला अधिक महत्त्व दिले तर ही साक्रामेंते आपल्या जीवनात खऱ्या अर्थाने फलदायी ठरतील.

साक्रामेंत हा काही कार्यक्रम किंवा 'इव्हेंट' नव्हे, तर देवाशी होणारी भेट आहे. प्रभू येशूने नेहमी साधेपणा शिकवला; त्यांनी कधीही देखाव्याला किंवा भंपकपणाला महत्त्व दिले नाही, उधळपट्टीला तर नाहीच नाही. म्हणूनच पाच हजारांना जेऊ घातल्यानंतर उरलेले अन्नपदार्थ गोळा केल्याचा उल्लेख पवित्र शास्त्रात आला आहे. म्हणून साक्रामेंताद्वारे त्याला भेटण्याच्या ह्या प्रवासात जर श्रद्धा नम्रता आणि आत्मपरीक्षणाची उणीव असेल, तर समारंभ सोहळा कितीही मोठा असला तरी आत्मा रिकामाच राहण्याची शक्यता अधिक! ●



# बाळ येशूचा नोव्हेना, मर्सिस, वसई

## २२ जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२६

*बाळ येशू तुझे गोड नाम रे । तुझ्या चरणी नमवितो मान रे ।।*
*लेकरांना लाभो रे कृपा तुझी । आरोग्य नि शांती सदा तुझी ।।*

**नोव्हेना मिस्सा व प्रवचन :** सकाळी ६.०० व ७.३०; संध्याकाळी ४.३०, ६.०० व ७.३० वाजता.

### * विशेष प्रार्थना - मिस्सा व आशीर्वाद *

* रविवार २५ जानेवारी सकाळी ९.०० वाजता : सर्व लहान बालकांसाठी.
* गुरुवार २९ जानेवारी सकाळी ९.०० वाजता : स्त्रियांची सोडॅलिटी व आशादीप संघटनेसाठी
* शनिवार ३१ जानेवारी सकाळी ९.०० वाजता : आजारी व ज्येष्ठ नागरिक संघटनेसाठी

*** रविवार दिनांक १ फेब्रुवारी २०२६ : बाळ येशूच्या सणाचा दिवस ***

*** सणाच्या मिस्सा : सकाळी ५.००, ६.१५, ७.४५, ९.१५ व १०.३०वाजता.**

# अखिल भारतीय ९९वे मराठी साहित्य संमेलन-सातारा

**१ ते ४ जानेवारी २०२६** **स्थळ : शाहू स्टेडियम, सातारा**

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, शाखा-शाहूपुरी (सातारा) व मावळा फौंडेशन, सातारा आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे ९९वे संमेलन दिनांक १ ते ४ जाने. २०२६ रोजी शाहू स्टेडियम, सातारा येथे संपन्न होत आहे. ह्या संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ कादंबरीकार **विश्वास पाटील** असतील.

**गुरुवार दिनांक १ जानेवारी २०२६**
**दुपारी ३.००वाजता : ध्वजारोहण**
हस्ते : प्रा. मिलिंद जोशी (अध्यक्ष, अ.भा.म.साहित्य महामंडळ)
**दुपारी ३.३०वाजता : ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन**
हस्ते : डॉ.तारा भवाळकर (अध्यक्ष, ९८वे अ.भा.म.साहित्य संमेलन)
**दुपारी ४.००वाजता : कवि कट्टा**
उद्घाटन - हस्ते : भालचंद्र जोशी (ज्येष्ठ उद्योजक, सातारा)
**दुपारी ४.१५वाजता : गझल कट्टा**
उद्घाटन - हस्ते : संदीप शहा (उद्योजक, पुणे)
**दुपारी ४.१५वाजता : प्रकाशन कट्टा**
उद्घाटन - हस्ते : विश्वास पाटील (अध्यक्ष, ९९वे अ.भा. संमेलन)
**दुपारी ४.३०वाजता : ग्रंथदिंडी**
उद्घाटन - हस्ते : विश्वास पाटील (अध्यक्ष, ९९वे अ.भा. संमेलन)
**सायं. ७.००वाजता :** साताऱ्यातील ज्येष्ठ साहित्यिकांचा सन्मान
हस्ते : डॉ. तारा भवाळकर (अध्यक्ष, ९८वे अ. भा. म. सा. संमेलन)
**सायंकाळी ८.३०वाजता :** संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५०व्या जन्मोत्सव वर्षानिमित्त आणि जगद्गुरू संत तुकोबाराय ह्यांच्या ३७५व्या वैकुंठगमन वर्षानिमित्त संतसाहित्याला अभिवादन करणारा कार्यक्रम - **'बहुरूपी भारूड'**
सहभाग : डॉ. भावार्थ देखणे, अवधूत गांधी आणि पांडुरंग पवार
निरुपण : स्वानंद बेदरकर

**शुक्रवार दिनांक २ जानेवारी २०२६**
(मंडप क्र. १) **सकाळी ११.००वाजता : उद्घाटन समारंभ**
**संमेलनाध्यक्ष : विश्वास पाटील पूर्वाध्यक्ष : डॉ.तारा भवाळकर**
**उद्घाटक : डॉ. मृदुला गर्ग** (ज्येष्ठ लेखिका व विचारवंत)
**प्रमुख पाहुणे : ना. देवेंद्र फडणवीस** (मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य)
**ना. उदय सामंत** (उद्योग व मराठी भाषा मंत्री)
सन्माननीय उपस्थिती : श्री. फरोख कुपर, ना.जयकुमार गोरे, आ. डॉ. विश्वजीत कदम प्रा. मिलिंद जोशी श्री. विनोद कुलकर्णी, सुनिताराजे पवार. **सूत्रसंचालन :** स्नेहल दामले
(मंडप क्र.१) **दुपारी ३.००वाजता : कविसंमेलन - १**
**अध्यक्ष : अशोक नायगावकर**
सहभाग : अरुण बोऱ्हाडे, प्रभाकर शेळके, कैलास गांधी
सूत्रसंचालन : प्रदीप कांबळे
**दुपारी ३ ते ५ : स्थळ : बाल-कुमार वाचक कट्टा**
**संवाद बाल-कुमार वाचकांशी**
सहभाग : ल. म. कडू, एकनाथ आव्हाड
(मंडप क्र. २) **दुपारी ३.०० वाजता : परिचर्चा : जागतिक प्रकाशन व्यवहारात मराठी प्रकाशन व्यवहार कुठे आहे?**
(मंडप क्र.२) **दुपारी ४.३० वाजता**
**परिसंवाद : मराठी कोश वाङ्मय आणि विस्ताराच्या दिशा**
**रात्री ८.०० : नाटक : 'शिकायला गेलो एक'**
**मूळ कथा : द. मा. मिरासदार**

**शनिवार दिनांक ३ जानेवारी २०२६**
(मंडप क्र.१) **सकाळी ९.००वाजता : कथाकथन**
सकाळी ११.००वाजता : मुलाखत :अनुराधा पाटील
**सकाळी ११ ते १ : संवाद - बाल-कुमार वाचकांशी**
सहभाग : संगीता बर्वे, राजीव तांबे
**दुपारी ३ ते ५ : गणेश घुले**
(मंडप क्र. १) **दुपारी ३.०० : ज्येष्ठ लेखक-प्रकाशक सत्कार**
**लेखक : 'उचल्या'कार लक्ष्मण गायकवाड**
प्रकाशक : बाबुराव मैंदगींकर (सुविद्या प्रकाशन, सोलापूर)
हस्ते : ना.अजितदादा पवार (उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य)
(मंडप क्र.१) दुपारी ४.००वाजता : पुस्तक चर्चा
अमोल पालेकर लिखित **'ऐवज : एक स्मृतिबंध'**
सहभाग : अमोल पालेकर, संध्या गोखले, वृंदा भार्गवे
(मंडप क्र.१) **सायंकाळी ५.३० : परिसंवाद**
**विषय : आजच्या मराठी समाजाची विचारभ्रष्टता आणि वैचारिक साहित्याची निर्मिती अध्यक्ष : विनय हर्डीकर**
(मंडप क्र. १) **रात्री ८.०० : सांस्कृतिक कार्यक्रम - हास्यजत्रा**
सहभाग : सचिन मोटे, सचिन गोस्वामी
**शनिवार दिनांक ३ जानेवारी २०२६**
(मंडप क्र. २) **सकाळी १०.०० : परिचर्चा**
**विषय : आजच्या मराठी साहित्यात भयकथा, रहस्यकथा आणि गूढकथा ह्यांचा इतका दुष्काळ का आहे?**
सहभाग : प्रवीण टोकेकर, डॉ.गणेश मतकरी, डॉ.गोविंद बुरसे, ऋषीकेश गुप्ते, डॉ.राजेंद्र राऊत.
(मंडप क्र. २) **दुपारी ४.०० : परिसंवाद : स्त्री चळवळीची ५० वर्षे मागे वळून पाहताना अध्यक्ष : डॉ.गीताली वि.म.**
सहभाग : डॉ. अंजली ढमाळ, नमिता कीर. निवेदिका :वैदेही कुलकर्णी
(मंडप क्र. २) **सायं. ६.००वाजता : परिचर्चा**
**अभिजात दर्जा नंतरची मराठी : संधी आणि आव्हाने**

**रविवार दिनांक ४ जानेवारी २०२६**
(मंडप क्र. १) **सकाळी ९.३० : पुस्तकचर्चा : अन्न हे अपूर्णब्रह्म**
(मंडप क्र. १) **दुपारी ११.३० : मुलाखत - गिरीश कुबेर**
मुलाखतकार : प्रसन्न जोशी आणि किशोर बेडकिहाळ
(मंडप क्र. १) **दु.१.०० कविसंमेलन-२** अध्यक्ष :श्रीकांत देशमुख
(मंडप क्र.२) सकाळी १०.००वाजता : परिसंवाद
**विषय : बदलत्या ग्रामीण वास्तवाचे चित्रण आजच्या मराठी साहित्यात का दिसत नाही** अध्यक्ष : भूषणकुमार उपाध्याय
(मंडप क्र. २) **दुपारी १.३० : संवाद लक्षवेधी कादंबरीकारांशी**
(मंडप क्र.१) **दु.४.३० :समारोप प्रमुख पाहुणे : रघुवीर चौधरी**
सन्माननीय उपस्थिती :ना.एकनाथ शिंदे (उपमुख्यमंत्री, पर्यटनमंत्री म.रा.)
ना. उदय सामंत (उद्योग व मराठी भाषा मंत्री)
सूत्रसंचालन : स्नेहल दामले
(मंडप क्र. १) **रात्री ९.००वाजता : महाराष्ट्रातील लोकसाहित्य व लोकसंस्कृतीचे दर्शन घडविणारा कार्यक्रम : फोक आख्यान**
निर्मिती : रणजित गुगले आणि भूषण मेहरे

## मराठी ख्रिस्ती साहित्य संघ, नाशिक आयोजित

# २७वे मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलन

दिनांक ९ ते ११ जानेवारी २०२६ रोजी कविवर्य कुसुमाग्रज साहित्य नगरी, बाळ येशू देवालय प्रांगण, नाशिक रोड ४२२ २०१ येथे संपन्न होत आहे. ह्या संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ **कवी सायमन मार्टिन** असतील.

## ठळक वैशिष्ट्ये

**शुभारंभ : शुक्रवार ९ जानेवारी २०२६**

सकाळी १०.०० ते ११.०० : ग्रंथदिंडीने संमेलनाचा शुभारंभ

**साहित्य संमेलन उद्‌घाटन सोहळा** (फादर फ्रान्सिस दिब्रिटो विचारपीठ)

दुपारी ३.०० ते ७.०० : आशीर्वाद : रे. बिशप लुर्ड्स डॅनियल (मानद बिशप, नाशिक कॅथलिक धर्मप्रांत)

संमेलनाध्यक्ष : मा. सायमन मार्टिन

स्वागताध्यक्ष : फादर एरल फर्नांडिस

उद्‌घाटक : ख्यातनाम विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे

प्रमुख उपस्थिती :

मा. उत्तम कांबळे (माजी अध्यक्ष, अ. भा. म. साहित्य संमेलन)

मा. मिलिंद जोशी (अध्यक्ष, अ.भा.मराठी साहित्य महामंडळ)

मा. लोकेश शेवडे (सल्लागार, कुसुमाग्रज प्रतिष्ठान)

मा. प्राचार्य डॉ. वेदश्री थिगळे

मा. फादर आयवो कोयलो (ज्येष्ठ बायबल तज्ज्ञ)

मा. बेनॉल्ड डायस (अध्यक्ष, बॅसीन कॅथलिक को.ऑप.बँक.लि.)

रे. फिलीप वरा, फा. ॲण्ड्र्यू रॉड्रिग्ज, डॉ. विनीत वानखेडे, पौलस वाघमारे, छगन नाईक, फादर विजय गोन्सालविस.

जीवन गौरव पुरस्कार : फादर फ्रान्सिस कोरिया, वसई; मा. सुनील आढाव, मुंबई

साहित्य भूषण पुरस्कार : मा. सनी पाटोळे, पुणे

साहित्य व्रती पुरस्कार : मा. रमण रणदिवे, पुणे

साहित्य गौरव पुरस्कार : मा. मुक्ता टिळक, नाशिक

पुस्तक प्रकाशन सोहळा : देवाशी संवाद - सायमन मार्टिन

चित्रप्रदर्शन : नुरील भोसले व सुनिल डिमेलो ह्यांच्या चित्रांचे प्रदर्शन

आभार : डॉ. विनित वानखेडे

सायंकाळी ७.०० ते ९.०० : निमंत्रितांचे कवी संमेलन

अध्यक्ष : रमण रणदिवे.

सहभागी कवी : नंदकुमार शेंडगे, अनुपमा उजगरे, मुबारक शेख, अजय कांडर, तुकाराम धांडे, वर्जेश सोलंकी, संजय चौधरी, फेलिक्स डिसोझा, प्रवीण गायकवाड, सरोज आल्हाट, जयंत देशमुख, इग्नेशियस डायस, विनोद शिंदे, नुरील भोसले

आभार : कांतीश तेलारे.

रात्री ९.०० ते १०.०० : भोजन

१०.०० ते ११.०० : सांस्कृतिक कार्यक्रम

**शनिवार १० जानेवारी २०२६**

सकाळी ८.०० ते ८.३० : सकाळची प्रार्थना : सलोमी खरे

९.१० ते १०.४० : **परिसंवाद १**

विषय : समाज विकासाची ख्रिस्ती संकल्पना

अध्यक्ष : डॉ. सुरेश पठारे स्वागत-प्रास्ताविक : ॲड. विनायक पंडित

सहभाग : नितीन सरदार, दिलीप नाईक, विश्वास वळवी

११.०० ते १२.२० : **परिसंवाद २**

विषय : ख्रिस्ती लेखकांच्या लेखनाच्या प्रेरणा

अध्यक्ष : डॉ. सिसिलिया कार्व्हालो.

सहभाग : नीलिमा बंडेलू, सनी पाटोळे, फ्रान्सिस डिमेलो, डॉ. सुभाष पाटील.

१२.३० : गॉस्पल सिंगिंग

२.०० : स्फूर्ती गीते - सादरकर्ते : जुराण लोपीस आणि सहकारी

२.३० ते ३.५० : **परिसंवाद ३**

विषय : संविधानिक मूल्यांचे ख्रिस्ती साहित्यात दर्शन

अध्यक्ष : फादर आयवो कोयलो.

सहभाग : फा.भाऊसाहेब संसारे, कामिल पारखे, फा. प्रकाश भालेराव, डॉ. सुहासिनी जाधव

४.०० ते ६.०० : निमंत्रितांशी ऐसपैस गप्पा

अध्यक्ष : मा.फा.ज्यो गायकवाड. सहभाग : डॉ.विनीत वानखेडे, नुरील भोसले, निखिलेश कांबळे, डॉ.शोभा आरोळे, रिचर्ड नुनीस

७.०० ते ९.०० : कवी संमेलन

अध्यक्ष : पौलस वाघमारे

सूत्रसंचालन : स्वरलता आंग्रे, फ्रँको डिसोझा

सहभाग : सतीश गडकरी, नरेश चव्हाण, ख्रिस्तोफर रिबेलो, एमेल आल्मेडा, फ्रान्सिस पाचलकर, लॉरेन्स गायकवाड, संतोष पागी, रमेश कांटेला, सुनंदा जिंबल, देवदत्त मालकरी, प्रदीप वाघमारे, राजेश्वरी कांबळे, आशा शिंदे, पेत्रस पान पाटील, प्रीती बनकर, कल्याणी पाठक, शार्दुल घोडेराव, अजमल खान, फ्रान्सिस बोर्जेस, लेविन भोसले, रवि त्रिभुवन, रोहिणी पंडित, शशिकल मगर, अर्जुन दारोळे, माया त्रिभुवन, मार्या देठे, ज्योती सूर्यवंशी.

१०.०० ते ११.०० : साधू सुंदरसिंग ह्यांच्या जीवनावर चित्रपट

**रविवार ११ जानेवारी २०२६**

सकाळी ८.०० ते ९.२० : बाळ येशू देवालयात मिस्साबलिदान

१०.०० ते ११.३० : सन्मान सोहळा

अध्यक्ष : रे.फादर जोएल डिकुना (संपादक, सुवार्ता)

विशेष अतिथी : उत्तम कांबळे, राजा कांदळकर, बी. जी. वाघ, जॉना व विल्यम तुस्कानो, फादर विजय गोन्सालविस

१२.३० : अध्यक्षीय समारोप.

# संपादकास पत्रे

## ख्रिस्ताचा पुनर्जन्म


'सुवार्ता' डिसेंबर अंकातील 'येशूला नव्याने जन्म घ्यावा लागेल' हा फादर जॉन फरोज ह्यांचा लेख वाचला. छान आहे. त्यात 'आज आपल्याला ख्रिस्तजन्माची नाताळची शाल पांघरण्याची गरज भासते का?' हा एक आम्हां ख्रिस्तभक्तांना धारदार प्रश्न विचारला आहे. भक्तीत मश्गूल झालेल्या ख्रिस्तभक्तांना तो कितपत अस्वस्थ करील ह्याबद्दल शंका आहे. वास्तविक आपण येशूने नव्याने जन्म घेण्याची वाट बघत बसलो असता बरेच येशूच्या नावाने जन्मून जातात, त्यांचा अव्हेर केला जातो, त्यांना ठारसुद्धा केले जाते, त्याकडे आपले लक्ष राहत नाही, ही एक शोकांतिका आहे.

सध्या आपल्या भारत देशामध्ये लोकशाहीचा लोप पावत आहे. त्याला तोंड देणारे विशेषत: निखिल वागळे, भाऊ वानखेडे, राजू परुळेकर, निरंजन टकले ह्यांसारख्या मराठी पत्रकारांची मला आठवण होते. निखिल वागळे हताश होऊन म्हणतात, ''आता स्वतंत्र मीडिया संपला. उरला फक्त प्रचार मीडिया.'' तेव्हा अशा पत्रकारांमधून व्यक्त होणारा ख्रिस्ताचा संदेश 'सुवार्ता' मधून आपण अधोरेखित करणे, हाच खरा ख्रिस्ताचा पुनर्जन्म असेल.

**- फा. मायकल जी.**

## शेतकऱ्यांची दैनावस्था

ह्या वर्षी (२०२५) अतिवृष्टी व प्रतिकूल हवामान ह्यांमुळे कृषी पिकांची व बागायतीची वाताहत झाली. शेतकऱ्यांचे श्रम व त्यांनी केलेला खत-पाणी, मजुरी व इतर खर्च वाया गेला. बऱ्याच शेतकऱ्यांनी शेतीसाठी घेतलेली कर्जे त्यांच्या डोईवर पडली. उदारनिर्वाहाची, मुलांच्या शिक्षणाची व त्यांच्या पालन-पोषणाची जबाबदारी असह्य झाली. सरकारने जाहीर केलेली मदत वेळेवर पोहचली नाही. शेतांमध्ये काटे-कुसळे भरमसाठ रुजली, शेते साफ करण्यासाठी मजुरांची गरज पडली; परंतु मजूर मिळेनासे झाले आणि मिळाले तरी त्यांनी मागितलेली मजुरी न




परवडणारी झाली. पूर्वीच्या काळात स्वत: शेतामध्ये राबलेले शरीर साथ देईनासे झालेले व हात-पायांत शक्ती न राहिल्याने काय करावे हे समजेना. ज्यांची मुले शाळेत शिकत होती, त्यांची शाळेची फी भरता न आल्याने शाळेतून घरी पाठवली जाऊ लागली. मुले-बाळे दोन वेळच्या भाकरीला वंचित झाली. सावकार व बँकेची माणसे कर्जवसुलीसाठी घरी फेऱ्या मारू लागली. गुरांना कडबा मिळेनासा झाला.

अशा विचित्र परिस्थितीमध्ये शेतकरी सापडला. काय करावे, ह्या परिस्थितीमधून बाहेर कसे पडावे, कुटुंब, मुले-बाळे कशी सांभाळावी ह्याचा घोर त्यांच्या जिवाला लागला व त्याने नाईलाजाने आत्महत्येचा निर्णय घेऊन जीवन संपविले. अशा हृदयाला चटका लावणाऱ्या घटना महाराष्ट्रभर व सर्व देशभर घडल्या व त्यामुळे शेकडो कुटुंबे उघड्यावर पडली.

**- पॅट्रिक रॉड्रिक्स,** पाली

## भरगच्च आणि दर्जेदार

भरगच्च आणि दर्जेदार विषयावरचा मजकूर असलेला 'सुवार्ता'चा नाताळ विशेषांक मिळाला. मुखपृष्ठ उत्तम झालंय.

**- अनुपमा उजगरे,** ठाणे

## वैविध्यपूर्ण नजराणा

नाताळ २०२५ चा 'सुवार्ता' अंक हा वाचकांसाठी अध्यात्म, ज्ञान आणि मनोरंजन ह्याने भरलेला एक वैविध्यपूर्ण नजराणा आहे. मुखपृष्ठ अतिशय सुंदर! अनुक्रमणिकेची कलात्मक मांडणी त्वरित रसिक मनाला आकर्षित करते. संपादकीयामध्ये, ''ख्रिस्मस हा सात प्रगल्भ प्रथा व परंपरा साजरा करण्याचा सण आहे आणि त्याद्वारे आपणांस अनंत जीवनासाठी आमंत्रण देत आहे'', हा संदेश मनाला खूप भावला. 'तारकांचे गाणे' हा डॉ. सिसिलिया कार्व्हालो ह्यांचा बालमेवा वाचताना जणू सप्तर्षींच्या तारामंडळात मी पंतगासारखी लहरत आहे असे मला वाटले. इतरही लेख-कथा वाचनीय, माहितीपूर्ण आणि सुरेख आहेत. ही साहित्यिक मेजवानी आम्हाला सादर केली त्याबद्दल आपले अभिनंदन!

**- अर्सला दीपक मच्याडो,** पाली

## सद्‌भावना

'सुवार्ता' परिवार व वितरक स्नेह मेळावा रविवार ३० नोव्हेंबर रोजी जीवन दर्शन केंद्र, गिरीज येथे संपन्न झाला. मेळाव्यास सुमारे २०० सदस्य उपस्थित होते. ह्यामुळे प्रसन्न वातावरण निर्माण झाले. वितरकांनी काम करताना येणाऱ्या अडीअडचणी व पुढे कार्य करीत राहण्याची इच्छा व्यक्त करून आपल्या भावना व्यक्त केल्या. वितरक सदस्य ह्यांनी सुवार्ता साहित्य मेळाव्यास उपस्थित राहून मेळाव्याचा आनंद द्विगुणित करावा, तसेच हे सर्व सदस्य असेच कार्य करीत राहो, ही परमेश्वराजवळ प्रार्थना!

**-नॅप डिसोजा,** गिरीज

## तलासरी मिशनला प्रसिद्धी

नाताळ २०२५ चा 'सुवार्ता' अंक मिळाला. मुखपृष्ठ पाहून मी खूप आनंदित झालो. खरोखर हा तलासरी नाताळचा अंक वाटतो. फारच सुंदर, छान अंक आहे. तलासरी मिशन शताब्दी वर्षाला चांगली प्रसिद्धी दिल्याबद्दल संपादक मंडळाचे मनापासून आभार! प्रत्येक महिन्याला आमचे लेख घेऊन आम्हांला प्रसिद्धी देऊन सुवार्ता प्रचार केल्याबद्दल संपादकांचे आभार! ऑक्टोबरचा 'मिशन रविवार'चा अंक तसे पाहिले तर आमच्या शताब्दी वर्षावरच आहे, असे मला वाटते.

**- फा. ज्यो घोन्सालविस**,ये.सं.,
तलासरी

# नवीन वर्ष आणि मानसिक स्वास्थ्य

**-फादर किरण लोपीस**
पापडी

''सुरेखा, अगं सांगशील की नाही नक्की काय झालं एवढं रडायला...?'' खूप वेळाने सुरेखा रडायची थांबली. पण हुंदके काही थांबले नाहीत. तिला खूप त्रास जाणवत होता. ''थोडं पाणी पी, बरं वाटेल. मन उघडं कर आणि सर्व काही सांग. आपण एकत्र बसून चर्चा करून निर्णय घेऊ.'' सुरेखाने हळूहळू आपले मन रिक्त केले, ''विजयला बरं नाही. कित्येक महिन्यांपासून तो एकटा एकटा राहतो. कामाला जात नाही. घरातच स्वत:ला कोंडून घेतलेय. खिडकी उघडतो व तासन्तास आशाळभूत नजरेने एकटक पाहतो. भानच हरवलंय. मी हतबल झालीय. आय.टी. क्षेत्रात उच्चपदी काम करणाऱ्या विजयला १.५लाख एवढा पगार आहे. कामाचा व्याप आहेच; पण हल्ली हेच काम जे तो आनंदाने करायचा त्याला आता खूपच त्रास होतोय. मानसिक आजाराने त्रस्त आहे. तो वैफल्यग्रस्त झालाय. काही बोलत नाही. तुला तर माहितच आहे की माझ्या माहेरून मला काहीच सहकार्य नाही. मीसुद्धा माझ्या शाळेतली नोकरी सांभाळून दोन्ही मुलांचे करता करता तारेवरची कसरत करावी लागते.''

विज्ञान... तंत्रज्ञान व त्यामधील बदललेलं रूप व कृत्रिम बुद्धिमत्तेच्या उंबरठ्यावर आपण सर्वजण उभे असताना आज विजयसारखे अनेक युवक-युवती, अनेक प्रौढ आज ह्या मन:स्थितीत आहेत. कामाचा प्रचंड बोजा... त्यामधील टारगेट आणि ह्या क्षेत्रात असलेली प्रचंड स्पर्धा आणि जागतिकीकरणाच्या मोहजालात सापडलेले आपण सर्वच जण... फक्त विजयच नाही; तर ह्या प्रवासात आपणही सहज गुंतत जातोय. अतिकामाचा भार संतुलित मानसिकतेने सोडविला नाही; तर ह्याचा प्रत्यय नकारात्मकतेकडे जाईल आणि ही स्थिती खूप चिंताजनक व खेदजनक असेल. त्यासाठी खूप काळजी घ्यावी लागेल. कारण वैफल्यग्रस्त



स्थितीतून व्यक्तीचा प्रवास मनोरुग्णात देखील होऊ शकतो. बऱ्याच वेळेला आत्महत्येचा विचारही मनात येतो.

**मानसिक स्वास्थ्य : अर्थ संकल्पना**

जागतिक आरोग्य संघटना मानसिक आरोग्याची व्याख्या अशी करते : ''मानसिक आरोग्य म्हणजे व्यक्तीच्या स्वत:च्या क्षमतेचे भान ठेवणे. जीवनातील दैनंदिन ताण-तणावांना योग्य प्रकारे तोंड देणे. फलदायी व कार्यक्षमतेने काम करण्याची क्षमता राखणे व समाजात सकारात्मक योगदान देणे ही एक सकारात्मक मानसिक स्थिती.''

**२०२६ हे नवीन वर्ष नवीन स्वप्नांना उजाळा देणारे असेल... मनाला उभारी देणारे असेल...**

वरील संकल्पनेचा अर्थ समजून घेताना व्यक्ती क्षमता, रोजच्या जीवनातील ताण-तणाव समजून घेणे. त्याचप्रमाणे आपले समायोजन करणे. फलदायी कार्यक्षमतेसाठी सकारात्मक योगदान कुटुंब, समाजाला देणे तितकेच महत्त्वपूर्ण आहे. प्रार्थना संघाबरोबर कार्य करत असताना अनेक मानसिक त्रासाला सामोरे गेलेल्या, वैफल्यग्रस्त असलेल्या लोकांना मार्गदर्शन करताना मला आता ठाम वाटायला लागले आहे की तुम्ही प्रार्थनेच्या माध्यमातून ह्या स्थितीचे सिंहावलोकन अधिक प्रभावशाली करू शकता. (संदर्भ :'प्रार्थनेत सामर्थ्य आहे' ह्या पुस्तकातून. लेखक : फा. दिब्रिटो)

त्याचप्रमाणे आपली आध्यात्मिक समतोलता, शरीर, मन व आत्मा ह्यांचे जर तादात्म्य झाले तर नक्कीच ह्या मानसिक त्रासातून आपण एक सुंदरतेचे आरोग्य जगू शकता. असा प्रयोग माझ्याकडे आलेल्या लोकांना मी सांगितला. त्यांच्यामध्ये खूप बदल झाले व ते एका वेगळ्या परिस्थितीत आपले संतुलित जीवन जगत आहेत.

**ख्रिस्तकेंद्रित जीवनशैली :** येशूचे क्रुसावरील बलिदान मानवाच्या तारणाची फलदायी अशी पूर्ण स्थिती क्रुसावरील वेदनेतला ख्रिस्त खरे तर आपल्या सगळ्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. कारण जीवनातील आनंदापेक्षा दु:खदायक, क्लेशदायक व वेदनादायक क्षण खूपच असतात. शरीराची जखम औषधांनी भरते मात्र मनाची स्थिती जर स्व-प्रयत्नांनी न झाली तर जीवन निष्फळ आणि निरंजक बनते. आपले जीवन ख्रिस्तकेंद्रित करण्यासाठी - १) एक तास प्रभूला द्या म्हणजे आपले जीवन बदलेल व रोजची चॅपलमध्ये भेट दिल्याने आपले भाग्य उजळेल.

**येशू मंत्र :** श्वासाबरोबर येशूचे नाव घ्या, डोळे बंद करा व उच्छ्वासाबरोबर परत येशूनामाचा जप करा.

२) ख्रिस्तकेंद्रित शरणागती स्वीकारली की आपल्यातील 'मीपणा' गळून पडतो व आपणांस सुखद वाटू लागते. त्यासाठी शरणागती महत्त्वाची आहे. नम्रता आली की परिस्थिती स्वीकारण्यास विशेष मदत होते.

FLORENCE
TOURS & TRAVELS

# FLORENCE TOURS & TRAVEL



| | | | |
|---|---|---|---|
| CHINA & HOG KONG | 8N / 9D<br>10th Mar 2026 | 1,87,000/-<br>Per Person | 1,84,000/-<br>Special Price |
| JAPAN | 10N / 11D<br>22nd Mar 2026 | 3,05,000/-<br>Per Person | 3,00,000/-<br>Special Price |
| MEGHALAYA | 6N / 7D | Apr 2026 | 35,000/-*<br>Per Person |
| SRI LANKA | 5N / 6D<br>2nd May 2026 | 68,000/-<br>Per Person | 65,000/-<br>Special Price |
| VIETNAM | 7N / 8D<br>3rd May 2026 | 1,18,000/-<br>Per Person | 1,15,000/-<br>Special Price |
| SINGAPORE, MALAYSIA & THAILAND | 10N / 11D<br>3rd May 2026 | 1,35,000/-<br>Per Person | 1,32,000/-<br>Special Price |
| THAILAND | 5N / 6D<br>8th May 2026 | 68,000/-<br>Per Person | 65,000/-<br>Special Price |
| EUROPE* | 15N / 16D<br>10th May 2026 | 3,20,000/-<br>Per Person | 3,15,000/-<br>Special Price |
| KASHMIR | 6N / 7D | 20th May 2026<br>27th May 2026 | 35,000/-*<br>Per Person |
| LEH LADAKH | 6N / 7D | June 2026 | 35,000/-*<br>Per Person |

**SPECIAL DISCOUNTS ON ALL**
**HONEYMOON AND CUSTOMISED PACKAGES**

*Europe visa process will start from month of December & January

* Meghlay, Kashmir, Leh Ladhak including only land package

BOOK NOW

**INCLUSIONS**

✓ Pickup Drop ✓ Flight ✓ Visa
✓ Hotels ✓ Sightseeing ✓ All Meals.

Brian Dabre 7710027271 | Wilfred Pereira 9922638520

३) कामाच्या ठिकाणचे नियोजन मनात झाल्यानंतर साक्रामेंतासमोर बसून येशूला सर्वकाही सांगा. कामाचा निर्णय चुकणार नाही. टारगेट सेट करता येईल. कारण येशू तुम्हांसोबत आहे. स्तोत्र ४२:११मध्ये म्हटले आहे, ''माझ्या आत्म्या, तू खिन्न का आहेस? तू निराश का आहेस?'' ह्या वचनात दावीद आपली उदासिनता, भय, एकाकीपणा, शरणागती देवापुढे ठेवतो. कारण त्याला ठाऊक आहे की माझ्या जीवनातील उदासिनता, भय, एकाकीपणा देवाला शरण गेल्याशिवाय सार्थकी लागणार नाही आणि दावीदच्या जीवन अनुभवातून आपण शिकतो की खरोखर परमेश्वर त्याला मार्गदर्शन व मदत करतो. आपल्या जीवनाची उदासिनता भगवंताच्या चरणाशी समर्पित करणे महत्वाचे.

४) नववर्ष २०२६ कसे असणार? हा झाला नकारात्मक विचार. त्यापेक्षा २०२६ हे वर्ष नवीन स्वप्नांना उजाळा देणारे असेल, त्यातील प्रत्येक संकल्प मनाला उभारी देणारे असेल हा झाला सकारात्मक विचार. विज्ञानाने व तंत्रज्ञानाने कितीही प्रगती करो, कितीही कृत्रिम क्षमतेची मक्तेदारी वाढो, मी माझे मानसिक संतुलन राखणार. कारण संत पौलाचे वचन मला ह्या नवीन वर्षात सजग ठेवणार आहे. 'जगतो जीवन नवे मी माझे, ख्रिस्त जगत असे मम जीवनी.' संकल्पच ख्रिस्तकेंद्रित जीवनशैलीत झाल्यावर संघर्षमय स्थिती हाताळण्यास देवदूत आपल्या बरोबर असणार. आपले ख्रिस्तमय जगणे ह्या वैफल्यग्रस्त परिस्थितीतून मार्ग काढण्यास साहाय्य करणार.

५) नवीन वर्षातील उदासिनता, भय, नैराश्य, ताणतणाव, एकाकीपणा आल्यास नकारात्मक भूमिकेतून न जाता बायबलमधील हे सर्व संदर्भ आपणांस उपयोगी ठरू शकतील. मात्र वाचनाबरोबर चिंतन व चिंतनाबरोबर कृती असणे आवश्यक आहे. सदैव ख्रिस्तासाठी, ख्रिस्ताबरोबर व ख्रिस्ताठायी नवजीवनाचा कल्पतरू आपल्या जीवनी लावू या व हे जीवन अधिक समृद्ध बनवू या. देवशब्दाला आपल्या जीवनात आणू या.

**उदासीनता नैराश्य :** स्तोत्र ३४:१८, ६१:२,५६:८,७३:२६; यशया ४१:१०; योहान ४१:१०, १४:२७;
मत्तय ११:२८; विलापगीत ३:२२-२३; १ पेत्र ५:७

**भय :** स्तोत्रसंहिता ४६:१, २३:४, ५६:३, २७:१; मत्तय ८:२६;
२ तिमथ्य १:७

**चिंताग्रस्त :** स्तोत्र २३:४, ७३:२६; १ पेत्र ५:७; यशया ४१:१०;
रोमकरांस पत्र ८:३८-३९

**ताणतणाव :** स्तोत्र ३४:१८;
१पेत्र ५:७; फिलीप्पैकरांस ४:६-७; नीतिसुत्रे ३:५-६

**एकाकीपणा :** स्तोत्र ४६:१;
यशया ४३:२, ४९:१५-१६;२३:१; योहान १५:१५; मत्तय २७:४६; फिलीप्पैकरांस ४:६-७;नीतिसुत्रे ३:५-६; इब्री लोकांस पत्र १०:२४-२५. ●


## + Praise the Lord +

**पवित्र आठवड्यातील रिट्रीट-उपवासकाळ**

**१. केरळ - पोट्टा रिट्रीट :** दिनांक २५ मार्च ते ४ एप्रिल २०२६ (११ दिवस). स्लिपर तिकीट, एकूण खर्च प्रत्येकी ८,०००/-मात्र. ए. सी. तिकीट, एकूण खर्च रु. १०,०००/- मात्र. अडीच दिवस साईडसीन, निवासस्थान ते कुर्ला टर्मिनल येथे जाण्या-येण्यासाठी बसने प्रवास + डिव्हाईन रूम + डिव्हाईन जेवण+ अडीच दिवस फिरणे + चार नॉनव्हेज + फिरताना १ व्हेज जेवण. एकूण पाच जेवणं आम्ही देतो. मुन्नार१दिवस, कोचीन १ दिवस, अर्धा दिवस जेरूसलेम प्रार्थना सेंटर, संत सिस्टर एफ्रोसिया चर्च व म्युझियम, होली लॅण्ड (संत मेरी चर्च) वगैरे. ॲडव्हान्स रुपये ५०००/-भरून आपली नावे कृपया १० जानेवारी २०२६ पर्यंत नोंदवावीत.

**२. काश्मिर सहल : अमृतसर, वाघा बॉर्डर, पहेलगाम, गुलमर्ग, सोनमर्ग, श्रीनगर :** दिनांक ०४ मे ते १५ मे २०२६. एकूण १२ दिवस. खर्च प्रत्येकी रु. ४०,०००/-मात्र. ५ ते ११ वर्षे मुलांस रु. ३५,०००/-. जाताना पश्चिम एक्सप्रेस एसी. व घरी येताना राजधानी ए.सी.प्रवास. ॲडव्हान्स रु. १०,०००/- भरून आपली नावे नोंदवावीत. शेवटची तारीख १० फेब्रुवारी २०२६.

**३. नाशिक बाळ येशू दर्शन सहल :** दिनांक १४ फेब्रुवारी २०२६, एक दिवस एकूण खर्च रु. १८००/-. दिनांक १४ व १५फेब्रु.२०२६ दोन दिवस एकूण खर्च रु. ४८००/- ए.सी.बस, ए.सी. हॉटेल, व्हेज, नॉनव्हेज, उत्तम जेवण, नाश्ता वगैरे.

**४. केरळ-पोट्टा रिट्रीट :** दिनांक ०७ मे ते १८ मे २०२६ (१२ दिवस). ए. सी. प्रवास, एकूण खर्च रु. १०,०००/-व स्लीपर प्रवास एकूण खर्च रु. ८,०००/-. अडीच दिवस फिरणे व सहा दिवस रिट्रीट.

**५. केरळ-पोट्टा रिट्रीट :** हिंदी कन्व्हेंशन (ओझस) दिनांक २८ मे ते ०८ जून २०२६ (१२ दिवस). ए. सी. प्रवास, एकूण खर्च रु. १०,०००/-व स्लीपर प्रवास एकूण खर्च रु. ८,०००/-. अडीच दिवस फिरणे व सहा दिवस रिट्रीट.

**-: कृपया अधिक माहितीसाठी खालील नंबर्सवर संपर्क करा :-**

१) ग्लोरिया (बेबी) डिकोस्टा, गास, कांदोक १ : ९९६०२७३३१३ / ९०९६३६०८३४
२) शालिनी निग्रेल, निर्मळ, वाघोर्ली : ९९२३२५९५२८ ३) फ्लेवियन डाबरे, भुईगाव : ९८२३१६५१७८
४) सुस्मिता परेरा, नानभाट, अटोळी : ९६८९७८१५७५ ४) थॉमस कोलासो, चुळणे : ८६००१७८३६६

# एक्स्ट्रीम हॉलिडेज (तुस्कानो टूर्स)

**१) काश्मीर, गुलमर्ग, सोनमर्ग व पहेलगाम श्रीनगर :** दि. १४ ते २० एप्रिल २०२६ (ट्युलिप गार्डन स्पेशल). दिनांक ६ मे १२ मे २०२६ व २४ मे ते ३० मे २०२६. खर्च प्रत्येकी रु. ३३,०००/-. (ट्रेन अथवा विमान प्रवास खर्च अतिरिक्त).

**२) सिमला-कुलू-मनाली, चंदिगड, अमृतसर सहल :** दिनांक २ ते १२ मे २०२६. एकूण खर्च प्रत्येकी रु. ४२,५००/-. (रेल्वे तिकीटसहीत. राजधानी थ्री टायर ए.सी.)

**३) कोलकत्ता, दार्जिलिंग, गँगटोक, पेलिंग, सहल :** दिनांक १२ मे २३ मे. एकूण खर्च रु. ४१,०००/- (रेल्वे किंवा विमान प्रवास खर्च अतिरिक्त.)

**४) बँगलोर, म्हैसूर, उटी, कुर्ग, वायनाड सहल :** दिनांक १४मे ते २४ मे २०२६. एकूण खर्च प्रत्येकी रु. ३६,५००/- मात्र. (रेल्वे प्रवाससहित थ्री टायर ए.सी.)

**५) भूतान सहल :** दिनांक २२मे ते २९ मे २०२६. एकूण खर्च रु. ८६,०००/- (विमान प्रवाससहित).

**६) गुवाहाटी, शिलाँग, काझीरंगा, चेरापूंजी सहल :** दिनांक २० ते २७ एप्रिल २०२६. एकूण खर्च रु. ४६,०००/- + (विमान अथवा ट्रेन प्रवास.)

* मागील १५ वर्षांपासून यशस्वीरित्या टूर्स आयोजित करणारे वसईतील एक विश्वासपात्र नाव.

**-: अधिक माहितीसाठी संपर्क :-**

**न्यूमन तुस्कानो, नंदाखाल**

**9222337051, 8007621516**

# वेलंकनी माता टुर्स अँड ट्रॅव्हल्स

**आयोजक : टोनी डायस,** ओळंबवाडी–पापडी

**8485890360 / 9320385977 / 9766398405**
**9011890360 / 8459263384 / 8766589780 / 9960107733**

**चला चला वेलंकनी मातेच्या नोव्हेनाला चला...**

## शालेय विद्यार्थी–शिक्षकांसाठी मे महिन्यातील नोव्हेना : ८ ते १३ मे २०२६

*आपल्यासोबत धर्मगुरू असतील आणि संपूर्ण कुटुंबाच्या आरोग्यासाठी प्रार्थना केली जाईल.*
*कृपया ही संधी वाया घालवू नका. आपल्या कुटुंबासह जरुर या.*

**मुंबईहून जाण्याची तारीख ६ मे व परत येण्याची तारीख १५ मे**

रेल्वे प्रवास : जाताना वसई ते चेन्नई, चेन्नई ते नागापट्टणम्
येताना नागापट्टणम् ते चेन्नई एगमोर, चेन्नई एगमोर ते दादर. दादर ते वसई बसने

**रू. २७,०००/– विमानप्रवास + ए.सी. रूम + जेवण**
**रू. १९,०००/– ए.सी. रूम, ए.सी. रेल्वे प्रवास + जेवण**
**रू. १४,५००/– नॉन.ए.सी. रूम, नॉन.ए.सी. रेल्वे प्रवास + जेवण**
**रू. १३,०००/– ए.सी. रूम + जेवण** *(रूममध्ये चार जण शेअरिंग)*

पुंडीमाता चर्च दर्शन, तंजावर

## बाळ येशू नाशिक सहल (१४ ते १५ फेब्रुवारी २०२६)

खर्च रू. ५,०००/– AC बस प्रवास + हॉटेल नाशिक इन (देवळापासून १ किमी अंतरावर) + साईटसीन– पंचवटी मार्केट, सुला वाईन, सोमा वाईन, फ्लॉवर गार्डन (चौघांसाठी एक रूम)
बसमार्ग : आगाशी, शिर्लयवाडी, नाळे, निर्मळ, गिरीज, देवतलाव, रमेदी, तामतलाव, पापडी, माणिकपूर, गोखिवरे मार्गे नाशिक.
एक दिवसाची सहल : खर्च रु. १८०० (दि. १४ फेब्रुवारी २०२६) जेवण, नाश्ता, एसी बसप्रवास

## केरळ पोट्टा रिट्रीट

*तू विश्वास ठेवशील तर देवाचे गौरव पाहशील. – योहान ११:४०*

मन:शांती, आरोग्य, मुक्ती, चिंतन व आध्यात्मिक वाढीसाठी एक वेळ अवश्य ह्या प्रार्थनेचा (रिट्रीट) अनुभव घेऊन पहा. शिवाय तीन दिवस केरळ सौंदर्य दर्शन, मुन्नार (चहाचे मळे), संत जॉर्ज चर्च (४० करोडचे चर्च), होली लँड (चालाकुडी), रोझरी व्हिलेज, अवर लेडी ऑफ वल्लर पदम तीर्थक्षेत्र, कोचीन येथे बोटींग व शॉपिंग.

रिट्रीटच्या तारखा : १) २५ फेब्रुवारी २०२६ ते ७ मार्च २०२६, २) ११ मार्च ते २१ मार्च २०२६
३) पवित्र आठवडा : २५ मार्च २०२६ ते ४ एप्रिल २०२६, ४) २२ एप्रिल ते २ मे २०२६

नांवनोंदणीची शेवटची तारीख : ७० दिवस अगोदर — एसी : रु. १०,०००/–
प्रवासातील जेवणाचा खर्च ज्याचा त्याने करायचा आहे. — नॉन एसी : रु. ७,०००/–

मार्गदर्शक : आल्फ्रेड मुर्झेलो (आगाशी) ९८२२४७४१८९

## श्रीलंका सहल (७ ते १३ मे २०२६)

कँडी, नुवारा एलिया, एल्ला, गॅले, कोलंबो सर्व साईटसीन. मुंबई–कोलंबो–मुंबई विमानप्रवास अतिरिक्त
**एकूण खर्च– रु. ४२,००० (+ एअरफेअर)** वसई ते मुंबई एअरपोर्ट व रिटर्न
डिलक्स ३ स्टार हॉटेल्स, सर्व साईटसीन+प्रवेश शुल्क समाविष्ट (श्रीलंकन घरगुती जेवण, गाईड, गेट–टुगेदरसह)

## अमृतसर–श्रीनगर (काश्मीर) सहल (१९ ते २८ एप्रिल; १६ ते २७ मे २०२६)

अमृतसर, वाघा बॉर्डर, श्रीनगर, पेहलगाम, गुलमर्ग, सोनमर्ग
२ रात्र अमृतसर, २ रात्र पेहलगाम, ४ रात्र श्रीनगर
जाताना प. एक्सप्रेस एसी व येताना राजधानी एक्सप्रेस
एकूण खर्च– रु. ४०,०००/– डिलक्स हॉटेल्स, गंडोलाची फर्स्ट राईड + सर्व साईटसीन समाविष्ट
रु. ३५,०००/– (वय ४ ते ११) (घरगुती जेवण, गाईड, गेट–टुगेदरसह) (साईटसीनसाठी एसी बस)

## हाय–फाय काश्मीर श्रीनगर, पहेलगाम, गुलमर्ग, सोनमर्ग (१९ ते २५ मे २०२६)

एकूण खर्च– रु. २८,०००/– + विमानप्रवास, डिलक्स हॉटेल्स, मुंबई–श्रीनगर–मुंबई फ्लाईट
सर्व साईटसीन (घरगुती जेवण, गाईड, गेट–टुगेदरसह) (साईटसीनसाठी एसी बस)

## धम्माल मालवण–गोवा सहल (३० मे ते ३ जून २०२६)

**एकूण खर्च– रु. १९,०००/–, मुलांसाठी रु. १६,०००/–**
**पाच दिवस– वसई ते मालवण–गोवा ए.सी. डिलक्स बस, ए.सी. डिलक्स हॉटेल**
२ दिवस मालवण– त्सुनामी आयलँड, स्कूबा डायविंग, बोटिंग, वॉटर स्पोर्टस्, सिंधुदुर्ग किल्ला, सावंतवाडी मार्केट, ३ दिवस गोवा– संपूर्ण साईटसीन– सर्व बीचेस्, बॉन जिझस चर्च, मिरॅकल क्रॉस, शॉपिंग

## नैनिताल, कैंची धाम, मसूरी, जिम कॉर्बेट, हरिद्वार सहल (जानेवारी ते मार्च २०२६)

**सहा दिवस: एकूण खर्च– रु. ३७,०००/–, मुलांसाठी रु. ३५,०००/–**
मुंबई–दिल्ली–मुंबई विमानप्रवास, दिल्ली ते नैनिताल व परत एसी डिलक्स बस/कार
वास्तव्य : डिलक्स हॉटेल (दोघांसाठी एक रुम), ब्रेकफास्ट, डिनर. सर्व साईटसीईंग समाविष्ट
फा. अशोक अलेक्झांडर यांच्या प्रार्थना केंद्रात तीन दिवस रिट्रिट तुमच्या सोईनुसार आयोजित केली जाईल.

# मागी लोक कोण?

-**फादर विल्सन रिबेलो**
पाली



येशूच्या जीवनात त्याला भेटायला आलेल्या अनेक लोकांपैकी 'मागी लोक' गाठीभेटी घेण्यात प्रथम होते. ते पूर्वेकडून आल्याचे शुभवर्तमानकार मॅथ्यू लिहितो. त्यांच्याविषयी संदिग्ध माहिती अशी आहे की ते लोक अर्वाचीन पर्शियातील उत्तम सुशिक्षित आणि अपूर्व सामर्थ्य असलेले गृहस्थ होता. त्यांच्यापैकी कोणी स्वप्ने व काल्पनिक गोष्टींचा अर्थ लावण्यात हुषार होता, कोणी खगोलशास्रात व सुज्ञ गोष्टीत पारंगत होता. कोणी ज्योतिषी शास्रात निष्णात होता. त्याच्या समाजात ते उच्चभ्रू व श्रीमंत असून राजदरबारात सल्लागार म्हणून त्यांचा मोठा दबदबा होता. ग्रहताऱ्यांचे सूक्ष्म निरीक्षण आणि अवलोकनाद्वारे ते आपले अनुमान काढीत. त्यांनीच पॅलेस्टाईन देशात दाविदच्या राजकुळात महत्त्वपूर्ण व्यक्तीचा जन्म झाल्याचा निष्कर्ष काढला आणि त्याच्या भेटीसाठी थाटामाटाने भेटवस्तू घेऊन जाणे त्यांना अगत्याचे वाटले.

येशूचा जन्म यहुदी कुटुंबात झाला म्हणून परराष्ट्रीयांना ही बातमी प्रथम देण्यात आली. परमेश्वराने पूर्वेकडून ताऱ्याद्वारे मागी लोकांना बाळ येशूचा शोध घेण्याची प्रेरणा दिली. ते पूर्व दिशेस दिसलेला तारा पाहून प्रवासाला निघाले. शोध घेत घेत ते जेरुसलेममधील हेरोद राज्याच्या दरबारी आले आणि चौकशी करू लागले की ''यहुद्यांचा राजा जन्मास आला तो कोठे आहे?'' हे ऐकताच हेरोद व सर्व जेरुसलेम घाबरून गेले. येथे दोन मानवी प्रवृत्ती दृष्टीस पडतात. मागी लोक स्वत:हून खडतर प्रवासाला निघतात आणि मौल्यवान दाने अर्पण करण्यासाठी बरोबर घेतात. ताऱ्याच्या दिशेने मार्गक्रमण करून बाळ येशूच्या चरणी नतमस्तक होतात. हेरोद सर्व माहिती मिळवून नव्या राजाच्या आगमनाने चवताळला होता. मागी लोकांनी फसविले हे पाहून तो संतापला आणि द्वेषभावनेने दोन वर्षांच्या व त्याहून कमी वयाच्या बालकांची हत्या केली.

पूर्वेकडील अपूर्व ताऱ्याद्वारे त्यांची जिज्ञासा चाळवली आणि महत्त्वाच्या व्यक्तीची चाहूल लागली. त्यांनी घरदार सोडले व यहुद्यांचा राजा जन्माला आला आहे तो कोठे आहे? ह्याची चौकशी करून तो सापडल्यावर पाया पडून आपल्या द्रव्यांच्या थैल्या सोडून 'सोने, ऊद व गंधरस' ही दाने अर्पिली. त्यांच्या ज्ञानाच्या प्रकाशाने ह्या यहुद्यांच्या राजाला उच्चध्येय व उद्दिष्ट गाठण्यासाठी ही दाने महत्त्वाची आहेत ह्याचे आकलन झाले. मागी लोकांनी आणलेल्या भेटीला जुन्या करारातील (यशया ६०:६) पुस्तकाचा संदर्भ आहे. यशया भविष्यवाद्याने येशूविषयी बरेच काही लिहिले आहे. मागी लोकांनी आणलेल्या भेटीला प्रतीकात्मक महत्त्व आहे. सोने अतिउच्च व किमतीवान, प्रकाशमय व जगातील खाणीत सापडणारा उत्कृष्ट व देदीप्यमान धातू. ऊद (इन्सेन्स) ईश्वरावरील भक्तीशिवाय कसलाही उपयोग नाही. म्हणूनच अती सुवासिक, बलिदानातील धुपारतीत वापर होणारे. गंध हे मृत व्यक्तीला त्याकाळी लावले जायचे. ही भेट येशूसाठी उचित, अती मौल्यवान व श्रेष्ठ भक्ती दर्शविणारी होती.

**मागी लोकांनी आणलेल्या भेटीला जुन्या करारातील पुस्तकाचा संदर्भ आहे.**

फक्त तारा पाहून मागी लोकांनी आंतरिक शहाणपण आणि नैसर्गिक सखोल ज्ञानाच्या देणगीद्वारे खडतर, खर्चिक व लांबच्या प्रवासाला सुरुवात केली. यहुद्यांच्या राजाच्या शोधात पारदर्शकता, सच्चाई व अभिलाषा होती. त्याच उत्सुकतेने त्यांनी तारा न दिसल्याने शोध घेण्यास प्रारंभ केला. ह्या अनोळखी जगात पुढे जाण्यासाठी प्रेरणा, आंतरिक दृष्टी, पायरी ओळखून मार्ग बदलण्याची कुवत प्राप्त होताच पूर्व दिशेचा तारा पुन्हा दिसला व बाळ राजाचे दर्शन घडले. भेटी देऊन, नमन करून ते दुसऱ्या मार्गाने जीवनाच्या साक्षात्काराने व तृप्त मनाने आपल्या गावी निघून गेले. एखादाच क्षण आणू शकतो माणसाच्या आयुष्यात परिवर्तन; त्यासाठी आपल्या मनात उमलू द्यायला हवी नवी मंगल पहाट! •

# जॉली टूर्स

## मे महिन्यातील सहली

१) **बाळ येशू नाशिक सहल :** दि. १४ व १५ फेब्रुवारी २०२६. डिलक्स लक्झरी ए.सी. बस, डिलक्स ए.सी. हॉटेल, व्हेज-नॉन व्हेज घरगुती जेवण, गेट टुगेदर पार्टी, पंचवटी, सोला वाईन केंद्र. प्रत्येकी रु. ५,०००/-, मुले रु. ४,०००/- (५ ते १२ वर्षे).

२) **दुबई विथ अबूधाबी सहल :** दिनांक ०४ मे ते ०८ मे २०२६. डेझर्ट सफारी, डाव क्रूझ, अल बुर्झ खलिफा १२४ मजला, मिरॅकल गार्डन, गोल्ड सूक, डॉल्फिन शो, दुबई सिटी टूर, ग्लोबल व्हिलेज, दुबई सिटी टूर अबुधाबी सिटी टूर व इतर खूप काही. खर्च रु. ८३,०००/-.

३) **श्रीलंका-कोलंबी, कँडी, नुवारा एलिया, बेंटोटा, गॅले सहल :** दिनांक १० मे ते १५मे २०२६. कँडी लेक, बोटॅनिकल गार्डन, दंत मंदिर, रम्बोडा वॉटर फॉल, टी गार्डन, ग्रेगरी लेक, बेंटोटा बीच, टर्टल म्युझियम, डच फोर्ट, गॉल फेस ग्रीन, इंडिपेंडन्स स्क्वेअर, लोटस टॉवर व इतर बरेच काही. खर्च रु. ६५,०००/-.

४) **भूतान, पुलसिलिंग-थिंपू, पुणेखा-पारो सहल :** दिनांक १६ मे ते २४ मे २०२६. ताशियो झाँग, चांगाखा मॉनेस्ट्री, नॅशनल मेमोरियल, हेरिटेज म्युझियम, बोटॅनिकल गार्डन, बौद्ध डोडेमा, पुणेखा सस्पेशियन ब्रीज, चेलेला पास व इतर बरेच काही. खर्च रु. ४०,०००/- + तिकीट.

५) **काश्मीर श्रीनगर, गुलमर्ग, सोनमर्ग व पहेलगाम सहल :** दि. ६ मे ते १४ मे २६. खर्च रु. ३१,०००/- + तिकीट.

६) **नैनिताल-मसुरी-डेहराडून-मुक्तेश्वर-जिम कार्बेट (जंगल सफारी सहल) :** मुंबई-दिल्ली-मुंबई राजधानी एक्सप्रेस प्रवास. दिनांक १६ मे ते २४ मे २०२६. खर्च रु. ३०,०००/- + तिकीट.

**-: संपर्क :-**

१) श्री. डॉमणिक :८०८७०३६६१५
२) श्री. लुईस :९८२३८४४८८३
३) श्री. पिटर :९९६७८३६१६६
४) श्री. जॉन लोपीस, माणिकपूर :७७०९७८२३२४
(रोशनी)

# O2 HOLIDAY S

CONTACT NO. 9867681493- 9503569393
EMAIL : 02holidays1403@gmail.com

## आगामी सहल कार्यक्रम

१) **नाशिक : बाळ येशू दर्शन सहल -** दि. १४ ते १५फेब्रु. '२६. बाळ येशू सणाची पवित्र मिस्सा, ए.सी.बस, ए.सी. हॉटेल, गेट टुगेदर पार्टी, वाईन यार्ड. खर्च रु. ५,०००/- मुले ४,५००/-

२) **व्हिएतनाम -** दि. ५ मे ते १३ मे २०२६. ७ रात्र व ८ दिवस. हनोई, दानांग, हो ची मिन, हॅलोग बे क्रुझ, जेवण व स्थळदर्शन. ४ वेळा विमानप्रवास. सर्व समावेशक खर्च रु. १,१५,०००/-

३) **बँकॉक पट्टाया, थायलंड सहल -** दि. १६ मे ते २१ मे २०२६. ४ रात्र व ५ दिवस, विमान प्रवास, ४ स्टार हॉटेल, जेवण, स्थळदर्शन. सर्व समावेशक खर्च रु. ६५,०००/-.

४) **काश्मीर, अमृतसर सहल :** दि. ४ मे ते १५ मे २०२६. श्रीनगर, सोनमर्ग, गुलमर्ग, पहेलगाम. प्रवास ए.सी. रेल्वे, दिल्ली-मुंबई राजधानी एक्सप्रेस, वाघा बॉर्डर, गोल्डन टेम्पल, जालियनवाला बाग, काश्मीर मधील प्रेक्षणीय बागा, शिकारा राईड, दोन रात्र पहेलगाममध्ये, स्ट्रीट शॉपिंग, व्हेज नॉनव्हेज घरगुती जेवण, गेट-टुगेदर पार्टी. सहल खर्च प्रौढ रु.४२,०००/ मुलांस रु. ३७,०००/-.

५) **सिमला-कुलू-मनाली-चंदीगड-रोहतांग सहल :** दि. १८ मे ते २७ मे. मुंबई-दिल्ली-राजधानी प्रवास. ए.सी. बस, रूचकर जेवण, सर्व प्रेक्षणीय स्थळदर्शन, खर्च रु. ४२,०००/ व मुले रु. ३७,०००/-.

६) **दुबई दर्शन :** दि. १० मे ते १४ मे २०२६. सिटी टुर, आकर्षक स्थळ दर्शन, वाळंटातील थरार, दुबई मॉल, बुर्ज खलिफा व खरेदी. सहल खर्च रु. ८५,०००/-.

७) **श्रीलंका -** दि. ३ मे ते ८ मे २०२६. मुंबई ते कोलंबो विमान प्रवास. नैसर्गिक सौदर्य दर्शन, बौद्ध मंदिर, हत्ती म्युझियम, किल्ला, स्पाईस गार्डन व खरेदी. सर्व समावेशक एकूण खर्च प्रत्येकी रु. ६५,०००/-.

८) **महाबळेश्वर, पाचंगणी सहल :** दि. २५ मे ते २८ मे. २०२६ थंड हवेचे ठिकाण, मॉल रोड, मॅपरो व मालास, पाचगणी टेबल पॉईट व खरेदी. सर्व समावेशक एकूण खर्च रु. १२,५००/- (चार जणांस एक रूम).

*** सुसह्य प्रवास व निश्चित ट्रेन बुकींगसाठी दोन महिने आधी बुकींग करावी.**

*** देश व विदेशात स्वंतत्र ग्रुप टुर, चर्च, शाळा, महिला व ज्येष्ठ नागरिक संघटना आणि हनिमून पॅकेजसाठी संपर्क करा.**

**-: संपर्क :-**

मिल्टन डिकोस्टा : C/o 9867681493
विन्सेंट रॉड्रिग्ज : 9503569393
सोन्या गासकर : C/o 9004754696

# बीजरूप पाप : 'राग' व चौथा राजा, हेरोद

**अनिल एल. गोन्सालवीस**
रमेदी

सकाळचे ऊन तुकतुकू लागले, तसा यहुदियातील हेरोदीयम वाडा सूर्य-किरणांनी झळाळू लागला. अचानक दरकदारने हेरोदसमोर मुजरा करीत राजदालनातून प्रवेश केला. ''महाराज, आपल्या राजवाड्यात पूर्व देशाचे तीन ज्ञानी राजे आले आहेत. आपणांबरोबर ताऱ्यांविषयी वार्तालाप करण्याची त्यांची इच्छा आहे.'' तीन ज्ञानी राजांना हेरोदने राजदालनात बोलावले. ''बोला, आपण कुठल्या ताऱ्याविषयी बोलत आहात?'' जवळच्या देशातून आलेले वयस्कर 'बाल्थाझार' राजाने बोलण्यास सुरुवात केली, ''महाराज, यहुद्यांचा राजा जन्मास आला आहे तो कोठे आहे? कारण आम्ही पूर्व दिशेस त्याचा तारा पाहून त्याला नमन करावयास आलो आहोत'' (मत्तय २:२-३).

हेरोद राजाने हे ऐकले तेव्हा तो व सर्व येरुशलेम घाबरून गेले. त्याच्या क्रोधाचा पारा चढला. वाड्यातील सरदार, हुजरे, दरकदार, सिनेगॉगचे मुख्य रब्बी ह्या सर्वांना बोलावून विचारणा सुरू झाली, ''बालक येशू ह्याचा जन्म कोठे व्हावयाचा आहे? जा...शोध घ्या.'' सैरभैर झालेला चौथा राजा हेरोद ह्याने पुन्हा तिन्ही ज्ञानी राजे गास्पर, मेल्किओर व बाल्थाझार ह्यांना घेऊन चर्चा सुरू केली, ''तुम्ही बेथलेहेमात अवश्य जा. त्या बालका विषयी बारकाईने विचारपूस करा व तुम्हाला शोध लागल्यावर मला कळवा म्हणजे, मी देखील येऊन त्यास नमन करीन''(मत्तय२:८). हेरोदच्या वाड्यात अशांती पसरली. मी यहुदियाचा तारणहार असताना अजून बालक येशू राजा म्हणून कसा जन्म घेऊ शकतो? हेरोदच्या डोक्यात फक्त तर्कवितर्क, संशयकल्लोळ चालला होता.

तिन्ही ज्ञानी राजे हेरोदच्या महालातून निघाले. सूर्य मावळतीला गेलेला. टपोर चांदणे पडले होते, दाणा-पाणी घेऊन



उंटाचे कासरे सोडून त्यांनी आपले उंट वाळूत हाकारले. ज्ञानी राजांनी ताऱ्याच्या दिशेने वाळवंटातून कूच करत बेथलेहेमास मार्गक्रमण केले. तो तारा स्तब्ध झाला. थकलेल्या उंटांनी नाका-तोंडातून मोठा सुस्कारा सोडला. आई मरियेसह गादीवर निजलेले बालक पाहून तिन्ही ज्ञानी राजांना आनंद झाला. आपल्या सोबत आणलेले गास्परने (सोने), मेल्किओरने (ऊद) आणि बाल्थाझारने (गंधरस) ही दाने अनुक्रमे नमन करून बाळ येशूच्या चरणी अर्पण केली.

**बायबलमधील हेरोद राजा ह्यांची बालकासंबंधीची अघोरी कृती आणि आजच्या पालकांची मनोवृत्ती ह्यात काय फरक आहे?**

दोन दिवस झाले तरी त्या ज्ञानी राजांचा थांगपत्ता नाही. हेरोद राजवाड्याच्या दर्शनी मंडपात फेऱ्या मारीत होता. अचानक दरकदारने बातमी आणली. ''महाराज, तीन ज्ञानी लोकांनी आपणाला फसविले.'' राजा हेरोद संतापला. आता शांत बसणे नाही. इथे राजे दुसऱ्या मार्गाने आपल्या देशात निघून गेले. स्वप्नात संदेश मिळाल्याप्रमाणे योसेफ, मरिया व बालक येशू ह्यांच्यासह मिसर देशास निघून गेले. शिपायांची फौज बोलावून बेथलेहेम व आसपासच्या सर्व प्रदेशात जी दोन वर्षे व त्याहून लहान बालके होती, त्या सर्वांना हेरोदने जिवे मारले (मत्तय २:१६).

मुलांचे मानसिक खच्चीकरण करणे म्हणजेच निष्पाप बालकांची मानसिक दृष्ट्या कत्तलच आहे. मुलांना शिक्षणात मार्गदर्शन केल्यास त्यांनी निवडलेल्या ताऱ्यापर्यंत पोहोचण्यास सुकर होईल. त्यांच्या आयुष्याच्या वाटेवरील सर्व अडथळे, खाच-खळगे दूर सारीत तीन राजांच्या भूमिकेतील आपण ज्ञानी पालक निश्चित ठरू. हेरोदच्या राजवाड्यात गेलेल्या ज्ञानी राजांनी अद्भुत ताऱ्यावरून जन्मलेल्या येशू बाळाविषयी 'यहुदियांचा जन्मलेला राजा' म्हणून बाळ येशूची स्तुती केली व चौथा राजा हेरोद ह्याने बीजरूपी पाप 'राग' प्रकट केला; परंतु त्याच्या विरुद्ध राजांनी सद्गुण 'सौम्यता' हा गुण अंगीकारून ते इच्छित स्थळी पोहचले व नजराणे अर्पण करून बाळ येशूला नमन करून दुसऱ्या मार्गाने परतले.

आज बाळाचे संगोपन करताना पती-पत्नीचा सहभाग, बाळाच्या भावनिक, सामाजिक व आध्यात्मिक विकासासाठी पवित्र मरिया व योसेफ ह्यांचा 'सौम्यता' हा गुण आपण स्वीकारू शकतो. हेरोदचे भय, निरपराध बालकांची अमानुष हत्या ह्या घटना ख्रिस्तजन्माशी जोडल्या आहेत. आपल्या सभोवताली-सुद्धा आज द्वेष, मत्सर, राग, आतंकवाद, भय ही सर्व बीजरूप पापे अनुभवत असतो. ह्यावर कुटुंबासाठी आपण 'सौम्यता' हा सद्गुण अंगीकारणे काळाची गरज आहे. ●

# क्षितिज टूर्स

**आयोजक : अजय दा. म्हात्रे**

**मो. 9890644451/9373952097**

**आमच्या उन्हाळी सुट्टीतील आगामी सहली**

१) **काश्मीर, गुलमर्ग, सोनमर्ग व पहेलगाम श्रीनगर, अमृतसर, वाघाबॉर्डर सहल :** दि. ११ एप्रिल, २ मे, १३ मे २०२६. खर्च रु. ३५,०००/-, ५ते११ वर्षांमधील मुलांसाठी रु. ३१,०००/-. एकूण १२ दिवस. रेल्वे प्रवास-मुंबई-अमृतसर-जम्मू-दिल्ली IIIAc. दिल्ली-मुंबई राजधानी एक्सप्रेस IIIAc. बस प्रवास Ac ने.

२) **केरळ, कोचीन, मुन्नार, पेरियार, ॲलप्पी, त्रिवेंद्रम, कन्याकुमारी सहल :** दिनांक २ मे व १३ मे २०२६. एकूण १२ दिवस. खर्च रु. ३४,०००/-, ५ ते ११ वर्षांमधील मुलांसाठी रु. ३१,०००/-. रेल्वे प्रवास-मुंबई ते एर्नाकुलम, त्रिवेंद्रम ते मुंबई IIIAc. ने बस प्रवास 2x2 Ac ने.

३) **नैनिताल, कोसानी, जिमकॉर्बेट, मसुरी, हरिद्वार, ऋषिकेश सहलः** दिनांक २ मे व २५ मे २०२६. (एकूण १२दिवस) खर्च रु.३६,०००/- व ५ते११वर्षांमधील मुलांसाठी रु.३३,०००/-. रेल्वे प्रवास मुंबई-दिल्ली-मुंबई-राजधानी IIIAc. ने बस प्रवास Ac ने.

४) **कोलकत्ता, दार्जिलिंग, गँगटोक, मिरिक, पेलिंग, चायना बॉर्डर सहल :** दिनांक २६ मे (एकूण १२ दिवस). खर्च रु.३९,०००/- व ५ ते ११वर्षांमधील मुलांसाठी रु. ३६,०००/- रेल्वे प्रवास- मुंबई-कोलकत्ता-न्यू जलपायगुडी-कोलकत्ता-मुंबई IIIAc ने.

५) **काश्मीर, गुलमर्ग, सोनमर्ग, पहेलगाम, श्रीनगर सहल :** दिनांक १४ एप्रिल, ५ मे, १६ मे २०२६. (एकूण ७ दिवस) खर्च रु. २६,५००/- + विमान खर्च.

**टीप :-**

१) सहलीच्या सहलखर्चामध्ये रेल्वेप्रवास IIIAc ने असेल. बसप्रवास Ac ने. चहा-नाश्ता, शाकाहारी, मासांहारी घरगुती जेवण, हॉटेल वास्तव्य,फॅमिली रूम-दोघांमिळून एक, प्रेक्षणीय स्थळांची फी,गेट टुगेदर पार्टी.

२) सहलीसाठी नाव नोंदवताना रु. १०,०००/- भरून नावे नोंदवा.

३) सहलीचे बुकींग ६५ दिवस अगोदर करा.

४) सर्व सहलींमध्ये विमानप्रवास पर्याय उपलब्ध.

५) ट्युलिप गार्डनसाठी एप्रिलच्या काश्मीर सहलीची बुकींग करणे.

६) सर्व सहलीचा रेल्वे प्रवास IIIAc ने असेल.

# Dolphin India Tours

**आयोजक : रिचर्ड परेरा, सांडोर**

**मो. 9158853498/9765875470**
**7507532449**

१) **केरळ-मुन्नार,कोचीन,कन्याकुमारी, त्रिवेंद्रम, टेकडी ॲलप्पी, सेंट अल्फान्सो सहल :** दिनांक १९ते २९ एप्रिल, ३ ते १३ मे (११दिवस). **वसई-केरळ-वसई राजधानी IIIAC**, स्वामी विवेकानंद स्मारक, झू, डच पॅलेस, ज्युईश सिनेगॉग, वास्को-दी-गामा थडगे, सेंट अल्फान्सो कॅथेड्रल-म्युझियम-समाधी, चहामळे-चहा फॅक्टरी, ४० करोडचे चर्च, १ रात्र हाऊसबोट, स्टे Ac DlX. बस, त्रिवेंद्रम कोचीन Ac रूम, खर्च रु. ४०,०००/-.

२) **काश्मीर-गुलमर्ग, सोनमर्ग व पहेलगाम श्रीनगर, अमृतसर, वाघाबॉर्डर सहल :** दि. ४ ते १५ मे, १५ ते २६ मे. (१२ दिवस) **मुंबई-दिल्ली-मुंबई तेजस राजधानी IIIAc.** गोल्डन टेम्पल, जालीअनवाला बाग, वाघाबॉर्डर, परेड शो, बोटानीकल-शालिमार गार्डन्स, शिकारा राईडस्, फ्लोटींग मार्केट, बेताब-अरू व्हॅली, (फिल्मी डेस्टीनेशन), चंदनवारी, बॅट फॅक्टरी. खर्च रु. ३९,०००/-.

३) **काश्मीर डिलक्स सहल, गुलमर्ग, सोनमर्ग, पहेलगाम श्रीनगर,चंदनवारी, बेताब व्हॅली सहल :** दि. ७ ते १३ एप्रिल (ट्युलिप गार्डन), दि. ७ ते १३ मे, १८ ते २४ मे. खर्च रु. २७,५००/- + विमान प्रवासभाडे.

४) **सिमला-कुलू-मनाली, चंदिगड, मनिकरण रोहतांग, अमृतसर सहल : दि.४ ते १५ मे, १५ ते २६ मे** (१२ दिवस) **मुंबई-दिल्ली-मुंबई तेजस राजधानी IIIAc. DLXAC** बस अमृतसर, चंदिगड एसी रूम, पिंजोर-रॉक गार्डन, रोझ गार्डन, वाघाबॉर्डर, परेड शो, गोल्डन टेम्पल, जालीअनवाला बाग, रिव्हर राफ्टीग, शॉल फॅक्टरी, रोहतांग येथील बर्फाची दुनिया, गरम पाण्याची कुंडे, मॉल रोड-शॉपीग. खर्च रु. ४०,०००/-.

५) **हैद्राबाद सहल :** दि. १४ ते १९ एप्रिल, १४ ते १९ मे. रेल्वे IIIAC साईडसीन AC बस, AC रूम, झू, सालारजंग म्युझियम, ल्युबीनी पार्क, लेझर शो, स्नोवर्ल्ड, चारमीनार, गोवळकोंडा फोर्ट, रामोजी फिल्मसिटी, हुसेन सागर बोटीग इ. खर्च रु. १६,०००/-.

* सहल खर्चामध्ये रेल्वे IIIAC बसप्रवास AC, नाश्ता, जेवण (शाकाहारी,मांसाहारी) स.क्र. १ ते ४ कपल किंवा फॅमीलीस रूम, स. क्र. ५ (४ जणांस एक रूम). स्थळदर्शन फि समाविष्ट.

**संपर्क :**

स्टिफन डिमेलो, रमेदी : 9820098008

लिज्बन डिसिल्वा, रमेदी : 9869842712

# श्रमजीवींचा डॉक्टर : बाबा आढाव



महात्मा गांधी, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. राम मनोहर लोहिया ह्यांच्या विचारांचे पाईक म्हणजे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव. त्यांचे दिनांक ८ डिसेंबर २०२५ रोजी निधन झाले. गोरगरीब, गरजवंत, कामगार, वंचित, हमाल, मजूर, कष्टकरी, विस्थापित ह्यांच्या जीवनाशी समरस झालेले एक आगळे-वेगळे सेवापरायण आंदोलनी व्यक्तिमत्त्व!

आपल्या वयाच्या १२व्या वर्षी 'चले जाव' चळवळीपासून सुरू झालेल्या सामाजिक कार्यांचा त्याचा प्रवास वयाच्या ९५व्या वर्षापर्यंत अविरत, अखंडित सुरू होता. त्यांच्या आयुष्यातील एकूण ९५ वर्षांपैकी ८३ वर्षे ही त्यांची आंदोलनात गेली. त्यांचे जीवन म्हणजे एक आंदोलनपर्व होते.

बाबासाहेब पांडुरंग आढाव म्हणजे डॉ. बाबा आढाव ह्यांचा जन्म १ जून १९३०रोजी झाला. ते मूळचे पुण्यातले. बाबा दीड वर्षांचे असताना त्यांच्या वडिलांचे निधन झाले. बाबांच्या आईने 'सेवासदन' संस्थेतील अभ्यासक्रम पूर्ण केला. त्यांनी आपल्या चार अपत्यांचे संगोपन ध्येयवादाने केले.

हायस्कूलमध्ये असताना बाबांचा राष्ट्र सेवा दलाशी संबंध आला. १९४३ ते १९५० ह्या काळात ते नियमितपणे राष्ट्र सेवा दलाच्या शाखेत जात असत. आयुर्वेद महाविद्यालयातून बाबांनी १९५२ मध्ये पदवी संपादन केल्यानंतर त्यांनी नाना पेठेतील आपल्या घरी वैद्यकीय व्यवसाय सुरू केला. वैद्यकीय व्यवसाय करताना बाबांचा हमालांशी संबंध आला. त्यांची हलाखीची परिस्थिती आणि व्यथा ऐकून त्यांच्यासाठी 'हमाल पंचायत' संघटना स्थापन केली (१९५५). कष्टकऱ्यांना दुपारच्या वेळेत चांगले अन्न मिळावे ह्या उद्देशाने त्यांनी अल्प दरात भोजन सुविधा उपलब्ध करून देणारा 'कष्टाची भाकर' हा नावीन्यपूर्ण उपक्रम सुरू केला. त्यांच्या पुढाकारामुळे १९६९ मध्ये राज्यात महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार कायदा मंजूर झाला. असंघटित कामगारांच्या कल्याण आणि सुरक्षेसाठी देशातील हा पहिला कायदा होता. सगळीकडे दलितांना पाण्याचा हक्क मिळावा, ह्यासाठी १९७२ मध्ये त्यांनी 'एक गाव, एक पाणवठा' चळवळ उभारून राज्यभर मोर्चे काढले.

**आपले उभे आयुष्य कामगार, मजूर, हमाल, धरणग्रस्त, विस्थापित, वंचित ह्यांच्यासाठी समर्पित करणारे जगावेगळे डॉक्टर.**

पुढे वैद्यकीय व्यवसाय बंद करून पूर्ण वेळ सामाजिक कामात उतरल्यानंतर बाबांनी अनेक आंदोलने केली. ५३वेळा तुरुंगवास भोगला. संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गोवा मुक्ती आंदोलन, आणीबाणी विरोधी आंदोलन, महाराष्ट्र राज्य धरण व प्रकल्पग्रस्त शेतकरी पुनर्वसनासाठी पुढाकार, 'पुरोगामी सत्यशोधक' चे संपादन, देवदासी प्रथा निर्मूलन व पुनर्वसन चळवळ, मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतरासाठीचा लाँग मार्च, महात्मा फुले समता प्रतिष्ठान, राष्ट्रीय एकात्मता परिषदेची स्थापना, सामाजिक कृतज्ञता निधी, भिवंडी दंगल, ओडिसा वादळग्रस्त आणि मराठवाडा भूकंपग्रस्त ह्यांच्यासाठी मदतनिधी, हमालांसाठी घरे, हमाल पतपेढी, रिक्षा पंचायत, कागद-काच-पत्रा संघटना, धरणग्रस्त परिषद, अशी नानाविध कामे बाबा आढाव ह्यांच्या नेतृत्वाखाली झाली. प्रत्येक आंदोलनात त्यांच्या मुखावर गीत असायचे, ''आभाळाची आम्ही लेकरे, काळी माती आई, जात वेगळी नाही आम्हां, धर्म वेगळा नाही!''

'सरकारी पुरस्कार हा सरकारी अलंकार म्हणजे एक प्रकारची बेडीच' असे सांगून महाराष्ट्र राज्याचा 'महाराष्ट्र भूषण' हा सर्वोच्च सन्मानही त्यांनी नाकारला होता. आयुष्यभर जपलेल्या निष्ठा, तत्त्वप्रणाली आणि चारित्र्य ह्यामुळे वैचारिक विरोधही त्यांच्यापुढे नतमस्तक होत. पेशाने डॉक्टर असलेले बाबा आढाव खऱ्या अर्थाने 'कामगारांचे डॉक्टर' झाले.

'सुवार्ता' परिवारातर्फे बाबांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**- 'सुवार्ता' परिवार**

# कौलार को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

गजीबाई निवास, वासळई नाका, ता.पो. वसई, जिल्हा - पालघर

रजि. नं. ३१६३ स्थापना : १९२०

**मो.नं. : 7558215807 / 9325644608**

**kaular.co.op@gmail.com**





**कोकण नागरी पतसंस्था व बँको ब्ल्यू रिबन पुरस्कार विजेते**

**ऑडिट वर्ग 'अ'**

**मंगलमुर्ती ठेव योजना १८ महिन्यांसाठी**

**8.20%**

**मासिक व्याज सुविधा उपलब्ध.**

**इतर आकर्षक योजनासहित.**

**डिपॉझीट ८,५०,००,०००/- लाख,** **कर्ज ६,५०,००,०००/- लाख**

**भाग भांडवल ६,८०,००,००/- लाख** **राखिव निधी ७,१२,००,००/- लाख**

**सभासद संख्या १३६८** **खातेदार ३५००**

* अधिकृत विज बिल भरणा केंद्र, चेक क्लिअरिंग सुविधा उपलब्ध.

* NEFT / RTGS सेवा उपलब्ध. SMS बँकींग सुविधा

**महेश विनायक चौधरी**
**अध्यक्ष**

**व्यंकटेश हेमराज म्हात्रे**
**उपाध्यक्ष**

**कुशल शरद पाटील**
**सचिव**

**संचालक मंडळ व कर्मचारी वृंद**



**WISHING YOU ALL HAPPY NEW YEAR 2026**

## GHM TRAVELS

GHM TRAVELS, Office No. 8, Divine Residency,
Opp. Mulgaon Church, Mulgaon, Vasai West, Vasai – 401201

Ruth: 9730421602 / Gavin: 7709561700 / 9890214681

https://ghmtravels.my.canva.site

**** Customised Domestic Tours ****

* Goa - 3N/4D * Vadodara with Statue of Unity - 3D
* Kerala - 5N/6D * Velankanni / Pondicherry * Konkan - 5N/6D
* Hyderabad - 3N/4D * Mahableshwar / Panchgani * Kashmir
* Himachal (Shimla / Kullu Manali) - 5N/6D * Andaman Island ...

**** International Tours ****

* Nepal * Sri Lanka * Maldives * UAE (Dubai) * Vietnam
* Singapore * Malaysia * Thailand (Bangkok / Phuket / Pattaya) ...

**** We Offer ****

Train Booking / Bus Booking / Airline Tickets / Hotel Booking
(Best Hotels with Good Deals)

Passport (New & Renewal) / Tourist Visa / Customized Tours

Car – Mini Bus Rental / Honeymoon Package

BOOK NOW



## ST. JOSEPH HIGH SCHOOL

**An English Medium School affiliated to the Archdiocesan Board of Education, Mumbai requires**

1. **Teacher for Primary Section H.S.C, D. Ed preferably with TET/CTET. 1 Post- Clear Vacancy.**
2. **Accountant-cum-Office Clerk. B. Com. with Tally. 1 Post- Clear Vacancy.**

**Experienced candidate will be Given preference.**

**Apply in own handwriting within 10 days to The Manager at the above address.**

**Apply To The Manager**

**The Principal**

**St. Joseph High School**

**Jail Road (East), Umerkhadi,**

**Mumbai - 400 009**

# वाचकांचा प्रतिसाद : लेखकांची संजीवनी!

-जॉन गोन्सालविस
उमराळे



प्रिय वाचक,

होय, तुम्हीच आमचे आशास्थान, शक्तिस्थान, स्फूर्तिस्थान व प्रेरणास्थान! आम्ही लेखक, कलावंत मंडळी सृजनशील निर्माण करतो असं आमचं मत. आम्ही लिहिलेलं, आविष्कृत केलेलं तुमच्यापर्यंत पोहचल्यावर तुम्हाला ते भावलं; पटलं, रूचलं की तुम्ही त्यावर उत्स्फूर्त प्रतिसाद देता. तुमचा प्रतिसाद हे आमचे टॉनिक! एखादी गोष्ट तुम्हांस खटकली तरीही तुम्ही संयत भाषेंत व्यक्त करता. त्यामुळे आम्हांलाही आमची सबल स्थाने व दुर्बल स्थाने ह्यांची जाणीव होते. त्यामुळे आत्मपरीक्षण करण्याची आम्हां लेखक मंडळीस सुसंधी मिळते. पुढे वाटचाल करण्यासाठी प्रेरणा मिळते.

लेखक-वाचक दोघेही समोरासमोर येऊन संवाद करत नसले तरी हा अप्रत्यक्ष संवाद होत असतो. लेखक-वाचक ह्यांच्यात प्रत्यक्षात, अप्रत्यक्षात शब्दांचे, विचारांचे, कल्पनांचे आदानप्रदान होते. पूर्वी ह्यासाठी मोठ्या प्रमाणात तुम्ही वाचकवर्ग पत्रप्रपंचाचा आसरा घ्यायचे. तो आम्हां लेखक मंडळींना 'आधार' वाटायचा. त्यांतून कधी आपल्या भाव-भावना, आशा, अपेक्षा, इच्छा व्यक्त करून आपल्या आनंदानुभवांची अनुभूती तुम्ही आम्हा लेखक मंडळींना देत होता. त्या पत्रव्यवहारातून विचारांची देवघेव व्हायची. कधी-कधी तुमचे पत्र मिळणे म्हणजे लेखकांना साहित्य पुरस्कारांपेक्षा मोठा बहुमान वाटायचा.

आजच्या ह्या यंत्रवत युगात कुणालाच फुरसद नाही. जो तो गतीच्या मागे धावतोय. त्यांतून लेखक व वाचकांचीही सुटका होऊ शकली नाही. पत्रव्यवहाराऐवजी 'आपली साहित्यकृती भावली' इतके फोनवरून जरी कळवले तरी आम्हां लेखक मंडळीना घेतलेल्या परिश्रमाचे सार्थक झाल्याचे समाधान मिळते. आजच्या व्हॉट्सअॅप, फेसबुक, ई-मेल, ट्वीटर, इन्स्टाग्रामच्या जमान्यात मेसेज फॉरवर्ड करून आपण आपला निरोप लेखकांपर्यंत पोहचवत आहात, हेही नसे थोडके. आपला प्रतिसाद हीच लेखकांची खरी संजीवनी आहे. लिहिण्यामागची ऊर्जा आहे.

आम्ही लेखक मंडळी कोणी स्वान्तसुखाय, कोणी प्रबोधनासाठी, कोणी जागृती करण्यासाठी, कोणी मुक्त होण्यासाठी, कोणी व्यक्त होण्यासाठी, कोणी मान-पान-प्रतिष्ठेसाठीही लेखन करतो. तसेच वाचकही कोणी मनोरंजनासाठी, कोणी ज्ञान मिळवण्या-साठी, कोणी फुरसदीच्या वेळेचा सदुपयोग करण्यासाठी, कोणी अद्ययावत राहण्यासाठी वा कोणी मन समृद्धीसाठी वाचन करीत असतो. बहुविविधतेतून एकता साधण्याचे काम आपण वाचक ह्या नात्याने करीत असता. 'कलेसाठी कला' की 'जीवनासाठी कला' हा आपल्या साहित्यातील सनातन वाद. पण तुम्ही ह्या वादात न पडता नेहमी सुवर्णमध्य साधता. कला व जीवन, जीवन व कला हे परस्परपूरक आहेत. त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्यामुळे तुम्ही ह्या दृष्टीने समन्वयाची भूमिका घेता. कारण तुमच्या जीवनात निव्वळ कला नाही वा निव्वळ जीवन नाही; तर आपण कलात्मक जीवनाची वास्तव अनुभूती क्षणोक्षणी, पदोपदी घेत असता.

**वाचकांचा प्रतिसाद हीच लेखकांची खरी संजीवनी आहे. लिहिण्यामागची ऊर्जा आहे.**

चांगल्या लेखकाचा मार्ग वाचकांच्या ह्दयातून जातो. खूप लिहिणारे असतात. मात्र जो वाचकांच्या ह्दयावर राज्य करतो तोच उत्कृष्ट लेखकाच्या पंक्तीत जाऊन बसतो. पौर्णिमेच्या चांदण्याची वाट पाहावी तशी लेखकाच्या कलाकृतीची काही वाचक जीवेभावे वाट पाहतात आणि लेखकांची साहित्यकृती वाचून आपल्या आनंदाचे धनी होतात. अक्षरयात्रेचे वाटेकरी होतात.

कधीकधी आम्ही तुमची सर्वसामान्य वाचक, जागृत वाचक, चोखंदळ वाचक, कल्पक वाचक, बुद्धिमान वाचक, ग्रामीण वाचक, शहरी वाचक, पुरोगामी वाचक, प्रतिगामी वाचक, कृतिशील वाचक, निष्क्रिय वाचक... अशी कितीतरी वर्गवारी करतो. परंतु खरं सांगायचं म्हणजे वाचक हा वाचकच असतो. तो केवळ पुस्तकांशी नाते गुंफत असतो. अक्षर, शब्द, वाक्य, ओळी, परिच्छेद, पाने... असे करत करत नाते जोडत असतो. तुमच्या दृष्टीने एखादं पुस्तक हाती पडलं की ते वाचून खाली

ठेवू नये असे जे असते तेच उत्तम साहित्य. इतका साधा-सोपा अर्थ तुम्ही काढता.

लेखक पुस्तक लिहून मोकळा होतो. नंतर ते पुस्तक वाचकांच्या हाती पडते. मग ते पुस्तक लेखकाचे राहत नाही; तर ते वाचकांचे बनून जाते. पुस्तकाची प्रसिद्धी खऱ्या अर्थाने लेखक, प्रकाशक, वितरक, समीक्षक करीत नाहीत; तर तो वाचकच करतो. 'तुम्ही अमुक अमुक पुस्तक वाचले का? अवश्य वाचा!' हा आपला अभिप्राय आपण आपल्या वाचनप्रेमी मित्र-मैत्रिणींना सांगता तेव्हाच खऱ्या अर्थाने पुस्तकाची माऊथ टू माऊथ प्रसिद्धी आपण करता. खऱ्या अर्थाने पुस्तकाचे बेस्ट ॲम्बॅसेडर म्हणजे आपण वाचक मंडळी! वाचकच लेखकाच्या पुस्तकाला मोठे करतो. म्हणून ''प्रत्येक वाचक हा उपनिर्माता असतो तो ललितकृती वाचतो व त्यातून स्वत:चे अर्थविश्व निर्मिती.'' अशा आशयाचे विचार कवी ग्रेस ह्यांनी मांडले आहेत. तर मराठी साहित्याचे अभ्यासक आणि समीक्षक डॉ. हरिश्चंद्र थोरात म्हणतात, ''वाचक हा उपनिर्माता नसून निर्माता असतो.'' हे एका अर्थाने मनाला पटते. कारण वाचन व लेखन ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. आजच्या वाचकात उद्याच्या लेखकाची बीजे दडलेली आहेत. आजचा वाचक उद्याचा उदयोन्मुख लेखक असतो. म्हणून व्यंकटेश मांडगूळकर म्हणतात, ''प्रत्येक उत्तम वाचक हा संभाव्य लेखक असू शकतो. जसा प्रत्येक नकलाकार हा संभाव्य नट असू शकतो.''

आम्ही मुक्तपणे अभिव्यक्त होत असतो; नव्हे अभिव्यक्त होणे हाच आमचा जन्मसिद्ध हक्क आहे, ह्या आविर्भावात आम्ही लेखकमंडळी जगत असतो. ह्या अभिव्यक्तीच्या नावाखाली आमच्या हातून अनवधानाने कळत-नकळत चुका होतात. त्यांतून कधी विपरीत प्रसंगही ओढवले जातात. अभिव्यक्तीच्या नावाखाली आम्ही आमची वैयक्तिक मते, आमची बाजू दौडत असतो. मात्र आम्हां लेखकांना जसे अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे तसे तुम्हा वाचकांनाही अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे ह्याचाही आम्हांस विसर पडलेला असतो. कधीकधी वाचक ह्या नात्याने आम्ही तुम्हास गृहीत धरतो. हे गृहीत धरणे ज्या दिवशी आम्ही सोडून देऊ त्या दिवशी लेखक-वाचक सुसंवाद खऱ्या अर्थाने सफल व संपन्न होईल.

कविवर्य विंदा करंदीकरांची माफी मागून म्हणावेसे वाटते :-

*''लिहिणाऱ्याने लिहीत जावे*
*वाचणाऱ्याने वाचीत जावे*
*लिहिणाऱ्याने लिहिता लिहिता*
*वाचणाऱ्यांचे मन ओळखावे.''*

आपलाच,
पांढऱ्यावर काळे करणारा लेखक
मोबाईल : 99 60 65 92 85



प्रासंगिक

# आता गोव्याच्या चर्चमध्ये हिंदी भाषेत सामूहिक प्रार्थना

-प्रा. डॉ. अविनाश कोल्हे
मुंबई

ख्रिश्चन धर्म आज जगातील सर्वांत मोठा धर्म आहे. ह्या धर्माचे अनुयायी जगातील जवळपास प्रत्येक देशांत आहेत. एका अंदाजानुसार आज जगातल्या ख्रिस्ती धर्मीयांची संख्या अडीच अब्ज असावी. म्हणजेच जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी ३२ टक्के.

आज हे सर्व आठवण्याचं कारण म्हणजे डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात गोव्यातील चर्चच्या व्यवस्थापनाने घेतलेला एक महत्त्वाचा निर्णय. त्यानुसार आता गोवा राज्यातील चर्चमधून दर रविवारी सकाळी होणारी सामूहिक प्रार्थना हिंदी भाषेत होईल. आतापर्यंत ही प्रार्थना इंग्रजीत होत असे. भारतातील अनेक राज्यांत आता इतर राज्यांतील भारतीय स्थलांतर करतात, अनेक प्रसंगी ते ह्या नव्या राज्यात स्थायिक होतात. मुंबईकरांना ही प्रक्रिया गेले अनेक दशके परिचयाची आहे. ह्या प्रक्रियेमुळे अलीकडे लक्षात आले की गोवा राज्यात आता इंग्रजी लिहिणारे/बोलणारे ह्यांपेक्षा हिंदी भाषिकांची संख्या जास्त होत आहे. अशा इंग्रजी न जाणणाऱ्या ख्रिश्चन धर्मीयांची वाढती संख्या लक्षात घेत आता रविवारची प्रार्थना तसेच इतर महत्त्वाच्या धार्मिक प्रसंगी आतापर्यंत होत असलेली इंग्रजीतील प्रार्थना ह्यापुढे हिंदी भाषेत होईल.

गोव्यातील इंग्रजी न जाणणाऱ्यांची वाढत असलेली संख्या, ही काही रातोरात घडलेली घटना नाही. हा बदल हळूहळू होत होता. शेवटी २०२२ साली तेथील चर्चने ह्या नव्या स्थितीची दखल घेतली आणि नवे धोरण आखायला सुरुवात केली. आता घेतलेल्या हिंदी भाषेतील निर्णयामुळे तेथील इंग्रजी न जाणणाऱ्या ख्रिस्ती धर्मीयात आनंदाचे वातावरण पसरले आहे. स्वत:च्या मातृभाषेत देवाशी संवाद साधणे, त्याच भाषेत देवाची प्रार्थना ऐकणे श्रद्धाळूंसाठी फार महत्त्वाचे असते.



मेरी आणि जोसेफचा सुपुत्र म्हणजे येशू जो जन्माने ज्यू होता, त्याला ज्यू धर्मात तेव्हा होत असलेला भ्रष्टाचार, हिंसा, रीतिरिवाजांचं माजलेलं अवडंबर, धर्ममार्तडांची अरेरावी वगैरे मान्य नव्हते. त्याने ह्याच्या विरोधात प्रचार करायला सुरुवात केली, बंड केलं, प्रेम आणि करुणेचं महत्त्व सांगायला सुरुवात केली. त्याचा हा नवा संदेश गांजलेल्यांना, पिचलेल्यांना आपला वाटू लागला. त्याच्या अनुयायांत वाढ होऊ लागली. त्यामुळे चिडलेल्या ज्यू धर्ममार्तडांनी रोमन सम्राटांचा ज्युडिया प्रांताचा राज्यपाल पिलात ह्यांच्याकडे तक्रार केली. परिणामी रोमन सैनिकांनी येशूला अटक केली आणि राज्यपाल पिलात ह्यांनी त्याला 'सुळावर चढवा' अशी देहदंडाची शिक्षा दिली. त्यानुसार ३ एप्रिल ३३ रोजी त्याला सुळावर चढवण्यात आले. ह्यातील वर्षाबद्दल अभ्यासकांत मतभेद आहेत. काहींच्या मते इ.स.३३ तर काहींच्या मते इ.स.३०. असं असलं तरी तो दिवस 'शुक्रवार' होता, ह्याबद्दल वाद नाही. त्यानंतर दर वर्षी हा शुक्रवार 'चांगला पवित्र शुक्रवार' (गुड फ्रायडे) म्हणून जगभर साजरा केला जातो.

**स्वत:च्या मातृभाषेत देवाशी संवाद साधणे, त्याच भाषेत देवाची प्रार्थना ऐकणे श्रद्धांळूसाठी फार महत्त्वाचे असते.**

येशूचा धर्म हळूहळू जगभर पसरू लागला. त्याचे बारा शिष्य होते. त्यांना त्याने धर्मप्रचाराची आज्ञा दिली. त्यानुसार त्या शिष्यांनी धर्मप्रचाराला सुरुवात केली. ह्यातील एक शिष्य सेंट थॉमस जो भारतात इ.स. ५२साली आला. सेंट थॉमस भारतातील आजच्या केरळ राज्यातील मलाबार किनाऱ्यावर उतरला. थॉमसची भाषा आणि केरळातील लोकांची भाषा वेगळी होती. सुरुवातीला बायबल ग्रीक आणि हिब्रू भाषेत तर काही भागांत अरेमिक भाषेत होते. जगातील पहिले छापील बायबल लॅटिन भाषेत बनले. जर्मन शास्त्रज्ञ गुटेन्बर्ग ह्यांनी छपाईच्या तंत्राचा शोध लावला आणि बायबलच्या शेकडो प्रती लॅटिन भाषेत बनण्यास सुरुवात झाली. तरीही बायबलची भाषा आणि स्थानिकांची भाषा ह्यात दरी होतीच. तेव्हाचे लॅटिन भाषेतील प्रशिक्षित धर्मगुरू चर्चमधील प्रार्थना, उपासनेचे विविध विधी लॅटिन भाषेत करत असत. ही भाषा बिगर लॅटिन भाषिक श्रद्धाळूंना समजत नसे. गोव्यातील हिंदी भाषिकांना जसं इंग्रजीत होत असलेलं बायबलचं सामूहिक वाचन समजत नाही, तसं.

जगभर पसरलेल्या ख्रिश्चन धर्मासमोर हे आव्हान अनेक शतकं होतं. ख्रिश्चन धर्मीयांसाठी अतिपवित्र शहर म्हणजे इटलीची राजधानी रोम शहरातील सुमारे शंभर एकर जमिनीवर वसलेलं 'व्हॅटिकन शहर.' येथे आजही ख्रिश्चन धर्माचे सर्वोच्च धर्मगुरू म्हणजे पोप (परमाचार्य) राहतात.

पहिली व्हॅटिकन परिषद १८६५-१८६८मध्ये झाली होती. ह्या धर्मपरिषदेने

तोपर्यंत जागतिक पातळीवर पोहोचलेल्या ख्रिश्चन धर्मासंबंधी काही महत्त्वाचे आणि दूरगामी परिणाम करणारे निर्णय घेतले. त्यानंतर विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ख्रिश्चन धर्मासमोर जागतिक पातळीवर नवी आव्हानं उभी राहात असल्याचे वाटल्यामुळे मग पोप महोदयांनी इ.स. १९५९मध्ये अशा धर्मपरिषदेची घोषणा केली. ह्यातूनच १९६२ ते १९६५ दरम्यान दुसरी व्हॅटिकन परिषद संपन्न झाली. ख्रिश्चन धर्माबद्दल 'आधुनिक काळातील अतिशय महत्त्वाची घटना', असा ह्या धर्मपरिषदेचा उल्लेख केला जातो.

द्वितीय व्हॅटिकन परिषदेने घेतलेला महत्त्वाचा निर्णय म्हणजे चर्चमधील सामूहिक प्रार्थना आणि इतर महत्त्वाचे विधी त्या त्या देशांतील स्थानिक भाषांत घेतले जावे. फक्त भारताचा विचार केला तर द्वितीय व्हॅटिकन परिषदेनंतर चर्चमधल्या प्रार्थना मराठी-हिंदी-गुजराथी-कन्नड वगैरे अनेक भाषांत व्हायला लागल्या. थोडक्यात, आता गोव्यातील चर्च धर्मगुरूंनी जो निर्णय घेतला आहे त्यामागे जागतिक पातळीवर ख्रिस्ती धर्मसभेची मान्यता आहे. ही मान्यता दुसऱ्या व्हॅटिकन परिषदेमध्ये देण्यात आली होती. उपलब्ध माहितीनुसार मराठीतील पहिले बायबल म्हणजे फादर थॉमस स्टीफन ह्यांनी इ.स.१६१६मध्ये केलेले 'ख्रिस्तपुराण.' हे भाषांतर संत एकनाथांच्या काळातील आहे. फादर स्टीफन ह्यांनी केलेल्या भाषांतरानंतर बायबलची मराठीत अनेक भाषांतरं झाली. अलीकडेच काही वर्षांपूर्वी 'सुवार्ता'चे माजी संपादक ख्रिस्तवासी फादर दिब्रिटो ह्यांनी 'सुबोध बायबल' प्रसिद्ध केले होते.

थोडक्यात काय तर 'बायबल'सारखा धर्मग्रंथ मराठीसह जगातील अनेक भाषांत उपलब्ध असूनही चर्चमधील प्रार्थना आणि इतर धार्मिक विधी मात्र लॅटिन भाषेतच होत असत. लॅटिन भाषा स्थानिकांना समजत नसे. ह्यावर ख्रिश्चन धर्मगुरूंनी १९६२साली उपाय काढला. ह्याच्या आधारेच आता गोव्यातील चर्चमध्ये हिंदी भाषेत रविवारच्या सामूहिक प्रार्थना म्हटल्या जातील. स्थानिक भाषा व धर्म ह्यांच्यात असा संबंध असतो.

(लेखक ज्येष्ठ साहित्यिक असून राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

भ्रमणध्वनी : 98 92 10 38 80 •


'सुवार्ता' साठी आपली जाहिरात, वर्गणी किंवा देणगी चेकद्वारा द्यायची असल्यास कृपया आपला चेक

**'The Suwarta Trust'**

ह्या नावाने काढावा.

**- व्यवस्थापक**



# परिचय टूर्स अॅण्ड कॅटरर्स

**-: आगामी सहली :-**

१) **दुधनी, खानवेल, सिल्वासा, दमण सहल :** दिनांक ९ जानेवारी ते ११ जानेवारी २०२६. खर्च रु. ७,०००/- मात्र.
२) **बाळ येशूच्या सणानिमित्त नाशिक सहल :** दिनांक १४ फेब्रुवारी व १५ फेब्रुवारी २०२६. खर्च रु. ५,०००/- मात्र.
३) **सापुतारा सहल :** दिनांक २६ एप्रिल ते २८ एप्रिल २०२६. एकूण खर्च रु. ७,०००/- मात्र.
४) **आसाम, मेघालय सहल :** दिनांक २ मे ते ११ मे २०२६. रेल्वे आणि फ्लाईट पर्याय उपलब्ध. खर्च रु. ३८,०००/- मात्र.
५) **वेलंकनी मातेचा नोव्हेना (मराठी):**दिनांक ६ ते १५ मे २६.
६) **बँगलोर, म्हैसूर, उटी सहल :** दिनांक १९ मे २७ मे २०२६. एकूण खर्च रु. ३३,५००/- मात्र.
७) **काश्मिर, श्रीनगर, पेहलगाम :** मुंबई ते दिल्ली राजधानी, दिल्ली ते श्रीनगर फ्लाईट.
८) **मालवण गोवा सहल :** दिनांक २९ मे ते ३ जून २०२६. एकूण खर्च रु. १६,०००/- मात्र.

* संपूर्ण टूर्समध्ये व्हेज-नॉन व्हेज अनलिमिटेड बुफे - **परिचय टूर्स** रुचकर जेवण, नाश्ता आणि एक शानदार पार्टी असेल.

**: संपर्क :**

**कैतान तुस्कानो,** नंदाखाल ९४२३९४७५३४
**सोपान खरात,** निर्मळ ९५०३५९८१५३



# जेरूसलेम टूर्स अॅन्ड कॅटरिंग सर्व्हिस, आगाशी

१) **निसर्गरम्य कोकण-गोवा दर्शन :** १२ ते १७ एप्रिल २०२६. ए.सी.ट्रेन, ए.सी. बस व ए.सी.रूम (प्रवास वसई ते वसई) क्रुझ सफर, समुद्र सफर विथ डॉल्फिन दर्शन, मसाला गार्डन, कोकण तारकर्ली बीच, सिंधुदुर्ग किल्ला व लाकडाच्या खेळणाचा बाजार खरेदी. संत फ्रान्सिस झेविअर दर्शन (चर्च), भारदार पार्टी तसेच एक दिवस मालवणी जेवणाचा आस्वाद! एकूण खर्च प्रत्येकी रु. १८,०००/-. ५ ते १० वर्षे मुलांस रु. १४,००० /-.
२) **मँगलोर, उडीपी, कुर्ग सहल** : २५ एप्रिल ते १ मे २०२६. फूल ए.सी.पॅकेज, सर्व काही बघण्यासारखं. फूल खाण्यापिण्याची व्यवस्था! आजपर्यंत माझ्याकडे आलेले माझे चाहते विशेषकरून सिनियर सिटीजन खुप खूश होऊन आशीर्वाद देऊन गेले आहेत. अशी ही सहल आहे. खर्च रु. २५,०००/-. ५ ते १० वर्षे मुलांस रु. २२,००० /-.
३) **हैद्राबाद-रामोजी फिल्म सिटी सहल :** ७ ते १२ मे २०२६. ए.सी. ट्रेन, ए.सी.बस, ए.सी.रूम, गेट टुगेदर पार्टी, सर्व एन्ट्री फीसहीत रु.१६,०००/-. ५ते १०वर्षे मुलांस रु.१४,०००/-

**सूचना :** वरील तिन्ही सहलींसाठी तीन जणांस एक रूम. तसेच ३ ते ४ जणांची फॅमिली असेल त्यासाठी एक रूम.

**संपर्क :** संज्याव घोन्सालवीस, आगाशी : **9320888907**
पायस घोन्सालवीस : **9766092738**

# आधुनिक विवाह सोहळ्यात हरवलेला निखळ आनंद

-जॉन लुईस परेरा
घोसाळी, नंदाखाल

विवाह हा पृथ्वीवरील एक अत्यंत मंगल आणि पवित्र सोहळा मानला जातो. संस्कृत साहित्यात ह्या शुभ प्रसंगाला 'कौतुकमंगलम्' असे गौरवपूर्ण नाव देण्यात आलेले आहे. कन्या वा पुत्राचा योग्य सहचराशी विवाह जुळणे ही आई-वडिलांसाठी परमकौतुकाची घटना असल्याने ह्या मंगल कार्यास कौतुक सोहळा असेही संबोधले जाते.

परंतु अलीकडे नावापेक्षा सोहळ्यातील थाटामाटाला जास्त महत्त्व दिलेले जाणवते. आजचे सोहळे राजेशाही पद्धतीने सजलेले; मंडपांची सजावट पंचतारांकित भव्यतेला साजेशी, टेबल सिस्टम, लाईव्ह काऊंटर आणि विविध पाककृतींनी गजबजलेली भोजनव्यवस्था अशा वातावरणात साजरे केले जात आहेत. सोहळ्यातील भोजन थाळी जरी स्वादिष्ट भोजनाने सजवलेली असली तरी आरोग्याची खात्री मात्र दुर्मीळच. झगमगाट, रोषणाई, उत्कृष्ट सुशोभीकरण कशाचीही कमी नाही; परंतु पूर्वीच्या सोहळ्यात अनुभवलेला तो निखळ, निरागस आनंद मात्र हरवलेला जाणवतो.

पूर्वी गावातील लग्नसोहळा हा एका कुटुंबापुरता मर्यादित नव्हता; तर तो एक उत्सव म्हणून संपूर्ण गाव ह्या सोहळ्यात उत्साहाने सहभागी होत असे. कुटुंबीय, नातेवाईक, गावकरी सर्वांनी मनापासून पार पाडलेल्या कामकाजामुळे तसेच हास्य-विनोद व आपुलकीने ओथंबून जाई. तेव्हा मनोरंजनाची साधने अत्यंत मर्यादित असल्याने रेडिओ हेच एकमेव माध्यम होते. लग्नसोहळ्यातल्या भोंग्यावर वाजवलेली मराठी लोकगीते, हिंदी पिक्चरमधील गाणी ऐकण्यास मिळणे ही एक पर्वणीच होती.

शाळकरी मुलांसाठी लग्न हा वर्षातील सर्वांत आनंदाचा काळ असायचा. शाळा सुटताच मंडपातील लहानमोठी कामे करण्यासाठी त्यांचा घोळका उत्साहाने सामील व्हायचा. मंडपात कागदी पताका लावून वेशीपर्यंतचा मार्ग सजविण्याची



जबाबदारी त्यांच्यावरच. मंडप उभारण्याचे काम गावकऱ्यांचे, तर तोरण बांधणे हे मानाचे कार्य गावातील तरुण व ज्येष्ठ मंडळींचे. ह्यावेळी ताडी, बाफलेले चणे, फ्रेश फरसाण अशा साध्या पण आत्मीयतेने भरलेल्या पाहुणचाराने वातावरण लग्नमय बनायचे.

लग्नात स्त्रियांचा सहभाग हा प्रथम चिठ्ठीपासून सुरू होत असे. घराघरांत हिंदोळ्यावर बसून पारंपरिक लग्नगीते गायली जात. फुगे, रोट्या (वडे) तयार करण्यासाठी तांदूळ धुणे, सुकवणे, दळणे आणि मग रात्रभर जागून शेकडो रोट्या (वडे) तव्यात तळणे ही सर्व कामे स्त्रिया आनंदाने व नि:स्वार्थीपणे पार पाडत असत.

**विवाह संस्कार आपण इवेंट म्हणून साजरा करीत आहोत का?**

तेव्हा स्वयंपाक केटरिंग नव्हे; तर घरगुती पद्धतीने, गावातील किंवा नातेवाईकांतील कुणा कुशल व्यक्तीकडे ही जबाबदारी सोपविली जाई. बकऱ्याचे मटण हे केवल सणासुदीला किंवा लग्नात मिळणारे दुर्मीळ चवीचे आकर्षण! जेवणासाठी मंडप नव्हता, खुर्च्या नव्हत्या. भारतीय बैठकीत ओटीवर, अंगणात सर्वजण प्रेमाने वाढून घेत. जी मंडळी लग्नाच्या दिवशी व्यवस्थापनात व्यस्त असत त्यांच्यासाठी 'सौदिओ' म्हणजे सोमवारी विशेष भोजन आयोजित केले जात असे. ही परंपरा आजही काही ठिकाणी टिकून आहे; परंतु कॉन्ट्रॅक्ट पद्धतीच्या युगात त्याची आवश्यकता उरते का, हा प्रश्न अनुत्तरित राहतो.

पूर्वी नातेवाईकांची लगबग, आत्मीयता, सामूहिकता, निरागस आनंद ह्या सर्वांचा मिलाफ लग्नाला खऱ्या अर्थाने मंगलमय बनवत असे. आज त्या जागी मित्रमंडळींचा झपाटा जास्त आहे. इव्हेंट मॅनेजमेंटची जबाबदारी आणि रेडिमेड सोयी ह्यामुळे आपलेपणा आणि सहभागिता हरवलेली जाणवते. सर्व काही मिळत असले तरी पूर्वीसारखी सामूहिकता, एकत्र काम करण्याचा आनंद, नात्यांच्या उबदार स्पर्शाचा अनुभव हे सारे नजरेआड झाले आहे.

वास्तविक सोहळे मर्यादित स्वरूपात साजरे केले तर आपल्या दंग जीवनात आपली नाती टिकविण्यासाठी आणि दैनंदिन जीवनातील ताण दूर करण्यासाठी ते एक रामबाण उपाय ठरू शकते. परंतु आपण शोबाजीच्या इतके आहारी गेलो आहोत की प्री-वेडींग रिसेप्शन ही प्रथा चालू करून आपण पवित्र साक्रामेंतापेक्षा उत्सवाच्या भव्यतेला प्राधान्य दिले आहे. तरीही ह्या झगमगाटाच्या पलीकडे कौतुक सोहळ्याचे खरे सौंदर्य अजूनही नात्यातील आपुलकी, जिव्हाळा व स्नेहभाव ह्यात दडलेले आहे. म्हणूनच आधुनिक सोयी-सुविधांचा स्वीकार करताना मायेच्या ह्या परंपरा जपल्या तर विवाहसोहळे केवळ भव्य नव्हे; तर मनाला उभारी देणारे, निखळ आनंद देणारे आणि खऱ्या अर्थाने मंगलमय ठरू शकतात.

भ्रमणध्वनी : 90 96 98 29 85

# डिसिल्वा टूर्स अँड कॅटरर्स

**आयोजक : क्लेमेंट एलायस डिसिल्वा,** गास चर्चसमोर.
**९८६०५६८५५३, ९५७९०२४६२०, ८४४६४३१९६९**

**१) बाळ येशू नाशिक सहल :** दिनांक १४ व १५ फेब्रुवारी २०२६. ए.सी. २×२ ए.सी. बसने प्रवास. ३ स्टार हॉटेलात वास्तव्य. चार जणांस एक रूम. एकूण खर्च प्रत्येकी रु. ५,०००/- व मुलांस रु. ३,८००/-मात्र.

**२) बाळ येशू नाशिक एक दिवसीय सहल :** दिनांक १४ फेब्रुवारी २०२६. पुश बॅक ए.सी. बसने प्रवास. चहा, नाश्ता, गावठी बोकड मसाला, चिकन चिली, प्रसिद्ध वाल-वांग्याची भाजी, फ्रुट, डाळ, पाव व राईस. एकूण खर्च प्रत्येकी रु. १,९००/-मात्र.

**३) मे महिन्याच्या सुट्टीमध्ये खास शिक्षक -विद्यार्थी व इतर भाविकांसाठी वेलंकनी मातेचा नोव्हेना :** दिनांक ६ ते १५ मे २०२६. नॉन ए. सी. रूम, रेल्वेप्रवास + जेवण. रू. १५,०००/- ए.सी. रूम, ए.सी. तिकीट + जेवण. रू. १९,०००/- ए.सी. रूम व चेन्नई ते नागापट्टम व नागापट्टम ते चेन्नई ए.सी.तिकीट व मुंबई ते चेन्नई व चेन्नई ते मुंबई विमान प्रवास. एकूण खर्च प्रत्येकी रु.२५,५००/-. दिनांक ०८ मे ते १३ मे २०२६, फक्त जेवण व राहण्यासाठी ए.सी रूम एकूण खर्च प्रत्येकी रु. १३,०००/-मात्र.

**४) एप्रिलमध्ये खास भारताची शान काश्मिर ट्यूलिप गार्डन पाहण्यासाठी व श्रीनगर काश्मिर, पहेलगाम, गुलमार्ग, सोनमार्ग सहल :** दिनांक १२ ते १८ एप्रिल २०२६. ७ दिवस. खर्च रु. २७,५००/-+विमान खर्च. मुलांसाठी रु.२३,५००/- + विमान खर्च.

**५) अमृतसर, वाघा बॉर्डर, श्रीनगर काश्मिर, पहेलगाम, गुलमार्ग, सोनमार्ग सहल :** दिनांक ४ ते १५मे व १६ ते २७ मे २०२६. १२ दिवस. एकूण खर्च प्रत्येकी रु. ४०,०००/- व (५ते११वर्षे) मुलांस रु. ३४,०००/-. जाताना पश्चिम एक्सप्रेस ए.सी. व येताना राजधानी ए.सी. प्रवास, साईटसीनसाठी पुशबॅक मिनी बस.

**६) काश्मिर डिलक्स हायफाय सहल :** दिनांक ७ ते १३मे व दि. १९ ते २५ मे २०२६. मुंबई ते श्रीनगर व श्रीनगर ते मुंबई, विमान प्रवास, साईट सीनसाठी पुश बॅक मिनी बस. खर्च २८,०००/- + विमान खर्च. मुलांसाठी रु. २३,०००/- + विमान खर्च.

**७) सिमला, कुलू, मनाली, रोहतांग पास, धरमशाळा, डलहौजी, चंदीगड सहल :** दिनांक १६ मे ते २७ मे २०२६. खर्च ४२,०००/-. मुलांस रु. ३५,०००/-. जाता-येताना राजधानी, साईटसीनसाठी ए.सी. बस., ए.सी हॉटेल, सर्व एन्ट्री फी समावेश.

**८) केरळ पोट्टा रिट्रीट :** दिनांक २८ मे ते ८ जून २०२६. (१२ दिवस). खर्च : जाताना-येताना स्लिपर तिकीट रु. ८,०००/-, जाताना-येताना ए.सी. तिकीट रु. १०,०००/-. हिंदी कन्व्हेंशन (बायबल अधिवेशन) रिट्रीट आयोजित करण्यात आलेली आहे. ६ दिवस रिट्रीट, अडीच दिवस साईडसीन. स्थळदर्शन :- मुन्नार, चहाचे मळे, स्पाईस गार्डन व धबधबा, चहाची फॅक्टरी, जेरूसलेम, होली लॅन्ड, सेंट थॉमस चर्च व डिजिटल शो, संत सि. अल्फोन्सा, कोरेटी चर्च (रोझरी व्हिलेज) सेंट जॉर्जचे ४० करोडचे चर्च, वेल्हार पद्म चर्च, शॉपींग ब्रॉड वे मार्केट एर्नाकुलम येथे २ तास बोटींग. **कृपया ॲडव्हान्स रु. ५,०००/- भरून आपली नावे नोंदवावीत.**

* **सर्व सहलींमध्ये रु. ५,०००/- ॲडवान्स भरून नावनोदणी करणे. सर्व सहलीमध्ये बुकींग चालू आहे.**

१) वेलंकनी भुजींग सेंटर, किरावली : 9049110595
२) सुनिता पोसा, उत्तन : 9833801263, 9222111269
३) स्वाधिना परेरा, मारीभाट, गिरीज : 9823614664
४) क्लेरा आल्मेडा, माणिकपूर : 9892252117
५) ॲन्ड्र्यू रूमाव, नंदाखाल : 9788592847, 9284106936
६) संगीता लोपीस, चुळणारोड : 8007266418


## Bride Wanted

**Groom :** Roman Catholic, Age : 36 years., Height : 5' 8". Hails from a decent family. Degree in finance from Australian University, Australian Citizenship. Staying in self owned house. Working in Finance co. in Australia.
**Expected Bride :** Educated, Suitable, Ready to settle in Australia, Good behaviour, Roman Catholic.

**Suvarta Box No. : Jan. 01**

## Bride Wanted

**Groom :** 27 years, good-looking, Wadval Christian. **Education :** Engineer, employed with a reputed company in Mumbai.
**Expected Bride :** Respectful, polite, well-mannered, warm and caring.

**Contact Mail Id :**
**kindsmiles12@gmail.com**
**Contact No: 9021894129**

## Wanted Groom

Catholic, 29 years, MBBS, MD. Parents invite proposals for their daughter from well-educated, bachelor grooms aged 28–35 years with strong family values and good moral character.

**Contact**
futuretogether.connect@gmail.com

# आनंदी रहा, निरोगी रहा

**लीला विल्यम परेरा**
माफर्की, सांडोर



वरिष्ठ नागरिकांचे आरोग्य आणि त्यांचे कल्याण हा विषय फार महत्त्वाचा आणि संवेदनशील आहे. आज जगात माणसाचे आयुष्यमान वाढले आहे. कारण वैद्यकीय प्रगती आणि जीवनमानातील प्रगती हा बदल आपल्याला संधीही देतो आणि जबाबदारीही टाकतो. जसजसे आपले वय वाढत जाते, तसतसे एकाच वेळी दोन विरुद्ध विचार, भावना, वर्तन अवलंबिले जाते. त्यामुळे कधीकधी आपलाही गोंधळ होतो.

वास्तविक तेव्हाचे शिक्षण व आताचे शिक्षण ह्यांत खूप फरक आहे. नवीन शिकण्याची जिज्ञासा. तंत्रज्ञानापासून तर फायनान्सपर्यंत शिकून घेणे, तरुणांशी कसे बोलावे, नवनवीन बदलासाठी आपण तयार असावे. आपले पूर्वग्रह बदलतात, कधी तर साठीनंतर स्वत:चा पेहराव, खानपान, कृती, इच्छा, आकांक्षा, स्वत:वर आपण बंधने घालतो. आपण रिटायर्ड झाल्यावर घरात सर्वांच्या इच्छा पूर्ण करतो. स्वयंपाक करतो, मुले सांभाळतो, आपल्या अनुभवाचा, ज्ञानाचा उपयोग करतो; पण घरात पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये समान वागणूक मिळते का? एकाच वेळी आपण हवेहवेसे वाटतो व दुर्लक्षितही होतो.

जसजसे वय वाढत जाते, तसतसे मानसिक दृष्ट्या आपण आतून शांत होत जातो. मात्र ऐकून न ऐकल्यासारखे काहीक गोष्टींकडे दुर्लक्ष करतो, म्हणजे कानावर पडलेली गोष्ट मेंदूपर्यंत पोहचू देत नाहीत. वाढत्या वयाने मिळवून दिलेले हे शहाणपण असते. विचारल्याशिवाय कोणाला सल्ला देऊ नका. प्रत्येक वेळी आपले मत मांडायलाच हवे असे नाही. 'शांतता' हे प्रत्येक प्रश्नाला दिलेले सुंदर उत्तर आहे आणि संयम हे परिस्थितीला दिलेले प्रत्युत्तर आहे.

अनेक आजार हे प्रत्यक्षात आजार नसतात. ते वाढत्या वयानुसार शरीरात दिसणारी नैसर्गिक चिन्हे असतात आणि ज्येष्ठ होणे हा आजार नाही; तर तो जीवनाचा नैसर्गिक प्रवास आहे. ह्या वयात आपल्याला मुख्य आरोग्य समस्या म्हणजे उच्च रक्तदाब, मधुमेह, संधीवात, अंग-दुखी, कॅन्सर, हृदयरोग, अशक्तपणा, झोप न येणे, स्मृती कमी होणे, हालचालीतील अडचणी, एकटेपणा, नैराश्य, चिंता, भीती, पडण्याचा धोका, अल्झायमर, डिमेन्शीया, आर्थिक अडचणी आणि वैद्यकीय खर्च हे केवळ वैद्यकीय प्रश्न नाहीत; तर सामाजिक आणि भावनिक प्रश्नही आहेत. कारण

> **ज्येष्ठ होणे हा आजार नाही; तर तो जीवनाचा नैसर्गिक प्रवास आहे.**

सामाजिक बदल घडून आल्यामुळे उच्चशिक्षित मुले परदेशात, स्वावलंबी, आर्थिक दृष्ट्या सबल म्हणून वृद्धाश्रमे वाढली आहेत.

निरोगी असणे म्हणजे स्वावलंबन, मानसिक शांतता, सन्मानाने जगणे, उद्देशपूर्ण जीवन जगणे होय.

हृदयतज्ज्ञ डॉ. जगदिश हिरेमठ म्हणतात, "W.H.O. ने १००० लोकांवर ७५ वर्षे संशोधन केलंय की good living आणि Long living साठी काय गरज आहे? तर आपले जनसंपर्क Social connectivity & emotional core smoking Last no वर आहे.

उत्तम आरोग्यासाठी मित्रांनी मित्राबरोबर मित्रासारखेच रहावे. म्हणूनच मित्र-मैत्रिणी आठवड्यातून एकदा भेटून एकत्र घालवलेला वेळ फक्त टाईमपास नसून मेडिकल थेरपीसुद्धा आहे. सकारात्मक विचार करणारे मित्र-मैत्रिणी आपल्या आयुष्यात बदल घडवतात. इस्राएलचे मानसशास्त्रज्ञ डॉ. शोधी रंगीजोड म्हणतात, चुकीचे मित्र निवडल्यामुळे आयुष्यातील आनंदी पातळी ४५टक्के कमी होते, तर मैत्रीमुळे आयुष्यात येणाऱ्या चढउतारांना खूप सहजपणे सामोरी जाता येते. मित्रामुळे जास्त आनंद व विश्वास मिळतो.

आयुष्यात आपल्याला काय मिळाले? हा विचार करण्यापेक्षा जे मिळाले आहे त्यामध्ये आपण किती समाधानी आहोत, हे जास्त महत्त्वाचे असते. आपले सुख हे आपल्या समाधानावर अवलंबून असते. जग खूप चांगले आहे. आपल्याला चांगले वागता

आले पाहिजे. देह सर्वांचा सारखाच आहे. फरक फक्त विचारांचा. शरीरात कोणतीही सुंदरता नसते; तर सुंदर असतात ते व्यक्तीचे कर्म. त्यांचे विचार, त्यांची वाणी, त्यांची वागणूक, त्यांचे संस्कार आणि त्यांचे चारित्र्य. ज्याच्या जीवनात हे सर्व आहे, तीच व्यक्ती जगातली सर्वांत सुंदर व्यक्ती असते.

विल्यम शेक्सपिअर म्हणत, 'मी नेहमी आनंदी असतो, कारण मी कुणाकडून काही अपेक्षा करत नाही.' अपेक्षा हीच सर्वांत मोठी वेदना आहे. वाढत्या वयापेक्षा वाढत्या अपेक्षा माणसाला जास्त थकवतात. सुख आपल्या हातात नाही; पण सुखाने जगणे हे नक्कीच आपल्या हातात आहे.

माणूस जसजसा वयाने ज्येष्ठ होतो तसतसे आपण आध्यात्मिकतेकडे जास्त वळतो. देव आपल्याला शक्ती देतो. प्रार्थनेने आपल्याला मन:शांती मिळते. जी माणसे दुसऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण करण्याची क्षमता ठेवतात, त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद ईश्वर कधीच कमी करत नाही.

ह्या सर्वांवर औषधोपचार म्हणजे व्यायाम, योगा, प्राणायम, ध्यान, सकाळ-संध्याकाळ चालणे, उपवास, संगीत, आपले छंद जोपासणे, हसणे, विनोद, कुटुंबांसोबत जेवणे, गाढ झोप, सर्वांशी मिळून मिसळून वागणे, सर्वांचे भले करणे, आनंदी राहण्याचा निर्णय, मनातील सकारात्मकता, इतरांसाठी प्रार्थना, प्रेम घेणं-देणं, मौन व मन:शांती ही सर्व औषधे फुकट आहेत. म्हणून, 'आनंदी रहा; निरोगी रहा.'

●


## मच्याडो टूर्स आणि कॅटरर्स, नाळा

**बाळ येशूच्या सणासाठी नाशिक सहल :** दिनांक १४ व १५ फेब्रुवारी२०२६. जेवण : व्हेज-नॉनव्हेज. चहा-नाश्ता, प्रवास ए. सी. बसने व ए.सी. रूम. चार जणांस एक रूम. एकूण खर्च प्रत्येकी रु. ४७००/- व मुलांस रु. ४०००/- (वय ४ ते ११वर्षे)

**: अधिक माहितीसाठी संपर्क :**

**लॉडसन मच्याडो**
9923640082, 9892012890

**लिप्सन मच्याडो**
8108340640, 9011986305

**मायकल रॉड्रिग्ज,** माळीआळी, निर्मळ
9527832169

**ऑस्टीन कोरिया, नाळा**
9527888469

**ग्रेव्ही मच्याडो,** आगाशी
9730863207, 8087187597

## जेम्स ट्रॅव्हल्स

१) **बाळ येशू नाशिक सहल :** दि. १४ फेब्रु. एक दिवस रु. १,८००/ व दि. १४ व १५ फेब्रु. २०२६. दोन दिवस खर्च प्रत्येकी रु. ४, ८००/-मात्र.

२) **ट्युलिप गार्डन स्पेशल काश्मिर सहल :** अमृतसर, वाघा बॉर्डर, श्रीनगर, सोनमर्ग, गुलमर्ग, पहेलगाम, दि. ११ ते २२ एप्रिल २०२६. खर्च प्रत्येकी रु.३७, ०००/-मात्र.

३) **कोलकत्ता, दार्जिलिंग, पेलिंग, गॅगटोक (सिक्कीम)सहल :** दि. ४ ते १५ मे २०२६ रेल्वेप्रवास, मुंबई - हावडा दुरोंतो एक्स.ने. एकूण खर्च रु. ४१,०००/-.

४) **सिमला, कुलू मनाली, धरमशाला, डलहौसी सहल :** दि. १६ ते २८ मे २०२६. रेल्वे प्रवास ३ ए.सी. ने बस प्रवास २×२ ए.सी. कोचने . एकूण खर्च रु. ३८,०००/-.

५) **काश्मिर सहल :** सहल दि. १६ ते २७ मे २०२६. एकूण खर्च प्रत्येकी रु. ३७,०००/-. ( कृपया स. क्र. २ पहा.)

६) **मालवण, कोकण दर्शन सहल :** दि. २३ ते २६ मे २०२६. बस प्रवास २×२ ए.सी. कोचने एसी हॉटेल (चार जणांस एक रूम). एकूण खर्च प्रत्येकी रु. १४,०००/-.

७) **महाबळेश्वर, प्रतापगड, पाचगणी सहल :** दि. २४ ते २७ मे व २ ते ५ जुन २०२६. ए.सी. बस, ए.सी. हॉटेल. (४ जणांस एक रूम. प्रत्येकी खर्च रु. १३,५००/-.

**-: संपर्क :-**

जेम्स परेरा : ७०२०५४७३९६ / ८९७५७८४४७२
मॉरीस डिसिल्वा : ७७६८९९०५५५/९०११२९५५११
जसिन (दूता) रॉड्रीग्ज : ७५०७८१२५२३

## अल्फान्सो कॅटरर्स ॲण्ड टूर्स

१) **बाळ येशू नाशिक सहल :** दि. १४ व १५ फेब्रुवारी २०२६. डिलक्स लक्झरी ए.सी. बस, डिलक्स ए.सी. हॉटेल, व्हेज-नॉन व्हेज घरगुती जेवण, गेट टुगेदर पार्टी, पंचवटी, सोला वाईन केंद्र. एक दिवशीय खर्च प्रत्येकी रु. २,१००/- व दोन दिवशीय खर्च प्रत्येकी रु. ५,३००/-.

२) **मे महिन्यात खास शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी वेलंकनी माऊलीचा नोव्हेना :** दि. ६ मे ते १५ मे २६. बुकीग चालू आहे. विमान बुकीग लवकरच करावी लागणार.


# निसर्गरम्य बीद

-विजय रॉड्रीग्ज
उमराळे, कोलेरी



माझ्या लहानपणी निसर्ग-रम्य बीदीतून केलेला प्रवास आजही मनात ताजा आहे. पूर्वी एका गावातून दुसऱ्या गावात जाण्यासाठी अतिशय बारीक अशी पायवाट असे. माणसांच्या वावराने ती थोडी रुंद झाली आणि 'गराड' म्हणून ओळखली जाऊ लागली. नंतर त्या मार्गावरून बैलगाड्या जाऊ शकतील असा रस्ता तयार झाला आणि त्यालाच 'बीद' म्हणू लागले. बीद म्हणजे निसर्गाने माणसाच्या साहाय्याने साकारलेले एक नंदनवनच!

ह्या रस्त्याच्या दोन्ही बाजू निसर्गाच्या वैभवाने नटलेल्या घनदाट झाडे, वेली आणि झुडपे ह्यांची विलक्षण सरमिसळ. काही ठिकाणी जंगली झाडांची घनदाटी, तर काही ठिकाणी शेतकऱ्यांनी प्रेमाने लावलेली ताड, माड, सुपारी ह्यांची रांग बीदीची शोभा अधिकच वाढवत असे. ह्या बीदीच्या दोन्ही बाजूंनी निसर्गाने आपले संपूर्ण वैभव पसरवले होते. पांगारा, करंज, वड, पिंपळ, औदुंबर, नेवरा, गुलछडी, भेंड, बोखाडा, वेळू, बांबू, खजूर, भोकर, देवदार, आंबा, चिंच, जपाळ, खारुता, वाघाटी, कांबू तसेच अडुळसा, निर्गुंडी, रुई, धोत्रा, घाणेरी ह्यांसारखी औषधी झाडे बीदीकाठावर दिमाखात उभी असत. शेतकऱ्यांनी लावलेले टगर, जास्वंद, निवडुंग, मेंदीचे कडे नैर्सगिक सजीव कुंपणासारखे वाटत आणि गावकरी ह्या हिरव्या पट्ट्याला 'वय' म्हणत. झाडांच्या सावलीत वेलींनी आपली दुनिया उभारली होती. काही वेली झाडांना बिलगून वर चढलेल्या, तर काही जमिनीवर पसरलेल्या. ह्या वेलींवर उमललेल्या निळ्या अपराजिता (काजेळी), कडू तेंडली, गुंजेळी, वेलकंद, खाज कुहिरी, पिवळी बांडगूळ वेल वनस्पती, जांभळ्या ट्रंपेटसारख्या फुलांनी परिसर बहरत असे. काही वेलींवर गोडसर बेरीसारखी फळे लटकलेली, तर काहींवर खाकी रंगाचे वनफळे झुलत असत. उंच झाडांवरून खाली लोंबणाऱ्या वेलींमुळे बीद जणू हिरव्या झुंबरांनी सजलेली भासत असे. काही ठिकाणी मध्येच एखाद्या ठिकाणी झाडांच्या रांगेतून

> **बीद म्हणजे झाडेवेली, पशुपक्षी, प्राणी, सूक्ष्म जिवांसाठी निसर्गाने तयार केलेली घरकुल योजनाच!**

डोकावणारे केळफुलासहित केळीचे लोंगर दिसे. माडावर लोंबणारे नारळ, ताडावर आलेल्या हिरव्या काळसर ताडफळांचे गुच्छ ह्या सर्वांनी बीदीची शोभा अधिकच खुलवीत असे.

बीद म्हणजे पशुपक्षी, प्राणी, सूक्ष्म जिवांसाठी निसर्गाने तयार केलेली जशी काही घरकुल योजनाच! ह्या झाडांच्या सान्निध्यात पक्ष्यांचे एक रंगीबेरंगी जग वसलेले होते. उंचच उंच झाडांवर गिधाडांचे वास्तव्य जणू निसर्गाचे स्वच्छतादूतच असल्याचा भास देई, म्हणजे मेलेल्या जनावरांचे मांस खाऊन आपली उपजीविका करून परिसर स्वच्छ ठेवणारे निसर्गाने नेमलेले सफाई कामगार. चिमण्या, दयाळ, कोतवाल, पावश्या, हळद्या, पुक पुक्या तांबट पक्षी, कावळे, बगळे, साळुंकी, भारद्वाज, पोपट, बुलबुल, कोकीळा, निळा किंगफिशर, सुतार, सुगरण, टेलरबर्ड, ससाणा, तितर, घुबड, पाणकोंबडी, पाणकावळा, करकोच्या, मिल्के तसेच उलटे लटकलेले वटवागळे ह्या सर्व पक्ष्यांच्या किलबिलाटाने आणि चिवचिवाटाने संपूर्ण परिसर जिवंत करत असत. एखादी कोकीळ मधुर सूर काढी, तर सुतार झाडाच्या खोडावर ठकठक करून निसर्गाची ताललय निर्माण करी. कोळ्यांनी विणलेली असंख्य जाळी हलक्या वाऱ्याने झुलत झोके घेताना दिसत. फुलांवर फडफडणारी रंगीबेरंगी फुलपाखरे, गुणगुणणाऱ्या मधमाश्या आणि फुलाभोवती पिंगा घालणारे भुंगेरे ह्या सगळ्यांनी जणू निसर्गाचा उत्सव मांडल्यासारखा भासे. झाडांच्या पानांवर काळ्या व तांबड्या मुंग्या हिरवी पाने चिकटवून घरटी बांधत असत. झाडांच्या बुडालगत वाळवीची व लहान मुंग्यांची वारूळे दिसत. तर कधी झुपकेदार शेपटी हलवत झाडावरून उड्या मारणारी खारुताई, तसेच सरडे, पाली, कृमी कीटक, डास, माशा, गोगलगायी, किडे, सुरवंट काजवे, ह्यांच्या रहस्यमय मंद हालचाली नजरेत पडत.

बीदीच्या कडेला खेकडे, उंदीर, घूस ह्यांची असंख्य बिळे आणि त्यात आयत्या बिळावर नागोबा ह्या उक्तीप्रमाणे विषारी आणि बिनविषारी सापांचे वास्तव्य दिसे. कधीतरी सुकलेल्या झाडांतील बुडाच्या ढोलीत मुंगुसाची वस्ती पहावयास मिळे. ह्या सर्व जीवनचक्रात निसर्गाची अन्न साखळी जिवंत होती. झाडे, वेली, पक्षी, कृमी कीटक, सरपटणारे प्राणी आणि माणूस सर्व घटक एकमेकांशी जोडलेले. जणू निसर्गाने स्वत:चा सुंदर, जिवंत चित्रमय कॅनव्हासच ह्या बीदीवर रेखाटला होता.

कधी ह्या बीदीतून बैलगाडीत बसून प्रवास करणे म्हणजे आम्हां बालगोपाळांसाठी एक उत्सवच असे. एक अविस्मरणीय निसर्गानुभव आहे. बैलांच्या गळ्यातील घुंगरांचा मंजुळ नाद, झाडांच्या पानाफुलांचा सळसळणारा आवाज आणि थंडगार वाऱ्याची झुळूक ह्या सगळ्यांनी मन अगदी प्रसन्न होत असे. मध्येच बैलगाडी हाकणारे 'झाडाची फांदी आली वाका सगळे' अशी हाक देत. त्याक्षणी चालत्या बैलगाडीत वाकण्याचा जो अनुभव येई तो म्हणजे जणू निसर्गाला दिलेला आपोआप उमटलेला साष्टांग नमस्कारच म्हणावा लागेल. दोन्ही बाजूच्या दाट झाडांच्या गर्दीत ऊन-सावलीचा खेळ चालू असे आणि चालत्या बैलगाडीत पिकलेल्या पानाफुलांची मुक्त उधळण अंगावर पडत असे.

ह्या बीदीतून होणारा प्रवास म्हणजे निसर्गाच्या सान्निध्यात घालवलेला स्वर्गीय क्षण होता. त्या हिरवाईचा गंध, फुलांचा दरवळ, पक्ष्यांचा किलबिलाट आणि वाऱ्याचा सळसळता स्पर्श हे सगळे अनुभव आजही आठवले की मन निसर्गाच्या त्या कुशीत हरवून जाते.

मोबाईल : ९३ २२ ३७ २६ २२

●


## जमीन विकणे आहे

N A Plots..अकृषिक प्लॉट्स. निर्मळच्या निसर्गरम्य आमराई व ताडा-माडाच्या कुशीत, निरव शांतता व भरपूर मोकळी शुद्ध हवा. भूमिगत पाण्याचा भरपूर पुरवठा. बाजार, चर्च, मंदिर, शाळा, हॉस्पिटल अगदी हाकेच्या अंतरावर. २.४ गुंठ्याचे तीन स्वतंत्र फ्लॉट. (एकूण ७.२३ गुंठे). एकच मालक क्लियर टायटल. निर्मळ तलावाच्या दोन्ही बाजूने प्रवेश उपलब्ध. थेट १५ फूटांचा मोकळा रस्ता. आपल्या भविष्यासाठी योग्य गुंतवणूक. बिल्डर्स, गुंतवणूकदार व स्वप्नातील घर शोधणाऱ्यांसाठी ही सुवर्णसंधी.

**: संपर्क : अभिषेक रॉड्रिग्ज**

**: Via WhatsApp :**

**+91-954547925**



# ह्यावर विचार व्हावा...!

-विल्यम गोन्सालविस
उमराळे

“शिक्षण असूनही तुम्ही रस्त्यावर कचरा टाकत असाल आणि तो कचरा एखादी अशिक्षित व्यक्ती उचलत असेल, तर त्या शिक्षणाचा काय उपयोग...?” काही दिवसांपूर्वी समाजमाध्यमावर वरील वाक्य माझ्या वाचण्यात आले आणि मी विचार करू लागलो की खरंच किती मोठा भावार्थ दडलाय ह्या वाक्यात...! आपण शिक्षणामुळे मोठे होत आहोत; परंतु सुसंस्कृत झालो आहोत का? हा खरा प्रश्न आहे. केवळ पुस्तकी ज्ञानाने आपण मोठे होत नसतो; तर त्या ज्ञानाचा वापर आपण आपल्या रोजच्या जीवनात कशा प्रकारे करतो ते महत्त्वाचे असते.

प्रवासात असताना एकदा एक बाई वातानुकूलित लोकल गाडीत आपल्यासमोर असलेल्या जागेवर चप्पलसहित दोन्ही पाय ठेवून बसलेली मी पाहिली आणि मला ह्या बाईची कीव करावीशी वाटली. हे झाले एक प्रातिनिधिक उदाहरण. प्रवासात असताना सहप्रवाशांचा विचार न करता मोठ्या आवाजात आपल्या मोबाईलवर एखादी विडियो क्लिप पाहत असतात. बरेच प्रवासी बस किंवा लोकल गाडीचा प्रवास संपल्यावर आपले तिकीट रस्त्यावर टाकतात आणि परिसरातील घाण वाढवित असतात. विशेष म्हणजे स्वच्छता कर्मचाऱ्यांचे काम वाढवत असतात. मग कुठे गेले आपले शिक्षण...? सार्वजनिक प्रसाधनगृहात कचरापेटीचा डबा असतानाही वापरलेले टिश्यू पेपर्स (खिशात रुमाल असतानाही) कचरापेटीच्या बाहेर फेकत असतात. अशीच माणसं सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता होत नसल्याचा आरोप शासकीय यंत्रणेवर करीत असतात. हे




कितपत योग्य आहे, ह्यावर विचार व्हायला हवा. देशाचे जबाबदार नागरिक ह्या नात्याने परिसर स्वच्छ राखणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे.

पश्चिम रेल्वेच्या भुयारी मार्ग असलेल्या भिंतीवर शालेय तसेच विविध कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी सुंदर चित्रे रेखाटलेली होती. त्यामुळे हा मार्ग सुंदर नटलेला दिसत होता. रेल्वेच्या ह्या उपक्रमाचे प्रवाशांनी कौतुकही केले होते. परंतु अगदी थोड्याच दिवसांत हाच परिसर पान आणि तंबाखू खाऊन काही प्रवाशांनी त्या चित्रावर थुंकून सुंदर परिसर अतिशय गलिच्छ करून टाकला. काही दिवसांनी रेल्वेच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांनी

> **देशाचे जबाबदार नागरिक ह्या नात्याने परिसर स्वच्छ राखणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे.**

हा भाग स्वच्छ करण्याचा प्रयत्न केला. परंतु सुंदरतेचा काडीमात्र संबंध नसलेल्या तंबाखू आणि पान खाणाऱ्या महाशयांनी पुन्हा घाणेरडा करून टाकला. त्यामुळे रेल्वेची ही योजना यशस्वी होऊ शकली नाही. बऱ्याचदा रेल्वेची सार्वजनिक तसेच लांब पल्ल्याच्या गाड्यांची शौचालये स्वच्छ नसतात. परंतु प्रवाशांना नाईलाजाने अशा शौचालयाचा वापर करावा लागतो. काही वेळा प्रवासीही कारणीभूत असतात कारण बरेच प्रवासी वापर केल्यानंतर स्वच्छ करण्याची तसदी घेत नाही हा संस्काराचा परिणाम आहे.

१९७०-८०च्या दशकात आपल्याकडील वाडीमध्ये शेतात विविध प्रकारची कामे करण्यासाठी शेतकऱ्यांना मजुरांची गरज लागत असे. अशा वेळी ह्या वाडीमध्ये काम करण्यासाठी असलेले मजूर शेताच्या एका कोपऱ्यात झोपडी बांधत आणि ह्या झोपडीत आपल्या कुटुंबासह राहत असत. विशिष्ट नक्षीकाम करून शेणाने सारवलेली त्यांची झोपडी म्हणजे कल्पकतेचा एक उत्कृष्ट नमुना असे. अशिक्षित असूनही त्या झोपडीत असलेली कमालीची स्वच्छता आणि टापटीपपणा आपले लक्ष वेधून घेत असे.

काही दिवसांपूर्वी एका व्यक्तीने शिजवलेला भात प्लॅस्टिक पिशवीत आणून गायीला खावयास देताना मी पाहिले. तो भात गायीने खाल्ल्यानंतर प्लॅस्टिकची पिशवी वाऱ्याने उडून गेली. मुक्या प्राण्यांना खायला द्यावे; परंतु आपण ते कशा पद्धतीने द्यायला पाहिजे, ती पद्धत कधीकधी चुकीची असल्याने परिसर अस्वच्छ होत असतो, हे आपल्या लक्षात येत नाही हे दुर्दैवी आहे.

जगातील प्रगत देशांचा विचार केल्यास आपल्याला दिसून येईल की हे देश स्वच्छतेला कमालीचं प्राधान्य देत असतात. एखाद्या ठिकाणी कचरा टाकल्यास नागरिकांना जबर दंड भरावा लागतो. म्हणून अशा देशांतील नागरिक सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता पाळत असतात आणि गेल्या कित्येक वर्षांपासून हे त्यांच्या अंगवळणी पडल्याचे दिसून येते. काही वर्षांपूर्वी सिंगापूरला

पर्यटनासाठी गेलो असता एक नाला पाहिला. तो नाला इतका स्वच्छा होता की मला प्रश्न पडला  हा नाला आहे की नदी! नाहीतर आपल्याकडील नाल्यांची अवस्था इतकी गलिच्छ असते की अशा नाल्याजवळून जाताना नाक बंद करून जावे लागते. ह्यात भर म्हणून परिसरात राहणारे नागरिक (घराजवळ कचरापेटी असूनही) आपल्या घरातील कचरा एका प्लॅस्टिक पिशवीत जमा करून नाल्यात बिनदिक्कत टाकत असतात आणि नाला अजून गलिच्छ कसा करता येईल, ह्याची काळजी घेतात.

शहरांतील काही लोक इमारतींच्या खिडकीतून कचरा टाकत आपल्याच इमारतीचा परिसर गलिच्छ करीत असतात हे मी अनेक वेळा पाहिलेले आहे.

लहान मुलांना घरातूनच पालकांनी आणि ज्येष्ठ मंडळींनी तसेच शालेय जीवनात शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे धडे द्यायला हवेत. परंतु आपणच जीवनात स्वच्छतेचे पालन करीत नसल्यास लहान मुलांकडून काय अपेक्षा करावी? नाईलाजाने का असेना अशा वेळी ही मुलं आपलेच अनुकरण करीत असतात. म्हणून सांगावेसे वाटते की आज आपण सुशिक्षित झालो पण सुसंस्कृत झालो का? विचार करण्यासारखा मुद्दा आहे.

मोबाईल : 99 69 22 94 57

●

**प्रेमळ स्मरणार्थ**



**ख्रिस्तवासी मार्गारेट फ्रान्सिस कार्लोस**

कोकरमवाडी, दिघा, पापडी

जन्म : ०१/०५/१९५४; मृत्यू : १९/१२/२०२०

***''जे आत्म्याने लीन ते धन्य; कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे. जे अंत:करणाने शुद्ध ते धन्य; कारण ते देवाला पाहतील.''***

(मत्तय ५:३,८)

*हे प्रभू, आमच्या आईला तुझ्या स्वर्गीय नंदनवनात चिरंतन शांती लाभू दे हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**मुले, सून, मुलगी, जावई व नातवंडे**

**कविता**



## मी

मी आलो तेव्हाच माझं जाणं निश्चित होतं...
जन्म काय? आणि मृत्यू काय?
माझ्या अस्तित्वाची दोन टोकं
ह्या चौकटीत तेवढं जगायचे असतं!
संघर्ष प्रत्येकाचा असतो,
जगण्याची जिद्द हवी!
जोडणं... तुटणं...
पडणं... उठणं...
ओघाने आलंच...
स्वत:साठी आणि इतरांसाठी जगताना
मृत्यू आला तर मृत्यूशीही वैर नको
त्याच्या बरोबरसुद्धा हसतच जावं!

- **डॅरल परेरा,** गिरीज

## माणसांमध्ये राग

माणसांमध्ये राग येणे
हा स्वभाव धर्म आहे
त्यामुळे मैत्रीमध्ये कटूता येण्यापासून
सावध असावे.

ख्रिस्ताला देखील मंदिराबद्दल
राग आला होता
त्याने त्याचा खुलासा करून
शांत झाला होता.


मैत्रीमध्ये राग झाल्यास
समज करणे योग्य असते
अबोला धरून रागाचं समर्थन करून
मैत्री दुरावते.
मैत्रीमध्ये कटूता निर्माण झाल्यास
मैत्री तुटते
सर्वांसह चांगले संबंध असणे
स्तुत्यपणाचे असते.

सर्वांशी मैत्री ठेवणे
हे कुणाला शक्य नसते
तरी शेजारच्या कुटुंबीयांची
ओळख जरुरीची असते

- **रॉबर्ट फर्नांडिस,** तरखड


**बायबल डायरी २०२६**

**श्रद्धामय जीवनाचा दैनंदिन अनुभव**




**मूल्य रु. २००/-**

श्रद्धावंताच्या सोयीसाठी रोजचे बायबल वचन त्यावर सकस मनन-चिंतन तसेच वसई धर्मप्रांताच्या ख्रिस्तवासी धर्मगुरूंसाठी प्रार्थना करण्याकरिता नामावली

**: मर्यादित प्रति उपलब्ध :**

**जीवन दर्शन केंद्र**

गिरीज, वसई ४०१ २०१

**भ्रमण ध्वनी :**

**97 02 09 02 32**

# स्मरणीय व्यक्ती किंवा घटना

## वादळवाऱ्यातून पुन्हा उभा राहिला युवाजल्लोष



४ मे २०२४ची ती एक रम्य संध्याकाळ. त्यात आज एक कलात्मक नजराणा पाहायला मिळणार ह्याची-देखील गोड अपेक्षा होती. कारण आमच्या पाली धर्मग्रामामध्ये युवाजल्लोषचे सांस्कृतिक कार्यक्रम साजरे होत होते. युवकांद्वारे सादर केलेले नृत्य, नाट्य, एकांकिका वगैरेंच्या अभिव्यक्तीचा अनुभव घेण्यासाठी आम्ही चर्चच्या प्रांगणात स्थानापन्न झालो. एक एकांकिका पाहिली आणि एका सुंदर अनुभूतीचा अनुभव घेतला.

दुसरी एकांकिका चालू झाली. मे महिन्याचा उन्हाळा असूनदेखील हवा थंड आणि आल्हाददायक होती. पण त्या सुंदर हवेच्या वातावरणामागे कुठला राक्षस लपून बसला  होता ह्याची आम्हाला कल्पना नव्हती. थोड्या वेळाने वाऱ्याचा वेग वाढला. आजूबाजूची झाडेपाने जरुरीपेक्षा अधिक डोलू लागली आणि काही मिनिटांतच कधी अनुभवले नव्हते; अशा आवेशात घोंगावणाऱ्या वाऱ्यामुळे अचानक आमच्या समोरच्या रिकामी असलेल्या प्लॅस्टिकच्या खुर्च्या अक्षरश: उडून बाजूला जाऊन पडल्या. तशा परिस्थितीतही 'शो मस्ट गो ऑन' ह्या भावनेखातर धैर्याने आपला प्रयोग चालू ठेवणाऱ्या युवकांच्या चमूला, शेवटी स्टेजवरून पडदे आणि प्रॉप्स कोलमडून पडल्यावर आपला कार्यक्रम बंद करावा लागला आणि मग सुरू झाला जोराचा वादळी पाऊस. ह्या वेळेला प्रेक्षकांतही भीतीचे वातावरण पसरले.

बंद असलेले चर्चचे दरवाजे उघडण्यात आले आणि सर्व लोकांना चर्चमध्ये आसरा घेण्यास माईकवरून संबोधित करण्यात आले. ह्या सर्व गदारोळात वीज गायब झाली नव्हती ही परमेश्वराची कृपाच म्हणायची! जगात अनेक ठिकाणी त्सुनामी आल्यावर लोक सायक्लोन शेल्टरमध्ये आसरा घ्यायचे हे फक्त वृत्तपत्रांत आणि टीव्हीवर पाहिले होते; पण आज प्रत्यक्षात तशा परिस्थितीत आम्ही सापडलो होतो. ह्या सर्व घटनेत आपत्ती व्यवस्थापनाची जबाबदारी युवकांनी छान निभावली त्याबद्दल त्यांचे अभिनंदन! कौतुकाची दुसरी एक बाब म्हणजे, जसा फिनिक्स पक्षी राखेतून उठतो तशाच जोशाने युवकांनी, थोड्या दिवसांनी आपला कोलडमलेला डोलारा जोमाने पुन्हा उभा केला आणि आधी योजल्याप्रमाणे संपूर्ण कार्यक्रम घडवून आणला.

**-दीपक मच्याडो,** पाली

## मागील २०२५मधील स्मरणीय घटना

आपल्या महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व असलेले भाई पु. ल. देशपांडे ह्यांची २५वी पुण्यतिथी १२जून २०२५ रोजी साजरी होत असताना त्याच घटकेला अहमदाबाद येथून लंडन येथे जात असलेले बोईंग ७८७ विमान २४१ प्रवासी आणि कर्मचारी ह्यांचा कैक सेकंदांमध्ये होत्याचे नव्हते झाले. ही एक हृदयाला भिडणारी दु:खद घटना डोळ्यांसमोर येते. प्रत्येकांची स्वप्ने धुळीला मिळाली. जवळच असलेल्या मेडिकल कॉलेजवर हे विमान कोसळल्याने मृतात वाढ झाली.

ह्याचा एक चमत्कार म्हणजे एकमेव प्रवासी विश्वास कुमार रमेश ह्यांना मिळालेले जीवदान. ह्या व्यक्तीने ज्याप्रकारे तिथून उडी घेतली किंवा आपला जीव वाचवण्याची संधी साधली हा मोठा चमत्कारच म्हणावा लागेल. असे अपघात क्षणोक्षणी पाहयला मिळतात. परंतु ह्या अपघाताचे मूळ कारण ज्यामध्ये आहे ते म्हणजे हलगर्जीपणा. कारण ज्या अवधीत विमान कोसळले ते पाहता माणसाचे आयुष्य किती काडीमोल झालेले आहे, हे पाहवयास मिळते व प्रत्येक भारतीय नागरिकांनी हाच धडा घेतला पाहिजे की शासनावर व प्रशासनावर अवलंबून आपण किती काळ राहू शकतो, ह्याची पडताळणी केली पाहिजे.

**- जेम्स लोपीस,** पाली

## संत कार्लो आकुतिसचे रेलिक आणि मी

७ सप्टेंबर २०२५रोजी कार्लो आकुतिस ह्या १५व्या वर्षी मरण पावलेल्या युवकाला संत घोषित करण्यात आले. पोप लिओ ह्यांनी संत पीटर कथिड्रलच्या भव्य प्रांगणात हा सोहळा साजरा केला. नव्या युगाचा संत कार्लो आकुतिस ह्यांचे पवित्र अवशेष आपल्या चर्चमध्ये येणार असे समजले. हातातील कामे बाजूला ठेवून जायचे ठरवले.

सोमवार संध्याकाळ. आठची वेळ. चर्चमध्ये मंद दिवे, समोर सुंदर फुलांची सजावट होती. बाजूला संत कार्लोचे अवशेष व त्याची हसरी प्रतिमा. लोक येत होते, वंदन करत होते. मीदेखील त्याच्यासमोर जाऊन वंदन केले. डोळे मिटले आणि प्रार्थना करण्यास सुरुवात केली. जाणवले, डोळ्यांत पाणी जमा

होतंय. घशात आवंढा आलाय. असं का होतंय, समजत नव्हतं. कसेबसे रुमालाने डोळे पुसले, हळूच आजूबाजूला पाहिले. कितीतरी लोक रडत होते. तोंडातल्या तोंडात काही पुटपुटत होते. काय आहे हे? दु:ख, वेदना, दिखावा? नाही... ही आहे मुक्ती. दु:खातून. कित्येक जण आपले जिवलग अकाली गमावतात. जाणारा जातो, आपण मात्र जगतोय, ही खोल जखम कधी भरून येत नाही. वरवर पाहता सारं काही आलबेल आहे असं दिसतं. गेलेल्या जिवाची सय जाता जात नाही. ती अंतापर्यंत सोबत करणारी असते.

''एक छोटासा लम्हा है । जो खत्म नही होता ।
मैं लाख जलाता हूँ । ये भस्म नही होता ।।''

कार्लोच्या अवशेषांसमोर उभे असताना, जाणवले कोणीतरी आपल्या जखमेवर फुंकर घालत आहे. कार्लोही गेला होता, आपले सगे-सोयरे सोडून. आज परमेश्वराने त्याला आपल्या बाजूला गौरवाचं स्थान दिलंय. खरंच आपला आवडता माणूसदेखील परमेश्वराकडे आता सुखरूप आहे. मरिया मातेच्या समीप आहे. बहुतेक तिथे असणाऱ्या साऱ्यांनाच हा अनुभव आला होता. मृत्यू, दु:ख कितीही वास्तव असेल तरीही त्यातून शेवटी उरणारा विश्वासच आहे

**- अनिता ग्रेगरी डिसा,** माणिकपूर

## श्रद्धेची शिदोरी

प्रथमच खिस्तशरीर स्वीकारलेल्या मुलांचा आनंद उल्लेखनीय होता. त्यांची हृदये नवतेजाने भरून आली होती. इतके दिवस त्यांना प्रार्थनेच्या क्लासमध्ये शिकवताना त्यांची निरागसता, त्यांचे प्रश्न आणि त्यांचा उत्साह पाहून माझे मन आनंदाने भरून येत होते. चर्चमध्ये सर्व मुले सफेद पोशाखात देवदूतांसारखी दिसत होती. वेदीसमोर उभी असताना त्यांच्या डोळ्यांत थोडीशी भीती, पण त्याहून जास्त आनंद आणि पवित्र क्षणाची जाणीव दिसत होती. त्यांनी येशूला प्रथमच आपल्या हृदयात स्वीकारताना त्यांच्या चेहऱ्यावरचे तेज पाहून हृदय आनंदाने भरून आले. शिक्षिका म्हणून मला वाटत होते की आज त्यांनी घेतलेले ज्ञान फक्त पुस्तकातले नाही; तर त्यांच्या आयुष्यातील एक आध्यात्मिक पाऊल आहे. त्यांनी प्रेम, कृतज्ञता आणि श्रद्धेचे महत्त्व अनुभवांतून शिकले. ही श्रद्धेची शिदोरी आयुष्यभरासाठी त्यांनी जपून ठेवावी व त्यांची आध्यात्मिक वाढ व्हावी. चर्चमधील आपला सहभाग अधिकाधिक सक्रिय करावा.

**- रूबी रॉबर्ट ग्रेशियस,** रमेदी

Saint Pope Pius - X Education Society's
St. Pierre Academy
PAPDY, VASAI (WEST) - 401 201.
Contact : 9370462710 / 8799985150 Email : stpierreacademy@gmail.com
COACHING CLASSES
For STD XI-XII
SCIENCE & COMMERCE
- BATCH SIZE OF 25 ONLY
- ALL SUBJECTS
- INDIVIDUAL ATTENTION
- INTEGRATED ADMISSION AVAILABLE
- EXPERIENCED STAFF
ADMISSIONS OPEN 2026-2027
For STD VIII-X
CBSE/ICSE/STATE BOARD
- BATCH SIZE OF 25 ONLY
- INDIVIDUAL ATTENTION
- RESULT ORIENTED
- EXPERIENTIAL LEARNING
- EXPERIENCED STAFF
AV Classroom
Half Yearly Admissions Accepted
Early Bird Discount Available
DIRECTOR:- MRS FABINA COLACO
CONTACT # 93704 62710 ADD : PAPDY, VASAI(W) 401201.

# आयुष्याचा महामंत्र


लेखक व कवी सायमन मार्टिन लिखित 'आयुष्याचा महामंत्र' पुस्तक हाती आलं. एका दमात वाचायचं ठरवलं, वाचलंही. पण जमलं नाही, पचलंही नाही आणि उमगलंही नाही. कारण एक एक मंत्र म्हणजे ओतप्रोत भरलेला जीवनाचा खजिना. Aphorism, Sutra, a condensed matter. मग परत एक-एक आशय वाचायला सुरुवात केली.

'आयुष्याचा महामंत्र' हे पुस्तक कांद्यासारखे आहे. कांद्याची एकेक पाकळी काढताना त्याच्यामध्ये पारदर्शक पापुद्रा असतो, तसेच प्रत्येक अध्याय वाचताना अलगद मानवी मनाचा व हृदयाचा ठाव घेणारा, हळुवारपणे साचलेला पापुद्राच वाटतो आणि कळत-नकळत माझा स्वानुभावच लेखकाने रेखाटला आहे असे वाटते. प्रत्येक वाक्य मनाला व हृदयाला आरपार छेदते. प्रत्येक मंत्र मनाला, जीवनाला जगण्याचा मंत्र दिल्याशिवाय पुढे सरकत नाही.

अनादी, अनंत तेच सत्य! तेच चिरकाळ टिकणारं. परमेश्वराशिवाय जगात दुसरं सत्य नाही, हे अगदी साध्यासोप्या शब्दात लेखक वाचकांना गहन तत्त्वज्ञान पाजतात.

पुस्तक वाचताना कळत-नकळत काळजात असलेल्या दु:खावर फुंकर घातली जाते. हृदयात एक वात पेटली जाते. मनाच्या आणि हृदयाच्या सांदिकोपऱ्यात पसरलेला अंधार दूर करण्यासाठी, घाबरलेल्या आणि बिथरलेल्या मनाला उभारी देऊन जाते. सध्या जीवनशैली बदललेली आहे. बंद दारात कसली वाणी ऐकायला येत नाही. कारण मानवाच्या हृदयाची कवाडं बंद झाली आहेत.

प्रेमच साऱ्या जीवनाचा सार आहे आणि प्रभू ख्रिस्त प्रेम आहे हे अबाधित सत्य लेखक अधोरेखित करतात. जीवनात प्रेम नसेल तर सारं व्यर्थ आहे, हे संत पौलाचे ब्रीदवाक्य सहज समजावून सांगतात. प्रेमाची भाषा अवगत असली तर धर्म, जात, पंथ, देश ही सारी बंधनं गळून पडतात. धर्म जाती-पातीच्या विळख्यात माणसाने स्वत:साठी एक तुरुंगच बांधला आहे. त्याला छेद देऊन स्वतंत्र होण्यासाठी क्षमेचे वरदान नितांत गरजेचे आहे हे ते स्पष्टपणे रेखाटतात. पुस्तकाचे शब्द धारदार आहेत.




स्वप्नं दिवसागणिक पाहण्यासाठी आयुष्याचा महामंत्र खुणावतो. आपल्या जगण्याने दुसऱ्याच्या जगण्याला अर्थ प्राप्त व्हावा असे जीवन जगायला हवे; कारण जीवन परमेश्वराचे अनमोल दान आहे. विधात्याने आपणांस त्याच्या प्रतिमेप्रमाणे बनवले आहे. म्हणून ह्या जगण्यावर आणि जीवनावर प्रेम करावे व जीवन सार्थकी लावावे असे सूचित करतात. Joy ह्या तीन अक्षरात -

J - म्हणजे प्रथम ख्रिस्त : Jesus

O - म्हणजे दुसरा अदर्स : Others

Y - म्हणजे शेवटी आपण : Yourself

हा मंत्र गिरवला तर आनंदाच्या डोही आनंद तरंग...

मुंग्याच्या वारुळात एक मुंगी दुसऱ्या मुंगीला भेटल्याशिवाय पुढे जात नाही. त्यांचं काय हितगुज होतं हे मानवी मनाला समजत नाही. पण वारुळ माणसाला जगायचं कसं हे शिकवतं. आयुष्याचा महामंत्र म्हणजे मुंग्याचं वारुळच!

धकाधकीच्या व धावपळीच्या जगात माणसाला माणूसच भेटत नाही. कारण माणसाचा वेळ मोबाईलनी हिरावून घेतला आहे. माणूस माणसापासून दुरावलेला आहे. मी आणि माझा संसार इतकंच. एकत्र कुटुंबपद्धती लोप पावली आहे. बंद दाराआड माणूस जणू गजाआड बंदीस्त झाला आहे. अशा वेळी जीवनाचा महामंत्र सांगतो, आपण स्वत:कडेच न पाहता इतरांचा विचार करावा, मग पहा सुख कसं अंगणात खेळतंय. 'दिल्यानं दान वाढते', मग ती धनदौलत असो, वेळ असो अथवा आपली गुणवत्ता. संसारातून परमार्थाकडे कशी वाटचाल करायची असे डोळ्यात झणझणीत अंजन घालणारं पुस्तक म्हणजे 'आयुष्याचा महामंत्र.' भारतीय संस्कृतीत ऋषीमुनींना गवसलेलं सत्य ते एका छोट्याशा वाक्यात वर्णन करतात. त्याला सूत्र म्हणतात. हे जीवनाचं सत्य उलगडताना वर्षानुवर्षे त्यावर भाष्य लिहिलं जातं.

बायबलमध्ये ख्रिस्ताने रूपक, दाखले देऊन जीवनाचं सत्य समाजापुढे मांडलं. ख्रिस्ताची महावाक्ये समजताना आयुष्य अपुरं पडतं. उदाहरणार्थ - 'मार्ग, सत्य आणि जीवन मीच आहे' हे समजण्यासाठी आजतागायत अनेक लेखक, पंडित आणि कवींनी त्यावर भाष्य केलं आहे आणि करत आहेत.

ह्या पुस्तकाच्या प्रत्येक वाक्यात गहनता भरली आहे. जीवनाचा साठा, वर्षभराच्या तपासाठी उपयोगी पुस्तक आहे.

लेखकाच्या हळुवार मनातून शब्दात रेखाटलेलं एक कॅन्व्हास आहे. आकाशात इंद्रधनुष्याचे जसे रंग उधळतात किंवा रांगोळीत रंग भरावेत तसा 'आयुष्याचा महामंत्र' मानवी जीवनात रंग भरत आहे.

लेखकाला समाजाचं भान आहे. ते ईश्वरनिष्ठ आहेत. अन्यायाची चीड, जीवन जगण्याचा अर्थ नसानसात भरलेला आहे. जीवन कसं जगायचं ह्याचा उलगडा प्रत्येक शब्दातून पाझरतो. समाजाचं विदारक वास्तव, दु:ख लेखणीतून मांडलेलं असलं तरी ते निराशावादी नाहीत; तर ख्रिस्तावर भिस्त ठेवून अंधारात वात लावत, आशावादी दृष्टिकोन पुढे ठेवून, जीवन जगण्याची प्रेरणा देतात.

आपण जीवनात प्रवासी आहोत, ख्रिस्तासमवेत आशावाद बाळगून आपणांस चालायचं आहे असं दर्शवितात. म्हणूनच 'आयुष्याचा महामंत्र' आपणांसाठी दीपस्तंभ!

**- फा. (डॉ.) मायकल रोझारिओ**

**आयुष्याचा महामंत्र**

लेखक : सायमन मार्टिन

प्रकाशक : इंडस सोर्स बुक्स

मूल्य रु. २९९/-

विशाल विश्वात

- झेविअर डिमेलो

## पोप लिओ ह्यांचा तुर्कीये-लेबाननचा प्रेषितीय दौरा

**व्हॅटिकन :** पोप लिओ ह्यांची पोपपदी निवड झाल्यानंतर आपल्या पहिल्या प्रेषितीय परदेश दौऱ्यासाठी त्यांनी तुर्कीये आणि लेबानन ह्या दोन देशांची निवड केली. २७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर ह्या दरम्यान त्यांनी हा दौरा केला. तुर्कीयेमध्ये नायसियास्थित सर्वधर्मीय एकता परिषदेच्या १७००व्या वर्धापन दिनाच्या प्रार्थनेमध्ये पोप लिओ सहभागी झाले. त्यांनी ऑर्थोडॉक्स ख्रिस्ती लोकांचे आध्यात्मिक नेते पॅट्रियार्क बार्थोलोमे ह्यांच्याबरोबर चर्चा केली आणि ख्रिस्ती ऐक्यावरील जाहिरनाम्यावर सही केली. तुर्कीयेचे अध्यक्ष रिसेप एर्दोगन ह्यांची सदिच्छा भेट, सुलतान अहमद मशिदीला भेट, धार्मिक नेत्यांबरोबर चर्चा, सार्वजनिक मिस्सा हे त्यांचे इतर कार्यक्रम होते. पोप लिओ ह्यांनी २०२०मध्ये स्फोट झालेल्या बैरुट बंदराला भेट दिली आणि मृत लोकांप्रति दु:ख संवेदना व्यक्त केल्या. धर्मगुरू आणि तरुणांबरोबर वार्तालाप, आंतरधर्मीय नेत्यांबरोबर चर्चा, दिव्यांगांच्या हॉस्पिटलला भेट, दीड लाख भाविकांच्या उपस्थितीत मिस्सा अशा कार्यक्रमांत पोपनी सहभाग घेतला. मध्यपूर्वेत शांतता निर्माण व्हावी, वैरभावना नाहीशी व्हावी, संवाद व्हावा असे आवाहन पोपनी केले.

## दोन कॅथलिक धर्मगुरूंची तुरुंगातून सुटका

**मिन्स्क (बेलारूस) :** व्हॅटिकन प्रशासनाबरोबर झालेल्या चर्चेनंतर येथील तुरुंगात असलेल्या दोन कॅथलिक धर्मगुरूंची सुटका करण्यात आली. पोप महोदयांचे विशेष दूत कार्डिनल क्लॉडिओ गुलेरॉट्टी ह्यांच्या बेलारूस भेटीनंतर आणि अध्यक्ष ट्रम्प ह्यांच्या मध्यस्थीनंतर धर्मगुरूंना मुक्त करण्यात आले. तथाकथित राजकीय आरोपाखाली ह्या धर्मगुरूंना तुरुंगवासाची शिक्षा करण्यात आली होती.

## फातिमा मातेच्या उंच पुतळ्याचे अनावरण

**क्रॅटो (ब्राझील) :** फातिमा मातेचा जगातील सर्वाधिक उंच पुतळा येथे उभारला असून हजारो भाविकांच्या उपस्थितीत त्याचे अनावरण करण्यात आले. सुमारे पंधरा मजले इमारतीएवढा हा पुतळा उंच असून तो तयार करण्यासाठी एक वर्ष पाच महिन्यांचा कालावधी लागला. भाविकांच्या सोयीसाठी पुतळ्याच्या बाजूला आश्रयस्थान आहे. पुतळ्याचे अनावरण क्रॅटोचे बिशप मॅग्नस लोपीस ह्यांनी केले.

## 'कारितास'चे असेही एक सेवाकार्य

**सुंदरबन (बांगला देश) :** रशिदा बेगम हिला अजूनही त्या दिवसाची आठवण आहे. तिचा पती खेकडे पकडायला खाडीवर गेला असताना वाघ त्याला घेऊन जंगलात पळाला. ती विधवा झाली. 'कारितास' बांगला देश ह्या स्वयंसेवी कॅथलिक संस्थेने तिला आर्थिक मदत दिली. ती आता सावरली आहे. असाच प्रकार अमेरून बेगम हिच्या बाबतीतही घडला. बांगला देशातील तीन जिल्ह्यांत पसरलेले सुंदरबन जंगल सुंदर असले तरी धोकादायक आहे. नरभक्षक वाघांनी येथील सुमारे तीन हजार स्त्रियांना विधवा केले आहे. कॅथलिक चर्च आणि कारितास सुंदरबनमधील लोकांचे शिक्षण व गरिबी निर्मूलनासाठी सक्रिय आहे.

## त्या तिथे फ्लोरेस बेटावर...

**फ्लोरेस (इंडोनेशिया) :** इंडोनेशियाच्या सुमारे सात हजार बेटांपैकी फ्लोरेस हे एक बेट. ते बालीपासून ५०० मैलांवर आहे. ह्या बेटावरील २० लाख लोकसंख्येपैकी ८०% लोक कॅथलिक आहेत. आजघडीला फ्लोरेंसमधून सुमारे १५०० धर्मगुरू झाले असून त्यापैकी ५००धर्मगुरू जगातील ७० देशांमध्ये सेवाकार्य करीत आहेत. 'सोसायटी ऑफ डिव्हाईन वर्ल्ड'सारख्या पाच सेमिनरी इथे धर्मगुरू घडविण्यासाठी विद्यार्थ्यांची शालेय पातळीपासून जडणघडण करतात.

## अमेरिकेत येणार बायबलची सुधारित आवृत्ती

**वॉशिंग्टन, डी.सी. :** 'द कॅथलिक अमेरिकन बायबल' ह्या नावाची बायबलची नवीन आवृत्ती २०२७मध्ये प्रकाशित होणार आहे. अमेरिकन कॅथलिक बिशपांनी त्यासंबंधीचा निर्णय २०२४ मध्ये घेतला होता. सदर बायबल २०११साली प्रकाशित झालेल्या बायबलची जागा घेईल, जे वीस वर्षांच्या सल्लामसलतीनंतर प्रकाशित झाले होते. त्याच्याही अगोदर १९७७मध्ये बायबल प्रकाशित झाले होते. त्यासाठी अमेरिकेतील ५१बायबल तज्ज्ञांनी १९४४ ते १९७० ह्या काळात अभ्यासपूर्ण योगदान दिले होते.

## रस्त्यावरचे धर्मगुरू होणार संत?

**वॉशिंग्टन, डी.सी :** फा. रिचर्ड थॉमस हे जेज्वीट धर्मगुरू अमेरिका आणि मेक्सिकोच्या सीमारेषेवरील रस्त्यावर काम करायचे, म्हणून त्यांना अमेरिकेत रस्त्यावरचे धर्मगुरू म्हणतात. सीमा रेषेवरील गरीब लोकांच्या सेवेसाठी त्यांनी धर्मदाय संस्था स्थापन केल्या आहेत. त्यांनी सुरू केलेले सेवाकार्य त्यांच्या मृत्यूनंतरही सुरू आहे. अमेरिकन कॅथलिक बिशपांनी त्यांचे नाव संतपदासाठी व्हॅटिकनकडे पाठविण्यास सर्वानुमते मान्यता दिली आहे.

## आहेत कोट्यधीश तरीही...

**मनिला (फिलिपिन्स) :** अर्नेटो एस्केलर हे आहेत फिलिपिन्समधील प्रख्यात उद्योगपती. दरवर्षी ते तीन हजार कैद्यांना जेऊ घालतात, त्यांच्या हाताला काम देतात. मिशनरीज ऑफ चॅरिटी, कनोशियन सिस्टर्स, सेमिनरीज कॉन्व्हेन्टस, चर्च आणि धार्मिक समुदायांना ते मदतीचा हात देत असतात. ते मानवताप्रेमी आहेत आणि मरियाभक्त देखील. ते आपल्या कर्मचाऱ्यांची आध्यात्मिक काळजी घेतात. आपल्या कंपनीमध्ये त्यांनी सेंट जोसेफचे प्रार्थनालय बांधले आहे.

## ...म्हणून गाणे गा, गाणे ऐका!

**टोरांटो (कॅनडा) :** टोरांटो विद्यापीठातील प्राध्यापिका कॅथलिन गॅन सेन्ट फ्रान्सिस डि सेल्समध्ये भाषण करताना म्हणाल्या, ''आरोग्य दायी जीवनशैलीसाठी संगीत आवश्यक आहे, ज्यामुळे मानसिक आरोग्य अबाधित राहते. चर्चमधील पवित्र भक्तिमय गीतांचाही चांगला परिणाम दिसून येतो. अल्झायमरसारख्या आजारांना संगीतामुळे प्रतिबंध होतो. स्थूलता, उच्च रक्तदाब, धूम्रपान, बहिरेपणा, मेंदूची इजा, एकटेपणा ह्यावरही संगीत फायदेशीर आहे. म्हणून गाणे गा, गाणे ऐका!''

## सीमेवरील सुरक्षा मानवतावादी - जे.डी.व्हान्स

**वॉशिंग्टन, डी.सी. :** अमेरिकन कॅथलिक बिशपांनी सरसकट मोठ्या प्रमाणावर परदेशी नागरिकांच्या हद्दपारीला विरोध करून त्यांना माननीय वागणूक मिळावी, असा संदेश जारी केला होता. पोप लिओ ह्यांनी ह्याला सहमती दर्शविल्याच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे उपाध्यक्ष जे.डी.व्हान्स म्हणाले की सीमेवरील सुरक्षा मानवतावादी आणि अमेरिकन नागरिकांच्या भलेपणासाठी आहे. व्हान्स ह्यांनी स्थलांतरितांना तुरुंगात मिळणाऱ्या अमानवीय वागणुकीबद्दल भाष्य करणे टाळले.

धार्मिक

## फातिमा मातेची गृहभेट

**नानभाट :** १ ऑक्टोबर रोजी सायंकाळी नानभाटच्या चर्चमधून जवळजवळ २३ फातिमा मातेच्या इमेजी गावपरिवारातील प्रत्येक घरात भेटीसाठी निघाल्या. प्रत्येक गावपरिवारातील कुटुंबगटात रोझरीच्या प्रार्थनेचे स्वर घुमू लागले. एकाच वेळी २३ ठिकाणी होणारी पवित्र मरियेची रोझरी... संपूर्ण नानभाटमधील ५०० ते ६०० भाविक एकाच वेळी आपापल्या गावपरिवारात प्रार्थना करीत एकत्र बसू लागले. मोबाईलची जागा प्रार्थनेच्या पुस्तकाने आणि बायबलने घेतली. आपापसातील वादामुळे एकमेकांच्या घरची पायरी न चढणारे प्रार्थनेसाठी एकत्र आले. सलोखा वाढला. जवळजवळ एक महिनाभर चाललेल्या ह्या आध्यात्मिक उपक्रमाचा शेवट एक नोव्हेंबरला सर्व संतांच्या सणाच्या दिवशी पवित्र मिस्साबलिदाने झाला.

फातिमा मातेच्या गृहभेटीचा एक स्तुत्य उपक्रम नानभाट चर्चचे प्रमुख धर्मगुरू फा. अंब्रोज आणि साहाय्यक धर्मगुरू फा. लिओ ह्यांनी राबविला. ह्या अनुभवामुळे आमच्या मुखातून शब्द उमटले, ''माझ्या प्रभूच्या मातेने माझ्या घरी यावे हा मान मला कोठून?'' (लूक १:४३)

**- पाळकीय सभासद,** नानभाट

## दृढीकरण स्वीकारलेल्या मुलांचा स्नेहमेळावा

**भुईगाव :** रविवार ७ डिसेंबर रोजी पवित्र कुटुंबाचे चर्च, भुईगाव येथे जून २०२५ मध्ये दृढीकरण साक्रामेंत स्वीकारलेल्या मुलांसाठी जीवन ज्योतीतर्फे स्नेहमेळावा आयोजित केला होता. निर्मळ डिनरीतील ९३ युवकांनी सहभाग घेतला. मेळाव्यासाठी



वसई धर्मप्रांताचे मेंढपाळ बिशप थॉमस डिसोजा, सर्व धर्मगुरू, दृढीकरण शिक्षक तसेच जीवन ज्योतीचे संचालक फा. निलेश तुस्कानो उपस्थित होते.

भुईगाव धर्मग्रामातील युवकांनी प्रार्थना केली. फा. निलेश ह्यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. निर्मळ डिनरीचे डीन फा. जॉन निग्रेल ह्यांनी आजच्या युवकांपुढील आव्हाने, वाढत्या आत्महत्या, नकार पचविण्याची भीती अशा अनेक विषयांवर विशेष ऊहापोह केला. त्यानंतर सेंट जॉन पॉल चर्च, नालासोपारा येथील डायना टिचर ह्यांनी ओळख परेड घेतली. 'पवित्र आत्म्याची बारा फळे' ह्या विषयावर आधारित गटचर्चा घेण्यात आली. दृढीकरण साक्रामेंत स्वीकारल्यामुळे युवकांच्या जीवनात झालेले बदल ह्या विषयावर तीन मुलांनी साक्ष दिली. त्यानंतर बिशप थॉमस डिसोजा ह्यांनी सेंट फ्रान्सिस झेवियर आणि सेंट इग्नेशियस ऑफ लोयोला ह्यांची उदाहरणे देऊन त्यांनी आपल्या जीवनात बदल करून आपण येशूच्या जवळ कसे गेलो, हे समर्पकरीत्या मांडले. युवकांशी संवाद साधून त्यांच्या शंकांचे निरसन केले. ह्यावेळी भुईगाव धर्मग्रामाचे प्रमुख धर्मगुरू फा. विजय लोपीस ह्यांनी अतिशय उत्तम व्यवस्था केली होती. सुनिता परेरा ह्यांनी आभार मानले.

**- सुनिता बर्नर्ड परेरा,** गास

साहित्यिक

## फा. फ्रान्सिस दिब्रिटो ह्यांचा स्मृतिजागर


**नंदाखाल :** वसईचे सुपुत्र आणि महाराष्ट्रातील ख्यातनाम साहित्यिक ख्रिस्तवासी फादर फ्रान्सिस दिब्रिटो ह्यांचा जन्मदिन ४ डिसेंबर रोजी त्यांच्या कुटुंबीयांनी 'स्मृतिजागर' म्हणून साजरा केला. ह्या प्रसंगी छगन नाईक, फा. ॲण्ड्र्यू रॉड्रिग्ज, फा. रेमंड रुमाव, फ्रान्सिस डिमेलो, रेमंड मच्याडो, सायमन मार्टिन, अंतोन परेरा, जॉन गोन्सालविस ह्यांनी फादर दिब्रिटो ह्यांच्या स्मृतींना उजाळा दिला. तसेच साहित्यिक योगदानाबद्दल सायमन मार्टिन, लेखक अँथनी परेरा आणि जॉन गोन्सालविस ह्यांचा त्यांच्या कुटुंबीयांच्या वतीने शाल, श्रीफळ व मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अलका रॉड्रिग्ज ह्यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन प्रबोधन प्रतिष्ठान आणि फा. दिब्रिटो कुटुंबीय ह्यांनी केले होते.

## 'सुवार्ता' वितरक आणि परिवार स्नेहमेळावा

**गिरीज :** रविवार ३० नोव्हेंबर रोजी 'सुवार्ता' वितरक आणि परिवार स्नेहमेळावा संपन्न झाला. ह्यावेळी संपादक फा. (डॉ.) जोएल डिकुना व उपसंपादक फा. रॉबर्ट गोन्साल्वीस उपस्थित होते. २०० सभासदांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. वितरक कार्मेलिना लोपीस ह्यांच्या प्रार्थनेने मेळाव्यास प्रारंभ झाला. प्रास्ताविक करताना फा. जोएल डिकुना म्हणाले की सुवार्ता ७०वर्षांच्या वाटचालीत वितरकांचा वाटा सिंहाचा आहे. ७० वर्षांच्या निमित्ताने आज आम्ही वितरकांना संस्मरणीय भेट देत आहोत.

ह्याप्रसंगी सुवार्ता वितरक अंतोन डिमेलो, लुईस डायस, राहुल परेरा, फ्रान्सिस रॉड्रिग्ज, जॉन्सन डिमोन्टी, रेमी कोयलो, लुकस परेरा, मेरी लुजबो, मायकल वाझ, वेलेंटाईन रोझारियो, आयरिन डिमेलो, सायमन नुनीस, जॉन कोलासो ह्यांनी अनुभव कथन केले. उपसंपादक फा. रॉबर्ट गोन्साल्वीस म्हणाले की पूर्वी आपण १२ हजार सुवार्ता अंक प्रकाशित करीत होतो. आता आपण १६ हजार अंक प्रकाशित करीत आहोत. आता 'सुवार्ता' अंकात मुखपृष्ठापासून झालेला बदल दिसून येत आहे. 'सुवार्ता'मधून चौकस आहार देण्याचा संपादक मंडळाचा प्रयत्न आहे. समारोप करताना फा. जोएल डिकुना म्हणाले की नाताळ अंक वेळेवर आणण्याचा आपला प्रयत्न आहे. सर्वांना पुनश्च धन्यवाद दिले. आल्बर्ट डिसिल्वा ह्यांनी आभार मानले. शेवटी सर्वांना भेटवस्तू देण्यात आली.

## ख्रिस्ती मराठी साहित्य संमेलन आणि पुरस्कार




**नाशिक :** २७वे ख्रिस्ती मराठी साहित्य संमेलन ९ ते १२ जाने. २०२६ दरम्यान नाशिक येथे आयोजित केले आहे. नियोजित संमेलनाध्यक्ष कवी सायमन मार्टिन ह्यांनी पुरस्कारांची घोषणा केलेली आहे. 'सुवार्ता' चे माजी संपादक मॉन्सि. फ्रान्सिस कोरिया व ख्रिस्ती साहित्य चळवळीचे सुनिल आढाव ह्यांना 'जीवन गौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. कादंबरीकार सनी पाटोळे ह्यांना 'साहित्यभूषण' पुरस्कार; गझलकार रमण रणदिवे ह्यांना 'साहित्यव्रती' पुरस्कार; लेखिका मुक्ता टिळक ह्यांना 'साहित्य गौरव' पुरस्कार म्हणून निवड करण्यात आलेली आहे. 'सुवार्ता'परिवारातर्फे सर्वांचे अभिनंदन!

## पत्रकार संदीप पंडित ह्यांचे अभिनंदन



**वसई :** वसई पत्रकार संघाच्या सलग तिसऱ्यांदा अध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार संदीप पंडित ह्यांची बिनविरोध निवड झालेली आहे. 'सुवार्ता' परिवारातर्फे अभिनंदन!

## डॉ. चंदनशिवे ह्यांना 'लोककला' पुरस्कार



**नाशिक :** मुंबई विद्यापीठाच्या लोककला विभागाचे प्रमुख डॉ.गणेश चंदनशिवे ह्यांना यंदाचा 'साहित्यिक डॉ. शंकर बोऱ्हाडे लोककला पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे. गिरणा गौरव प्रतिष्ठानच्या वतीने १७ जाने. २०२६ला आयोजित अ. भा. शेकोटी लोककला साहित्य संमेलनात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. डॉ. गणेश चंदनशिवे गेली दीड दशकांपासून लोककलेची परंपरा जोपासत आहेत. 'सुवार्ता' परिवारातर्फे अभिनंदन!

## पुस्तक प्रकाशन



**विरार :** ग्रंथाली ह्या प्रकाशन संस्थेचा ५१वा वाचक दिन गुरुवार ११ डिसेंबर रोजी विवा कॉलेज, विरार येथे संपन्न झाला. त्या वेळी वसईचे ख्यातनाम कथाकार आणि 'सुवार्ता' मासिकाचे सल्लागार स्टॅन्ली गोन्सालविस ह्यांच्या 'अबोलीचे बोल' आणि 'गीत' नाताळ अंकाचे संपादक लेस्ली से. डायस ह्यांच्या 'साँग ऑल इंडिया' ह्या पुस्तकांचे प्रकाशन सुलेखनकार अच्युत पालव ह्यांच्या हस्ते झाले. 'सुवार्ता' परिवारातर्फे उभयतांचे अभिनंदन!



## पुस्तक प्रकाशन



**आगाशी :** कवी जोसेफ साल्वादोर परेरा ह्यांचे 'जीवन शब्द सुमने' ह्या कवितासंग्रहाचे प्रकाशन 'सुवार्ता' मासिकाचे संपादक फा. (डॉ.) जोएल डिकुना ह्यांच्या शुभहस्ते ९ डिसेंबर रोजी करण्यात आले. ह्या प्रसंगी मॉन्सि. फ्रान्सिस कोरिया, ज्योती माता चर्चचे प्रमुख धर्मगुरू फा. ॲनाक्लेट डिमेलो, साहाय्यक धर्मगुरू फा. एझिडस फलकाव उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बबिता गोन्सालविस ह्यांनी केले.

## शैक्षणिक

### पथनाट्य स्पर्धा

**नंदाखाल :** सेंट जोसेफ कनिष्ठ महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून मंगळवार २ डिसेंबर रोजी आंतर शालेय पथनाट्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ह्या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून संस्थेचे संचालक फा.डॉम्निक डिआब्रिओ, प्रमुख पाहुणे माजी सभापती डॉम्निक रुमाव, संस्थेचे प्राचार्य फा. विजय लोबो, वसई धर्मप्रांताचे शिक्षण संचालक फा. प्रदीप डाबरे, निवृत्त प्राचार्य (डॉ.) फा.सॉलोमन रॉड्रिग्ज व फा. ब्रायन डायस उपस्थित होते. दीप प्रज्वलनाने व प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. मेल्विन सरांनी स्वागत व ओळख करून दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य फा. विजय लोबो म्हणाले, ''समाजात सकारात्मक बदल घडवणे, जनजागृती करणे हा पथनाट्याचा मुख्य उद्देश असतो आणि ह्यासाठीच ह्या स्पर्धेचे आयोजन आहे.''

''कलेचा आविष्कार हा सत्याला अधिक जवळ करतो. जीवन सौंदर्य सत्य आत्मसात करण्याचा संदेश पथनाट्यातून मिळतो,'' असे प्रतिपादन करीत संस्थेचे संचालक फा. डॉम्निक डिआब्रिओ ह्यांनी स्पर्धेचे उद्घाटन केले. एकूण दहा शाळांनी ह्या स्पर्धेत भाग घेतला.

पहिला क्रमांक : जॉन २३वे मराठी स्कूल, आगाशी

द्वितीय क्रमांक : सेंट गोन्सालो गार्सिया स्कूल, गास

तृतीय क्रमांक : सेंट जेम्स हायस्कूल, आगाशी

उत्तेजनार्थ : काशीबाई पाटील विद्यामंदिर, विरार ह्या शाळेला मिळाले. उत्कृष्ट दिग्दर्शनाचा मान जॉन २३वे मराठी स्कूल, आगाशी येथील फेलिक्स डिसोजा ह्यांना मिळाला. ज्योत्स्ना डाबरे, एरिका तुस्कानो ह्यांनी सूत्रसंचालन केले. वेलेंटिना लोपीस ह्यांनी आभार मानले.

## आदर्श शिक्षक महापौर पुरस्कार



**सांडोर :** बृहन्मुंबई महानगरपालिका शाळेत कार्यरत असलेल्या आक्टण गाव परिवारातील मीनल अनिल परेरा ह्यांना २०२५ चा शिक्षण विभागातर्फे 'आदर्श शिक्षक महापौर पुरस्कार' प्रदान करण्यात आला आहे. 'सुवार्ता' परिवारातर्फे अभिनंदन!

## वैश्विक इंजिनिअरिंग लिडर पुरस्कार



**भुईगाव :** येथील कॅरोल लिनस डाबरे (डिमेलो) ह्यांनी २०२५चा जागतिक पातळीवरील १२८ देशांतर्गत १७६० सॉफ्टवेअर इंजिनिअरमधून 'वैश्विक इंजिनिअरिंग लिडर' हा मानाचा पुरस्कार पटकावला आहे. 'सुवार्ता' परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन!

### सांस्कृतिक

## वर्धापन दिन

**आगाशी :** संत जेम्स ज्येष्ठ नागरिक सेवा संघाचा २७वा वर्धापन दिन गुरुवार ०४ डिसेंबर रोजी बाळ येशू सेंटर, मेरभाट, आगाशी येथे संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात फा. रॉबीन



डिसिल्वा ह्यांनी साजरी केलेल्या पवित्र मिस्साबलिदानाने झाली. कार्यक्रमाचे अध्यक्ष डायगो कोरिया ह्यांचा सत्कार फा. फिलीप लोपीस ह्यांच्या हस्ते तर सुजाता तुस्कानो ह्यांचा सत्कार डायगो कोरिया ह्यांच्या हस्ते करण्यात आला.

मान्यवरांची ओळख गिलरॉय परेरा ह्यांनी करून दिली. प्रास्ताविक फा. रॉबीन डिसिल्वा ह्यांनी केले. सूत्रसंचालन सिरिल मिनेजीस ह्यांनी केले आणि विल्फ्रेड परेरा ह्यांनी आभार मानले.

## आदिवासी स्त्रीपुरुषांचा मेळावा

**नाळा :** पसायदान केंद्र, नाळा येथे नाळा-सत्पाळा विभागांतील आदिवासी स्त्री-पुरुषांचा मेळावा रविवार ७ डिसेंबर रोजी संध्याकाळी साजरा झाला. अनेक स्त्री-पुरुषांनी अगदी मोकळ्या मनाने आपले विचार मांडले. आज सर्व मुलांना शाळेत पाठवायचा प्रयत्न केला जात आहे. मात्र दहावीनंतर काही प्रश्न उद्भवतात. स्थानिकांचे मार्गदर्शन व सहकार्य नसल्याने बऱ्याच मुलांच्या शिक्षणावर परिणाम होतो व खंड पडतो. स्थानिकांच्या वाडीत राहून वर्षानुवर्षे घाम गाळून ह्या लोकांना एक गुंठादेखील जमीन मिळू शकली नाही आणि त्यामुळेच त्यांचे श्रम फुकट गेले. शिरलयवाडी येथील एका माणसाला मात्र त्यात यश आले आणि त्यामुळे त्यांनी त्या ठिकाणी आपल्या मुलांसाठी सुंदर घर बांधले.

आज येथील मुलीदेखील खूप शिकत आहेत. पैशाअभावी दहावीनंतर त्यांना काही आर्थिक अडथळे येतात परंतु समाजसेवकांचा अभाव दिसतो. एस.व्ही.पी. त्यांच्याकडे धाव घेऊ शकत नाही का? दानशूर लोक मदत करायला तयार असतात; परंतु तेही ह्या लोकांविषयी अज्ञान आहेत काय? दहा कुटुंबाना घरे मिळाली; परंतु दुसरी दहा कुटुंबे अजुनही वाट पाहत आहेत. सरकारी सोयी व सुविधा बऱ्याच असतात परंतु अज्ञानापोटी त्यांना त्या माहीत नसतात व त्यांच्यापर्यंत पोहोचत नाही. मुलांच्या शिक्षणाविषयी काही योजना आहेत त्या योजना त्यांच्यापर्यंत पोहोचवण्याचा आपण प्रयत्न केला तर नक्कीच त्यांना हिम्मत मिळेल. **-जिमी**

## एचपीव्ही प्रतिबंध लसीकरण मोहीम

**उमराळे :** रेव्ह. फा. ॲण्ड्र्यू कोलासो मेमो. मेडिकल असो., उमराळे आयोजित 'पालघर अकॅडमी पेडियाट्रीक'च्या सहयोगाने उमराळे येथे ३० नोव्हें. रोजी एचपीव्ही प्रतिबंधक लसीकरण मोहीम राबविली. ह्यात वसईभरातील २५० मुली व महिलांनी सहभाग नोंदविला. ह्याकामी डॉ.शैलेश बारोट ह्यांचे विशेष सहकार्य लाभले.

### सहवेदना



**दहिसर :** महाराष्ट्र वेलंकनी यात्रेकरू संघटनेचे माजी उपाध्यक्ष आणि क्रियाशील ज्येष्ठ सदस्य चार्ली डिसिल्वा ह्यांचे १० डिसेंबर रोजी निधन झाले. ह्या संघटनेच्या उभारणीसाठी त्यांनी भरीव योगदान दिलेले आहे.



**गोम्सआळी :** 'सुवार्ता' वितरक श्री. सुनिल रॉड्रिग्ज ह्यांचे वडील श्री. मनवेल जॉन रॉड्रिग्ज (रांबाई) ह्यांचे १० डिसेंबर रोजी वयाच्या ८५व्या वर्षी निधन झाले.




**मुळगाव :** मिशन मित्र मंडळाच्या सक्रिय कार्यकर्त्या ज्युली अँथनी डिमेलो (नान्ठीवाडी) ह्यांचे दिनांक १२ डिसेंबर रोजी वयाच्या ७१व्या वर्षी निधन झाले.



**मुंबई :** ज्येष्ठ समाजवादी कार्यकर्ते बबन डिसोजा ऊर्फ मॅन्युअल अँथोनी डिसोजा ह्यांचे २१ डिसेंबर रोजी वयाच्या १०१व्या वर्षी निधन झाले. त्यांनी वयाच्या १८व्या वर्षी भारत छोडो आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला होता. राष्ट्र सेवादल, मिल मजदूर सभा, प्रजा समाजवादी पक्ष, गोवा विमोचन समिती, संयुक्त महाराष्ट्र समिती, आणीबाणी विरोधी आंदोलन ह्यांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग होता. १९८०साली मालवणमध्ये बॅ. नाथ पै सेवांगणाच्या उभारणीत त्यांचे योगदान लाख मोलाचे आहे.

***'सुवार्ता' परिवारातर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!***

# 'सुवार्ता' शब्दकोडे क्रमांक - ५



रचना : अनिल डायगो गोन्साल्वीस
उमराळे

**आडवे शब्द :-**

१) 'मराठी संशोधन विद्या' हे पुस्तक डॉ. ×××××× (६) ह्यांनी लिहिले आहे. स्नेहवर्धन प्रकाशन.
६) हा एक प्रकारचा मासा आहे जो सापासारखा दिसतो ×× (२)
७) क्षेत्रफळाच्या दृष्टीने जगातील सर्वांत मोठा देश ××× (३)
८) मेळ, मिलाफ, संगम, सुनिल दत्त ह्यांचा एक चित्रपट. ××× (३) ९) नम्रता, सौजन्य ××× (३)
१०) तपशील, माहिती, विवरण, बारीक माहिती (इंग्रजी) ××× (३) ११) वारा, वायु, अनिल ×× (२)
१२) फास, फंदा ×× (२)
१३) रुग्णालय, आजारी व्यक्तीवर उपचार केले जाणारे ठिकाण ×××× (४)
१६) खाली, रिक्त ×× (२) १७) कुस्तीपटू, मल्ल ×××× (४)
२०) संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी पूर्ण झाल्यावर विश्वाच्या कल्याणासाठी परमेश्वराकडे केलेली एक विश्वव्यापी प्रार्थना ××××× (५)

**उभे शब्द :-** १) छाती ×× (२) २) मंदिर, देऊळ ×××× (४)
३) विरोध, उपद्रव, विद्रोह (हिंदी) ××× (३)
४) उष्टे, उरलेले अन्न, टाकाऊ अन्न ×××× (४)
५) वि.स.खांडेकर ह्यांची गाजलेली एक मराठी पौराणिक कादंबरी ××× (३)
८) गयावया, विनंती, अजीजी, दीनवाणे होऊन केलेली विनंती ××××× (५)
९) वाद, कलह, तंटा, भांडण, मतभेद ××× (३)
१०) खाद्यपदार्थ ही एक चविष्ट ×× आहे (इंग्रजी) (२)
१२) प्राप्त करणे, मिळवणे (हिंदी) ×× (२)
१४) अकाऊंट, लेखा (हिंदी) ×× (२) १५)वर्तुळ ××× (३)
१७) पैसे (एक वचन) ×× (२) १८) वचन, आश्वासन ×× (२)
१९) ख्रिस्ती साधुनी, सिस्टर ×× (२)

**'सुवार्ता' शब्दकोडे क्रमांक -४चे उत्तर**

**आडवे शब्द :-** १) थॉमस डिसोजा ६) हानी ७) माय ८) रान १०) हमाम ११) दाता १२) कुदळ १३) तमा १४) मदर १५) बाका १७) धूर १९) वजन २०) रत २१) सवड.

**उभे शब्द :-** २) महान ३) सनी ४) सोने ५) सायमन मार्टिन ७) मामा ८) रात्र ९) नाताळ १०) हर्ष ११) दादर १२) कुदरत १४) मधूर १६) कावड १८) आस.

# हास्यरंग

## ही मुलगी

जुन्या पिढीतले एक नट होते, त्यांचं नाव दामुअण्णा मालवणकर. त्यांचा अभिनय लोकांना आवडत असे. त्यांचे डोळे तिरळे होते. ते लोकांच्याही परिचयाचे होते. ते स्वत:ही आपल्या विनोदी अभिनयात त्यांचा वापर करत. त्यांची मुलगी भारती मालवणकर ही दिसायला खूप सुंदर होती. तिला पु.ल.देशपांडे ह्यांनी पहिल्यांदा बघितलं, तेव्हा ते लगेच म्हणाले, ''ही मुलगी बापाचा डोळा चुकवून जन्माला आलीये!''

* * * *

## सल्ला

पती : तू आलीस डॉक्टरांकडे जाऊन?

पत्नी : हो, नुकताच जाऊन आले बघा!

पती : रिपोर्ट बघून काय बोलले डॉक्टर?

पत्नी : डॉक्टरांनी हवा पालटासाठी युरोप, अमेरिका, रशिया, जपान किंवा मॉरिशसला जायला सांगितलंय, तेव्हा कुठे जायचं?

पती : आता दुसऱ्या डॉक्टरांकडे जायचं!

## सहानुभूतीचा शब्द

एक गृहस्थ एका हॉटेलात गेला आणि त्याने ऑर्डर दिली, ''एक मसाला डोसा आणि एक सहानुभूतीचा शब्द.''

वेटरने लागलीच मसाला डोसा आणून ठेवला. ह्यावर गिऱ्हाईक म्हणाले, ''काय रे, सहानुभूतीचा शब्द कोठे आहे?''

तो वेटर हळूच गिऱ्हाईकाच्या कानात म्हणाला, ''साहेब, हा मसाला डोसा खाण्याच्या लायकीचा नाही.''

* * * *

## खटारा

अब्राहाम लिंकन एका सभेत भाषण करीत होते. भाषण ऐन रंगात आले असता, एकजण ओरडला, ''ह्यांचे वडील खटारा चालवीत. पण त्या खटाऱ्याला बैलाऐवजी गाढव जुंपलेलं होतं.'' ते ऐकताच अब्राहाम लिंकन म्हणाले, ''आता आमचे वडीलही नाहीत आणि आमचा खटाराही नाही; पण गाढव अजून जिवंत आहे असं दिसतंय.''

# नवी दृष्टी, सृष्टी व दूरदृष्टी

ही आहे कथा लहान मुलांची; पण ह्यापासून मिळणारा बोध मात्र मोठ्यांसाठीसुद्धा आहे...

असेच एक गाव होते. निसर्गरम्य गाव. त्यात सर्व जाती-धर्माचे लोक गुण्यागोविंदाने नांदत होते. त्याच गावात होती एक शाळा, प्राथमिक शाळा. शाळेत शिक्षण आणि संस्कार ह्यांचे सुंदर मीलन झाले होते. म्हणून त्या शाळेला खास मागणी होती; पण कुणालाही प्रवेश नाकारला जात नसे.

असेच एप्रिल-मे महिन्याचे दिवस होते. नुकताच वार्षिक परीक्षा संपल्या होत्या. दुपारच्या वेळी आई-वडील वामकुक्षी घेत होते. इतक्यात त्यांची नजर चुकवून काही मित्र, मुले निघाली, फिरायला. फिरता-फिरता त्यांची नजर गेली आंब्यांच्या झाडांवर. प्रत्येकाच्या घरी आंब्याची झाडे होती; परंतु म्हणतात ना? 'शेजारच्या झाडाचे आंबे गोड लागतात', त्याप्रमाणे त्यांनी एकामागून एका झाडावरचे आंबे तोडायला, पाडायला सुरुवात केली.

त्यांनी आंबे इतके पाडले की आता ते गोळा करता-करता त्यांची तारांबळ उडाली; आता ते आंबे न्यायचे कसे? कुठे? कुणी बघितले तर? प्रश्नच प्रश्न. पण त्यांच्यात एक 'विशेष' मुलगा होता, म्हणजे 'खोडकर' मुलगा. त्याच्याकडे सगळे बघू लागले. त्याच्या डोळ्यात मस्ती चमकत होती, नाचत होती. त्याने क्षणाचाही विलंब न लावता सवंगड्यांना सांगितले, ''माझ्या मागे या.'' लागलीच सगळे जण म्होरक्याच्या मागे जाऊ लागले आणि पोहोचले दफनभूमीत, विश्रामभूमीत, ख्रिस्ती माणसे पुरली जातात त्या खाचांवर आणि म्होरक्याने सुरू केला वाटप, पाडलेल्या आंब्यांचा, ''हे तुला, हे मला.''

त्या दफनभूमीच्या भिंतींच्या बाजूने एक रस्ता होता. त्या रस्त्यावरून एक वयस्क गृहस्थ जात होते. त्यांनी हा आवाज ऐकला, ''हे तुला, हे मला'' आणि ते घाबरले. त्यांनी धूम ठोकली, ते धावत-धावत घरी पोहोचले आणि मुलांना गोळा करून म्हणाले, ''मुलांनो, सावध रहा, पाप करू नका, कारण मेल्यावर तुमचा न्याय होणार आहे.'' एव्हढ्यात आजोबांना थांबवत एक चिकित्सक पोरगा उद्गारला, ''म्हणजे काय, कसा?'' तेव्हा आजोबा म्हणाले, ''बघा. मी आता दफनभूमीच्या बाजूने येत होतो तेव्हा तेथे मी ऐकले, देव आणि सैतान ह्यांच्यात वाटप चाललाय, ''हे आत्मे तुला, हे आत्मे मला.''

बस्स! तोच चिकित्सक मुलगा उठला, धावला दफनभूमीकडे, दफनभूमीच्या दाराच्या कोपऱ्यातून त्याने हळूच ऐकण्याचा प्रयत्न केला आणि त्याने आवाज ऐकला,''हे तुला, हे मला.'' त्याने हिम्मत केली, दफनभूमीत प्रवेश केला आणि पाहतो तो काय? आपलेच वर्गमित्र, सोबती, सवंगडी. क्षणाचाही विचार न करता, विलंब न लावता बेडरपणे तो पुढे सरसावला व म्हणाला, ''आणि माझा वाटा?'' सारी मुले चकित झाली... अशारितीने आंबे गोळा करून तो चौकस बुद्धीचा मुलगा आजोबांकडे गेला नि सारी घटना त्याने आजोबांना कथन केली; त्यांच्या ज्ञानात भर घातली; समज-अपसमज-गैरसमज लीलया दूर झाले.

नंतर साऱ्यांना कळले, समजले, लक्षात राहिले : आत्म्याचा असा वाटप होत नसतो. येशूने आपल्या देहीकरण (जन्म) व पुनरुत्थानाच्या (मरण) दिव्य रहस्यांद्वारे, जीवन व मृत्यूच्या अद्‌भुत वास्तवाने, आपणां सर्वांना आशादायी, अभिनव दृष्टी दिली आहे, त्यामुळे सृष्टी अभिजात बनते आणि विश्वाची नवनिर्मिती करण्याचे भाग्य आपल्याला लाभते. मग भय, भीती अन् भूत-भुताटकी ह्याऐवजी, **श्रद्धा** (अश्रद्धा व अंधश्रद्धा नव्हे!), **आशा** (फसवे आश्वासन वा दिखाऊपणा नव्हे) आणि **प्रीती** (समंजसपणा, क्षमा, सेवा आदी) फोफावू लागते. असे निर्भयतेचे वातावरण मग पिढ्यान् पिढ्या जतन करतात नि ते सुरू राहते.



नवे वर्ष, नवा उत्साह, नवी उमेद,. नव्या दिशा नि आशा. नवे संकल्प नि प्रकल्प, एक क्षितिज पार करून दुसऱ्या नि तिसऱ्या क्षितिजापलीकडील प्रवास. ह्या प्रवासाचे रूपांतर तीर्थयात्रेत व्हावे, समस्त मानवजात व प्राणिमात्र, जीव-जिवाणू तद्वत निसर्गालादेखील आपल्या सकारात्म दृष्टी, अंतर्दृष्टी, दूरदृष्टीचा लाभ व्हावा हीच सदिच्छा.

आपणां सर्वांना २०२६ हे नूतन वर्ष सुख, शांती, तृप्तीचे असावे हीच त्या विधात्याकडे, समस्त विश्वासाठी, विनम्र प्रार्थना!

**- फा. जोएल डिकुना**

## उपासना वर्ष दिनदर्शिका : जानेवारी २०२६

**वाचनग्रंथ : रवि., सोहळे, सण - पहिले वर्ष; सप्ताह - दुसरे वर्ष**

१. **पवित्र देवमाता मरियेचा सोहळा**
गणना ६:२२-२७
स्तोत्र ६७:२-३,५,६,८
गलती ४:४-७
लूक २:१६-२१

२. **संत ब्रेझील द ग्रेट आणि संत नाझीयान्झेन ग्रेगरी-स्मृती**
१योहान २:२२-२८
स्तोत्र ९८:१-४
योहान १:१९-२८

३. १योहान २:२९-३:६
स्तोत्र ९८:१,३-६
योहान १:२९-३४

४. **प्रभूचे प्रकटीकरण - सोहळा**
यशया ६०:१-६
स्तोत्र ७२:१-२,७-८,१०-१३
इफिस ३:२-३,५-६
मत्तय २:१-१२

५. १योहान ३:२२-४:६
स्तोत्र २:७-८,१०-११
मत्तय ४:१२-१७,२३-२५

६. १योहान ४:७-१०
स्तोत्र ७२:१-४,७-८
मार्क ६:३४-४४

७. १योहान ४:११-१८
स्तोत्र ७२:१-२,१०-११, १२-१३
मार्क ६:४५-५२

८. १योहान ४:१९-५:४
स्तोत्र ७२:१-२,१४-१५,१७
लूक ४:१४-२२

९. १योहान ५:५-१३
स्तोत्र १४७:१२-१५,१९-२०
लूक ५:१२-१६

१०. १योहान ५:१४-२१
स्तोत्र १४९:१-६,९
योहान ३:२२-३०

११. **प्रभूच्या स्नानसंस्काराचा सण**
यशया ४२:१-४,६-७
स्तोत्र २९:१-४,९-१०
प्रे.कृ. १०:३४-३८
मत्तय ३:१३-१७

१२. १शमुवेल १:१-८
स्तोत्र ११६:१२-१४,१७-१९
मार्क १:१४-२०

१३. १शमुवेल १:९-२०
शमुवेल २:१,४-८
मार्क १:२१-२८

१४. **संत देव साहाय्यम पिलाई-स्मृती**
याकोब १:२-४,१२
स्तोत्र ३४:२-९
मत्तय १०:२८-३३

१५. १शमुवेल ४:१-११
स्तोत्र ४४:१०-११, १४-१५, २४-२५
मार्क १:४०-४५

१६. **संत जोसेफ वाझ-स्मृती**
१करिंथ १:१८-२५
स्तोत्र ११७:१-२
मार्क १:१४-२०

१७. **संत अँथनी-स्मृती**
१शमुवेल ९:१-४,१७-१९; १०:१
स्तोत्र २१:२-७
मार्क २:१३-१७

१८. **सामान्य काळ २रा रविवार**
यशया ४९:३,५-६
स्तोत्र ४०:२,४,७-१०
१करिंथ १:१-३
योहान १:२९-३४

१९. १शमुवेल १५:१६-२३
स्तोत्र ५०:८-९,१६-१७, २१, २३
मार्क २:१८-२२

२०. **संत फॅबियन व संत सेबॅस्टीयन- स्मृती**
१शमुवेल १६:१-१३
स्तोत्र ८९:२०-२२,२७-२८
मार्क २:२३-२८

२१. **संत ॲग्नेस स्मृती**
१शमुवेल १७:३२-३३, ३७, ४०-५१
स्तोत्र १४४:१-२,९-१०
मार्क ३:१-६

२२. १शमुवेल १८:६-९,१९:१-७
स्तोत्र ५६:२-३,९-१३
मार्क ३:७-१२

२३. १शमुवेल २४:२-२०
स्तोत्र ५७:२-४,६,११
मार्क ३:१३-१९

२४. **संत फ्रान्सिस डी सेल्स-स्मृती**
२शमुवेल १:१-४,११-१२, १९,२३-२७
स्तोत्र ८०:२-३,५-७
मार्क ३:२०-२१

२५. **सामान्यकाळ ३रा रविवार**
यशया ९:१-४
स्तोत्र २७:१,४,१३-१४
१करिंथ १:१०-१३,१७
मत्तय ४:१२-२३

२६. **प्रजासत्ताक दिन**
२शमुवेल ५:१-७,१०
स्तोत्र ८९:२०-२२,२५-२६
मार्क ३:२२-३०

२७. **संत तिमथी व संत टायटस-स्मृती**
२तिमथी १:१-८
स्तोत्र ९६:१-३,७-८,१०
लूक १०:१-९

२८. **संत थॉमस अक्वायनस-स्मृती**
२शमुवेल ७:४-१७
स्तोत्र ८९:४-५,२७-३०
मार्क ४:१-२०

२९. २शमुवेल ७:१८-१९, २४-२९
स्तोत्र १३२:१-२,३-५, ११-१४
मार्क ४:२१-२५

३०. २शमुवेल ११:१-४,५-१०, १३-१७
स्तोत्र ५१:३-५,६-७,१०-११
मार्क ४:२६-३४

३१. **संत जॉन बॉस्को-स्मृती**
२शमुवेल १२:१-७,१०-१७
स्तोत्र ५१:१२-१७
मार्क ४:३५-४१

### फेब्रुवारी २०२६

१. **सामान्यकाळ ४था रविवार**
सफन्या २:३;३:१२-१३
स्तोत्र १४६:६-१०
१करिंथ १:२६-३१
मत्तय ५:१-१२

२. **येशूचे देवालयात समर्पण - सण**
मलाखी ३:१-४
स्तोत्र २४:७-१०
लूक २:२२-४०


३. २शमुवेल १८:९-१०, १४, २४-२५,३०-१९:३
स्तोत्र ८६:१-६
मार्क ५:२१-४३

४. **संत जॉन डी ब्रिटो-स्मृती**
१करिंथ ९:१९-२७
स्तोत्र ६८:२९-३०,३३-३६
योहान १२:२०-३२

५. **संत अगाथा-स्मृती**
१राजे २:१-४,१०-१२
१इतिहास २९:१०-१२
मार्क ६:७-१३

६. **संत पॉल मिकी आणि सहकारी - स्मृती**
बेनसिरा ४७:२-११
स्तोत्र १८:३१,४७,५०-५१
मार्क ६:१४-२९

७. **संत गोन्सालो गार्सिया-स्मृती**
२करिंथ ६:४-१०
स्तोत्र ३०:२,४-६,११-१३
मत्तय १०:१७-२२





JEWEL OF CHIRABAZAR
MK JEWELLERS
Shah & Co.™
528, Chira Bazar, Mumbai - 400 002.
Tel. 2205 6380, 2205 1124 | Fax : 022 - 2206 5421
Email : mkshahjewellers@gmail.com
HALLMARK JEWELLERY 100%
Welcome
2026
Happy New Year
As we step into 2026, we cherish your trust and look forward to continuing our legacy of excellence together.
OUR NEW LANDMARK
Now Facing Kalbadevi Metro Station
Dear Customer Please Save Our Mob No 7718019981 to your Contact List & get Daily updates of New Collection & Prices
WE HAVE NO BRANCH AT VIRAR, VASAI & MUMBAI
Our Showroom is Very Nearby Marine Lines Station (Mumbai)
Valet Parking Available

Suwarta Trust, P.T. Regd. No. D-28 (Palghar) PLG/17/2023-2025
One Year Subscription 200/-, Date of Posting : 2nd & 3rd of the Month. Place of Posting : Vasai, Estd : 15th August 1955, Editor : **Fr. (Dr.) Joel D'Cunha**




**संपादक, मुद्रक, प्रकाशक :** फा. (डॉ.) जोएल डिकुना ह्यांनी 'सुवार्ता' हे मासिक Suwarta Trust, P.T. Regd. No. D-28 (Palghar) च्या वतीने 'सुवार्ता कार्यालय' गिरीज, वसई ४०१ २०१ (फोन : ९७०२०९०२३१) Email : suvartavasai@gmail.com / Web. : www.suvarta.org येथे प्रसिद्ध केले.
**मुद्रण :** मॅन्युएल प्रिंट, वालिव फाटा, सातीवली रोड, वसई (पूर्व) - ४०१ २०८.